नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १६० * | * नागपूर * | बुधवार, दिनांक १० सप्टेंबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## १२ वर्षीय बालिकेवर दोघांकडून लैंगिक अत्याचार

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. ९ :**
बीड जिल्ह्यातील परळी शहरात संतापजनक घटना घडली आहे. एका १२ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. शहरातील बरकत नगर परिसरात राहणाऱ्या मुलीवर दोन नराधमांनी अत्याचार केला असून यासाठी आणखी दोघांनी मदत केल्याचे समोर आले आहे. या घटनेने शहरात संताप व्यक्त केला जात आहे. आठ दिवसात ही दुसरी घटना परळी शहरात घडली आहे.
पीडित मुलगी हीह आपल्या घराजवळ असताना आरोपींनी तिला फसवून नेले व लैंगिक अत्याचार केले. यावेळी आणखी दोघांनी या आरोपींना साथ दिली. अवघ्या आठ दिवसांपूर्वीच रेल्वे स्थानक परिसरात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना घडली होती.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

### नेपाळी तरुणांच्या मनातील आग

दक्षिण आशियात गेल्या काही वर्षात सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जो जनआक्रोश दिसून येत आहे त्यामध्ये आता नेपाळची भर पडलेली आहे. सर्वात प्रथम श्रीलंकेमध्ये तेथील राष्ट्रपती आणि सत्तारूढ लोकांच्या विरोधात प्रचंड जनआक्रोश दिसून आला. हा जनआक्रोश इतका भयंकर होता की निवडून आलेल्या नेत्यांच्या विरुद्ध जनतेने पुकारलेले बंड तेथील राजकारण्यांना गपगार करून गेले. त्यानंतर बांगलादेशचा नंबर लागला कारण बांगलादेशच्या निवडणुकीत गडबड झाली कारण बंगबंधू शेख मुजिबूर रहमान यांची पुत्री पुन्हा गादीवर बसली. ती भारत मित्र होती मात्र, बांगलादेशातल्या कट्टर जातीयवादी मुल्ला मौलवींनी असा काही हल्ला करविला की शेख हसीना बाईंना स्वतःच्याच बांगलादेशातून पलायन करावे लागले. नशीब बरे होते म्हणून त्यांनी यांनी नियुक्त केलेल्या लष्कर प्रमुखांनी विमान दिले. त्यामुळे शेख हसीना बाईंना भारतापर्यंत येता आले कारण जगातील कुठल्याच देशाने त्यांना थारा दिला नाही म्हणून त्या आता भारतातच कुठेतरी अज्ञातवासात आहेत. बांगलादेशात नोबेल पुरस्कार विजेता अर्थतज्ञ नव्या निवडणुकीपर्यंत तात्कालीक पंतप्रधान बनलेला आहे. त्याचा भारत म्हणजेच हिंदुस्तान द्वेष आणि हिंदू द्वेष चांगलाच उफाळून आलेला आहे. पण हा माणूस निवडणूक घेण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही. त्यानंतर नेपाळमध्ये विद्रोह सुरू आहे. हा विद्रोह महाभयंकर आहे. आता कालपासून नेपाळची विनाशकारी आणि अतिभयंकर परिस्थिती समोर आलेली आहे. अगदी काल-परवापर्यंत फक्त विद्रोहाच्या बातम्या येत होत्या मात्र आता युवक वर्ग बेधुंद झालेला आहे. मते देऊन निवडलेल्या नेत्यां विरुद्धची घृणा त्यातून समोर येत आहे. नेत्यांच्या महाभयानक कमाईच्या आणि फक्त स्वतःच्या कुटुंबाला राजेशाही वागणूक देण्याच्या वर्तणुकीला नेपाळी तरुणवर्ग वैतागून गेलेला होता. हाच वैताग तरुणांना विद्रोहाकडे घेऊन गेलेला आहे . १४ ते २८ वर्षाचे तरुण आता कोणाचेही ऐकायला तयार नाहीत. राष्ट्रपतींनी राजीनामा दिला, प्रधानमंत्री कीर्ती शर्मा ओली यांनी आणि त्यांच्या अनेक मंत्र्यांनी राजीनामे दिले. पण नेपाळचे हे युवक आता कोणाचेही ऐकायला तयार नाहीत. इतका भयंकर जनआक्रोश आधुनिक जगाच्या इतिहासात कुठेच दिसला नाही. ढळढळीत उघड्या डोळ्याने दिसणारा भ्रष्टाचार, साम्यवादी म्हणवणाऱ्या सरकारच्या मुलांची शाही जीवनपद्धती आणि इतरांना कस्पटासारखी वागवणारी वागणूक त्यातच नेपाळमधील बेकारांचे तांडे हाच या उद्रेकाचा उगमबिंदू आहे. सोशल मीडियावर बंदी हे फक्त तात्कालीक कारण आहे. त्यापेक्षा नेपाळची भयानक अवस्था आणि राज्यकर्त्यांची मौजमजा यांना विटलेले सामान्य तरुण आता पूर्णतः बिथरलेले आहेत. भारताला स्वातंत्र्य देण्यापूर्वी ब्रिटनचे तात्कालीन पंतप्रधान चर्चिल यांनी हिंदुस्थानचे लोक राज्य करण्यासाठी समर्थ नाहीत, ते देशाचे वाटोळे करतील असे म्हटले होते. तेव्हाच्या भारताचाच भाग असलेल्या पाकिस्तान, बांगलादेश यांचे जे काही हाल झाले आहे ते आणि भारताच्या समांतर असलेले श्रीलंका आणि आता नेपाळ या देशांमधील अराजक या चर्चिलला तेव्हा दिसले असावे, असे म्हणण्यास वाव उरतो. आज नेपाळमधील संसदेच्या इमारतीसह सर्व आजी आणि माजी प्रमुख नेत्यांची घरे आगीच्या भक्षस्थानी पडलेली आहेत. खरंतर ही नेपाळच्या तरुणांच्या मनातील आग आहे असे आपण समजले पाहिजे. एका कवीने असे म्हटले आहे की,

*केला जरी पोत बळीची खाले !*
*ज्वाला तरी ते वरती उफाळे !!*

याच उक्तीनुसार नेपाळी तरुणांच्या मनातील आग इतकी उफाळली आहे. आता त्यामध्ये बरेच काही भस्मसात होत आहे असेच आपण समजले पाहिजे. सध्या नेपाळमध्ये कोणाचीही सत्ता नाही. सध्याची परिस्थिती पाहून नेपाळचे राजे ज्ञानेंद्र यांनी लोकांच्या हाती सत्ता सोपवलेली आहे. नेपाळ काँग्रेस त्यातल्या त्यात बरी होती. आता कम्युनिस्टांच्या हातात सत्ता आहे. हे साम्यवादी कम्युनिस्ट सर्वहारा वर्गाचे कल्याण करण्याऐवजी आपल्या पोराबाळांना आयुष्यभर आरामात आणि ऐश्वर्यात कसे राहता येईल तेवढेच पाहत आहेत. त्यामुळेच आपल्या पोरा बाळांना मलिदा चारणाऱ्या कितीतरी नेत्यांना आणि आजी-माजी सत्ताधाऱ्यांना आज या नेपाळमधील बंडखोरांनी चांगलेच बडवलेले आहे. पूर्वीचे पंतप्रधान झालनात यांच्या पत्नी राजलक्ष्मी यांना तर अक्षरशः मारून मारून ठार केलेले आहे. आतापर्यंत २३ तरुण ठार झालेले आहेत. अजून नेपाळची सेना, प्रबुद्ध वर्ग आणि हे बंडखोर करून ज्यांना नेता मानतात ते काठमांडूचे बिरेन शहा यांच्या आवाहनालाही बंडखोरांनी कुठलाच प्रतिसाद दिलेला नाही. हा विद्रोह केवळ काठमांडूत नाही तर नेपाळच्या प्रत्येक शहरात आहे. पोलीस आणि नेपाळची सेना हतबल आहे. २३ जण मारल्यावर ते तरुण जीवावर उदार होऊन मनातील आग सर्व नेपाळमध्ये भडकवण्याचे कारण फार महाभयंकर भ्रष्टाचार हे आहे. जेव्हा तरुण मंडळी रस्त्यावर उतरतात तेव्हा सत्ता परिवर्तन होत असते. भारतातही त्या प्रकारचे सत्ता परिवर्तन यापूर्वी झालेले आहे जयप्रकाश नारायण यांचे किंवा अण्णा हजारे यांचे आंदोलन आपल्या देशातही केवळ भावना भडकविण्यापर्यंत सीमित राहिले. मतपेटीच्या माध्यमातून सत्ता परिवर्तन झाले. पण आपल्या चारी बाजूंनी सध्या जे अराजकाचे साम्राज्य दिसून येत आहे, त्यापासून आपणही धडा घेतला पाहिजे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## प्रधानमंत्री ओली आणि राष्ट्रपतींचाही राजीनामा ■ परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण

# नेपाळ धुमसलेलेच!

■ **वृत्तसंस्था, काठमांडू, दि. ९ :**
नेपाळमधील हिंसक घटनांदरम्यान पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. लष्कराच्या हेलिकॉप्टरने त्यांना अज्ञातस्थळी नेले. त्यानंतर लगेचच राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनीही राजीनामा सादर केला. राजधानीतील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण आहे आणि सुरक्षा दल परिस्थिती नियंत्रणात आणण्यात अपयशी ठरत आहे.

देशात सुरू असलेल्या हिंसक निदर्शनांमुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. राजधानी काठमांडू आणि आसपासच्या भागात झालेल्या संघर्ष आणि जाळपोळीत आतापर्यंत २२ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ४०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत. निदर्शकांनी संसद भवनाला आग लावली. पंतप्रधान केपी शर्मा ओली, राष्ट्रपती रामचंद्र पौडेल आणि गृहमंत्र्यांच्या खाजगी निवासस्थानांवरही हल्ला केला आणि तोडफोड केली आणि आग लावली.

संतप्त तरुणांनी माजी पंतप्रधान शेर बहादूर देउबा यांच्या घरात घुसून त्यांना मारहाण केली, तर अर्थमंत्री विष्णू पौडेल यांना काठमांडूमधील त्यांच्या घराजवळ पाठलाग करून मारहाण करण्यात आली. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये एक निदर्शक त्यांच्या छातीवर लाथ मारताना



निदर्शकांनी माजी पंतप्रधान झालानाथ खनाल यांच्या घराला आग लावली. त्यांच्या पत्नी राज्यलक्ष्मी चित्रकर घरात होत्या. त्या गंभीरपणे भाजल्या गेल्या. त्यांना तातडीने कीर्तिपूर बर्न हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, जिथे त्यांचा मृत्यू झाला.

दिसत आहे. दरम्यान, निदर्शकांनी माजी पंतप्रधान पुष्पकमल दहल 'प्रचंड', शेर बहादूर देऊबा आणि दळणवळण मंत्री पृथ्वी सुब्बा गुरुंग यांच्या घरांनाही आग लावली. मंगळवारी निदर्शकांनी नेपाळच्या संघीय संसदेला आग लावली.

मंगळवारी पंतप्रधान ओली यांच्या घराला आग लागली. त्यानंतर धुराचे लोट उठताना दिसले. निदर्शकांनी राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांचे वैयक्तिक घर पेटवून दिले. निदर्शकांनी राजीनामा दिलेले गृहमंत्री रमेश लेखक यांच्या घराला आग लावली आणि तोडफोड केली.

सुरक्षा दलांनी पंतप्रधान ओली यांना हेलिकॉप्टरने सुरक्षित ठिकाणी हलवले. त्यांना कुठे नेण्यात आले आहे हे माहित नाही. प्रचंड दबावादरम्यान, नेपाळमध्ये युती सरकार तुटण्याचा धोका वाढला आहे. शेर बहादूर देउबा यांची नेपाळी काँग्रेस ८८ जागांसह आणि केपी शर्मा ओली यांची सीपीएन (यूएमएल) ७९ जागांसह जुलै २०२४ पासून देशात एकत्रितपणे सरकार चालवत आहेत. आतापर्यंत सर्व राजीनामे नेपाळी काँग्रेसच्या नेत्यांनी दिले आहेत.

**सर्व उड्डाणे रद्द**

नेपाळची राजधानी काठमांडू येथील त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे आज सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. गंभीर परिस्थिती आणि सुरक्षेच्या कारणास्तव हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल विमानतळ प्राधिकरणाने माफी मागितली आहे.

महाव्यवस्थापक हंसा राज पांडे म्हणाल्या की, कोटेश्वरजवळ धुराचे लोट उठल्याने दुपारी १२:४५ वाजल्यापासून आंतरराष्ट्रीय उड्डाणे थांबवण्यात आली.

नेपाळमधील आंदोलक सोशल मीडियाच्या माध्यमातून बालेन शाह यांना पुढील पंतप्रधान बनवण्याची मागणी करत आहेत. सध्या ते काठमांडूमध्ये महापौर आहेत.

नेपाळमध्ये सुरू असलेल्या हिंसक निदर्शनांमुळे, भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने भारतीय नागरिकांना नेपाळला प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे.

## सीपी राधाकृष्णन देशाचे १५ वे उपराष्ट्रपती

### एनडीए उमेदवाराला ४५२ मते : रेड्डींचा १५२ मतांनी पराभव

■ **वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. ९ :**
सीपी राधाकृष्णन हे देशाचे १५ वे उपराष्ट्रपती असतील. एनडीएचे उमेदवार राधाकृष्णन यांना ४५२ पहिल्या पसंतीची मते मिळाली. तर आघाडीचे उमेदवार सुदर्शन रेड्डी यांना ३०० पहिल्या पसंतीची मते मिळाली. राधाकृष्णन १५२ मतांच्या फरकाने विजयी झाले.

काँग्रेसने दावा केला होता की, इंडियाच्या ३१५ खासदारांनी मतदान केले, त्यापेक्षा इंडिया अलायन्सच्या उमेदवाराला १५ मते कमी



मिळाली. बीआरएस आणि बीजेडीने निवडणुकीत भाग घेतला नाही, तर बीआरएसचे ४ आणि बीजेडीचे राज्यसभेत ७ खासदार आहेत. लोकसभेत फक्त एक खासदार असलेल्या शिरोमणी अकाली दलानेही पंजाबमध्ये आलेल्या पुरामुळे मतदान करण्यास नकार दिला.

धनखड यांनी अचानक प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत उपाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता.

## पूरग्रस्त भागांचे पंतप्रधानांकडून हवाई सर्वेक्षण

■ **वृत्तसंस्था, चंदीगड, दि. ९ :**
हिमाचलनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी पंजाबमधील पूरग्रस्त भागांचे हवाई सर्वेक्षण केले. गुरुदासपूरमधील पुरामुळे बाधित झालेल्या लोकांना ते भेटले व त्यांच्या समस्या ऐकल्या. पंजाबच्या आप सरकारने केंद्राकडे ८० हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे.

तत्पूर्वी, पंतप्रधानांनी कुल्लू, मंडी आणि चंबा येथील नुकसानीचे हेलिकॉप्टरने हवाई सर्वेक्षण केले. त्यानंतर, धर्मशाला येथे आपत्तीसंदर्भात एक बैठक झाली, ज्यामध्ये अधिकाऱ्यांनी त्यांना सादरीकरणाद्वारे नुकसानीची माहिती दिली. यावेळी त्यांनी १५०० कोटी रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली. केंद्र सरकार सर्वतोपरी मदत करेल असे पंतप्रधान म्हणाले. मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५०,००० रुपये दिले जातील.

मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू हे देखील या बैठकीत उपस्थित होते. यानंतर, पंतप्रधानांनी मंडी, कुल्लू आणि चंबा जिल्ह्यातील १८ बाधितांची भेट घेतली आणि त्यांची आपबिती ऐकून घेतली. त्यांनी एक वर्षाच्या नीतिकाचीही भेट घेतली, जिचे आई, वडील आणि आजीचा ३० जून रोजी मंडीमध्ये ढगफुटीमुळे आलेल्या पुरात मृत्यू झाला. पंतप्रधानांनी प्रथम नीतिकाला टॉफी दिली



आणि नंतर तिला आपल्या मांडीवर घेतले.

तत्पूर्वी, ५ सप्टेंबर रोजी केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी अमृतसर, गुरुदासपूर आणि कपूरथला येथील पूरग्रस्त भागांना भेट दिली आणि पीडितांची भेट घेतली. नुकसानीबाबत त्यांनी नेत्यांसोबत चर्चा केली.

## ९१ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८९२.६१ कोटी रुपये जमा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सुरू करण्यात आलेल्या नमो शेतकरी महासन्मान किसान योजनेचा सातवा हप्ता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वितरित करण्यात आला. राज्यातील ९१ लाख ६५ हजार १५६ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात १८९२.६१ कोटी रुपये निधी वर्ग होईल.

मंत्रालय येथे नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेह्लच्या अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना सातव्या हप्त्याचा निधी वितरित करण्यासाठी कृषी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे मंत्रीमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेशकुमार उपस्थित होते.

केंद्र शासनाने सुरु केलेल्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर राज्य शासनाने ही योजना सुरू केली आहे. यामध्ये पात्र शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देऊन शेती खचार्ला हातभार लावण्याचा या योजनेचा उद्देश आहे.

या सातव्या हप्त्यामध्ये एप्रिल २०२५ ते जुलै २०२५ या कालावधीचे अनुदान लाभार्थ्यांना देण्यात आले. ज्या शेतकरी लाभार्थ्यांचा प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत समावेश आहे.

केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रुपये अनुदान देण्यात येते. राज्य शासनातर्फे प्रति वर्षी आणखी सहा हजार रुपये अनुदान देण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविली जाते.

### नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेत

## हुडकोकडून २ हजार कोटींचे कर्ज

### छ. संभाजीनगरला ८२२, नागपूर २६८, मीरा भाईंदरसाठी ११६ कोटी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना अंतर्गत राज्यातील विविध महापालिकांना विविध प्रकल्प पूर्ण करण्याकरिता स्वहिश्याचा निधी उभारण्याकरिता हुडको कडून २००० कोटी रुपयांचे कर्ज घेण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या निर्णयामुळे छत्रपती संभाजीनगर महानगर पालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी ८२२ कोटी २२ लाख रुपये, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिस्सारण प्रकल्पासाठी २६८ कोटी ८४ लाख रुपये, मीरा भाईंदर मनपाच्या पाणीपुरवठा प्रकल्पासाठी ११६ कोटी २८ लाख रुपयांचे कर्ज उभारणी करता येणार आहे.

राज्यातील विविध महापालिका क्षेत्रात केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान, स्वच्छ भारत



अभियान २.०, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान व इतर केंद्र व राज्य स्तरावरील पायाभूत सुविधांचे प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

हे प्रकल्प निधीअभावी निधी रखडू नयेत व वेळेत पूर्ण व्हावेत यासाठी महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना व त्यातून निधी उभारण्याची कार्यपद्धती निश्चित करून देण्यात आली आहे. त्यानुसार या महापालिकांना व इतरही महापालिकांना स्वहिश्शाचा निधी उभारता यावा यासाठी हुडकोकडून दोन हजार कोटीचे कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली.

### मंत्रीमंडळ बैठकीमध्ये चार निर्णय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीमध्ये चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये शेतकऱ्यांना दिलासा देत उपसा जलसिंचन योजनांसाठी वीजदर सवलतीला मुदतवाढ देण्यात आली आहे. ही सवलत मार्च २०२७ पर्यंत शेतकऱ्यांना मिळणार आहे. अतिउच्चदाब, उच्चदाब व लघुदाब उपसा जलसिंचन अशा सर्व प्रकारच्या १७८९ योजनांना वीज दरात सवलतीमुळे शेतकरी सभासदांना लाभ मिळेल.

अकोला जिल्ह्यातील घोंगा आणि कानडी (ता. मुर्तिजापूर) येथील लघु पाटबंधारे प्रकल्प योजनांच्या दुरुस्ती खर्चाची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. मुर्तिजापूर तालुक्यातील सिंचन क्षमतेत वाढ होणार असून, शेतकऱ्यांना फायदा होईल.

रायगड जिल्ह्यातील मौजे आसुडगाव (ता. पनवेल) येथील शासकीय गायरानातील चार हेक्टर जमीन भारत सरकारच्या सब्सिडरी इंटेलिजन्स ब्युरो यांना अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थाने (रहिवास क्वार्टर्स) बांधण्यासाठी देण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.

# भुजबळ, जरांगे वाद अधिकच चिघळला!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**
मराठा आरक्षणाचा जीआर काढण्यापूर्वी मला विश्वासात घेतले नाही. मला त्याबाबतची कल्पना दिली नसल्याचे ओबीसी नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. त्यावर तुम्हाला कल्पना द्यायला तुम्ही सरकारचे बाप आहात का? असा सवाल मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांना केला. जीआरला हात लावल्यास सरकारला शांत बसू देणार नाही, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.

मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून मंत्री छगन भुजबळ आणि मराठा आरक्षणाचे आंदोलक मनोज जरांगे यांच्यातील वाद टोकाला पोहचल्याचे दिसत आहे.

राज्य सरकारने मराठा आरक्षणासाठी काढलेल्या हैदराबाद गॅझेटच्या जीआरवरून ओबीसी नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ हे चांगलेच आक्रमक झाले आहेत. काढलेला जीआर हा प्रचंड दबावाखाली काढल्याचा दावा करत त्यांनी यासंबंधी मुख्यमंत्र्यांना एक ८ पानी पत्र लिहिले आहे.

या पत्रामध्ये त्यांनी 'मराठा समाज' या शब्दावर जोरदार आक्षेप घेतला आहे. त्यांनी मराठा समाजाचा उल्लेख ओबीसी किंवा कुणबी अथवा मराठा - कुणबी किंवा कुणबी - मराठा असा करण्याची गरज अधोरेखित केली आहे. आता यावरून मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे.



राज्य मंत्रिमंडळाच्या उपसमितीने हा जीआर काढला आहे. छगन भुजबळ यांनी आठ पानाचे किंवा आठशे पानाचे पत्र देऊ द्या. मुख्यमंत्री त्याला कोलून लावणार. ते सरकारचा बाप नाही. सरकारने हेराफेरी करायची नाही. जर हेराफेरी केली तर सरकारला रस्त्याने फिरू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

ज्या अर्थी हे कोर्टात जायला तयार झाले, जीआर बाबत मुख्यमंत्र्यांना पत्र लिहायला लागलेत याचा अर्थ हा जीआर मराठ्यांसाठी खूप महत्त्वाचा आणि चांगला आहे, असे जरांगे म्हणाले.

**तुम्हाला अक्कल आहे का?**

तुम्हाला कल्पना द्यायला तुम्ही सरकारचे बाप आहात का? अशा शब्दांत मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. तिथे संविधानाच्या पदावर बसलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आहेत. हे सर्व वेडे, त्यांना अक्कल नाही आणि तुम्ही एकटेच शहाणे, तुम्हाला एकट्याला अक्कल आहे का? असा सवालही मनोज जरांगे यांनी विचारला.

आता सरकारने छगन भुजबळ यांच्या म्हणण्यावर कायदा चालवायचा का? तुम्ही एकटे सरकारला वेठीस धरत आहात का? असे प्रश्नही मनोज जरांगेंनी उपस्थित केले. देवेंद्र फडणवीसांनी भुजबळ यांना तुरुगांत पाठवले पाहिजे, अन्यथा ते सगळ्या सरकारला डाग लावतील, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला.

**भुजबळ अडथळा आणतात**

मराठा समाजाचे आणि सरकारचे सर्व काही चांगले होत आहे. पण छगन भुजबळ ते होऊ देणार नाही. जीआरला हात लावल्यास सरकारला शांत बसू देणार नाही, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

## ओबीसी आणि मराठ्यांचे ताट वेगळे पाहिजे : प्रकाश आंबेडकर



छत्रपती संभाजीनगर : मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण करत समाजाला आरक्षण मिळावे अशी मागणी लाऊन धरली होती. राज्य शासनाने जीआर काढत मनोज जरांगेंच्या आठ मागण्यांपैकी सहा मागण्या मान्य केल्या. परंतु, यानंतर राज्यातील ओबीसी समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली. मंत्री छगन भुजबळ यांनी देखील या शासन निर्णयाला विरोध केला. आता वंचितचे प्रकाश आंबेडकर यांनी देखील पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली आहे. सरकारने कायद्याला धरून निर्णय घेतला नसल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. सरकारचा निर्णय झाला त्यावेळी मी म्हणालो की सरकारने हा निर्णय कायद्याला धरून घेतलेला नाही. ओबीसी आणि मराठा यांचे ताट वेगळे असले पाहिजे. यावेळी त्यांनी औरंगाबाद खंडपीठाच्या जजमेंटचा दाखला दिला. सर्व मराठा समाजाला ओबीसी म्हणून संबोधता येत नाही, असे त्यात नमूद करण्यात आले होते आणि यावर सुप्रीम कोर्टाने शिक्कामोर्तब झाला आहे, असे त्यांनी म्हटले. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांनी पत्रकार परिषद घेत आपले मत मांडले आहे.

# स्पेक्स २०३० उपक्रमाद्वारे गडचिरोलीतील नागरिकांची होणार नेत्रसेवा : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**

गडचिरोलीसारख्या आदिवासी व मागास जिल्ह्यांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याविषयी जनजागृती व उपचार पोहोचविण्यासाठी तसेच तेथील नागरिकांना परवडणाऱ्या व गुणवत्तापूर्ण नेत्रसेवा उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात येत आहे. राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि जागतिक आरोग्य संघटना यांच्या "स्पेक्स २०३०" या प्रकल्पामुळे मुलांचे शिक्षण, तरुणांसाठी रोजगार व संपूर्ण समाजाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणारा हा उपक्रम महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात राबविण्यात यावा, असे आवाहन केले. जागतिक आरोग्य संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी तालुका आता डोळ्यांसंदर्भातील आरोग्यसेवेच्या दृष्टीने देशभरात आदर्श ठरणार आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या स्पेक्स २०३०- वन साईट कार्यक्रम राज्य सरकारच्या आरोग्य विभाग आणि वन साईट एसीलॉर लक्सोटिका फाऊंडेशन यांच्या सहकार्याने गडचिरोलीसह देशातील पाच मागास जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम राष्ट्रीय अंधत्व निवारण व दृष्टिदोष नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत राबविला जाणार आहे.

जगभरात २.२ अब्ज लोकांना दृष्टीदोषाचा त्रास असून, त्यातील किमान १ अब्ज प्रकरणे टाळता येऊ शकतात. भारतात जवळपास ५३ टक्के दृष्टिदोष हे अपूर्ण दृष्टिदोष दुरुस्तीमुळे निर्माण होतात. यामध्ये प्रत्येक दहा शाळकरी मुलांपैकी एका मुलाला दृष्टीविषयक समस्या भेडसावते. या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेमार्फत स्पेक्स २०३० ही योजना सुरु करण्यात आली असून २०३० पर्यंत सर्वसामान्यांना स्वस्त व दर्जेदार चष्म्यांचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेमार्फत गडचिरोलीसह आसाम (धुब्री), ओडिशा (कलाहांडी), राजस्थान (अलवर) आणि उत्तर प्रदेश (प्रयागराज) या राज्यांतील निवडक भागांमध्ये आशा किरण मॉडेलच्या आधारे सेवा राबवली जाणार आहे. या मॉडेलमध्ये आशा सेविकांमार्फत घराघरात प्राथमिक नेत्रतपासणी, प्राथमिक आरोग्य केंद्रांवर रेफ्रॅक्शन व चष्म्यांचे वितरण तसेच शासकीय रुग्णालयांत मोतीबिंदू शस्त्रक्रिया अशा सर्व टप्प्यांवर नेत्रआरोग्यसेवा पुरवली जाणार आहे. या कार्यक्रमांतर्गत स्थानिक आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व क्षमता वृद्धी, समुदायामध्ये जनजागृती मोहीम, शाळा व ग्रामपंचायत पातळीवर आरोग्यविषयक संवाद, स्थानिक स्वयंसेवी संस्था व माध्यमांद्वारे प्रचार-प्रसार तसेच कार्यक्षमता व परिणामकारकता मोजण्यासाठी डेटा संकलन व विश्लेषण अशा विविध उपक्रमांची अंमलबजावणी केली जाणार आहे.

## दोन ट्रकची धडक होऊन चालक आणि क्लिनरचा मृत्यू



■ **महासागर प्रतिनिधी, शहापूर, दि. ९ :**

शहापूर तालुक्यातील कासगाव परिसरात समृद्धी महामार्गावर मध्यरात्रीच्या सुमारास भीषण अपघात झाला. या अपघातात दोन ट्रकची धडक होऊन ट्रक चालक आणि क्लिनर या दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. नागपूरहून मुंबईच्या दिशेने जात असताना ही दुर्घटना घडली. अपघातानंतर महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती.

प्राथमिक माहितीनुसार, महामार्गाच्या कडेला एक ट्रक बंद पडल्याने तो उभा होता. त्याच वेळी मागून येणाऱ्या दुसऱ्या ट्रकच्या चालकाला डुलकी लागल्याने वाहनावरील नियंत्रण सुटले. झोपेच्या झटक्यात चालवलेल्या ट्रकने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की ट्रकमधील लोखंडी एंगल समोरच्या ट्रकच्या केबिनमध्ये शिरले. यातच चालक व क्लिनर दोघांचाही जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच जीव रक्षक पथक घटनास्थळी दाखल झाले आणि मदतकार्य सुरू केले. अपघातग्रस्त ट्रकमधून चालक व क्लीनरचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना शवविच्छेदनासाठी शहापूर उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले.

## भाजपला पैशांची चटक लागलीय : संजय राऊत



मुंबई : देशाच्या उपराष्ट्रपती पदासाठीची निवडणूक आज होणार आहे. तसेच एनडीए आघाडीकडून महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना उमेदवारी देण्यात आली आहे, तर इंडिया आघाडीकडून बी. सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सकाळी 10 वाजता या निवडणुकीला सुरुवात झाली आहे. यावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया देत केंद्र सरकारवर टीका केली आहे. भाजपला पैशांची चटक लागली असल्याची खोचक टीका राऊत यांनी केली आहे. संजय राऊत म्हणाले, उपराष्ट्रपती पदासाठीची ही निवडणूक ही संविधानाप्रमाणे झाली पाहिजे. पण, भाजपला पैशांची चटक लागली आहे. इंडिया आघाडीची सर्व मते ही ठाम आहेत. अर्थात काही विरोधी पक्षातले लोक आहेत, त्यांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला. त्यांच्यावर दबाव होता. बीजेडी, अकाली दल, तेलंगणा राष्ट्रसमिती हे भाजपकडून उभे आहेत. हे पक्ष उपराष्ट्रपती पदासाठी निवडणूक करण्यासाठी तयार नाहीत, असेही राऊत यांनी म्हटले आहे. पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, ते तीन पक्ष तटस्थ राहिले हेच भाजपचे अपयश आहे.

## दोन पोलिसांना मोटारगाडीची धडक

### एकाचा मृत्यू, महिला पोलीस जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**

वरळी येथे बंदोबस्तासाठी तैनात असलेले हवालदार दत्तात्रेय कुंभार (५२) आणि महिला पोलीस शिपाई रिद्धी पाटील यांना मंगळवारी सकाळी मोटारगाडीने धडक दिली. दोघांनाही तात्काळ वॉकहार्ट रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र कुंभार यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर महिला पोलीस शिपाई रिद्धी पाटील यांच्यावर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. याप्रकरणी आरोपी चालक रामचंद्र राणे (४६) याला त्याच्या ग्रँड आय १० मोटारगाडीसह ताब्यात घेण्यात आले असून पुढील कारवाई सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



कुंभार व पाटील दोघेही वरळी परिसरात मंगळवारी सकाळी बंदोबस्तासाठी तैनात होते. वरळी-वांद्रे सागरी सेतू आणि सागरी किनारा मार्गाजवळ सकाळी ७.४५ च्या सुमारास हा भीषण अपघात झाल्याचे सूत्रांनी सांगितले. या अपघातानंतर हवालदार कुंभार यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. तर पाटील यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोघेही वरळी पोलीस ठाण्यात कार्यरत होते.

कुंभार आणि पाटील यांना धडक देणाऱ्या मोटारगाडीचा चालक रामचंद्र राणे याला पोलिसांनी ताब्यात घेण्यात आले असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल. चालकाची वैद्यकीय तपासणीही करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. तसेच राणेची ग्रँड आय १० मोटारगाडीही ताब्यात घेण्यात आली आहे.

### मंत्री शिरसाटांनी बिवलकरांना मुंबईत १५ एकर जमीन दिल्याचा आरोप

## रोहित पवारांवर मानहानीचा खटला दाखल करणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**

मंत्री संजय शिरसाट यांनी सिडकोचे अध्यक्षपद मिळताच सारे नियम धाब्यावर बसवून ब्रिटिशांना मदत करणाऱ्या बिवलकर कुटुंबाला नवी मुंबईत 15 एकर जमीन दिली. हा 5 हजार कोटींचा भ्रष्टाचार आहे, असा आरोप राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला होता. यावर बिवलकर कुटुंबाने प्रतिक्रिया देत आता रोहित पवारांवर मानहानीचा खटला दाखल करण्याची भूमिका त्यांनी घेतली आहे.



पत्रकार परिषद घेत बिवलकर कुटुंबाने याबद्दल माहिती दिली आहे. ते म्हणाले, रोहित पवारांनी माज्यावर लूकआऊट नोटीस जारी करण्याची मागणी केली होती. यावर मी आता त्यांना मानहानीची हजार कोटी रुपयांची नोटीस पाठवणार आहे. मी देश सोडून जाईल म्हणून माज्या विरोधात लूकआऊट नोटीस पाठवण्याची मागणी त्यांनी केली होती. मी तुम्हाला सांगतो माज्याविरोधात अद्यापपर्यंत एकही एनसी नाही. माज्यावर फसवणुकीचे कोणतेही आरोप नाहीयेत, कुठलेही गैरप्रकार केल्याचा देखील माज्यावर आरोप नाही, असे बिवलकरांनी म्हटले आहे.

मंत्री संजय शिरसाट यांनी सिडकोचे अध्यक्षपद मिळताच सारे नियम धाब्यावर बसवून ब्रिटिशांना मदत करणाऱ्या बिवलकर कुटुंबाला नवी मुंबईत 15 एकर जमीन दिली. हा 5 हजार कोटींचा भ्रष्टाचार आहे, असा आरोप रोहित पवार यांनी केला होता. तसेच बिवलकर कुटुंबाने मराठा साम्राज्याविरोधात ब्रिटिशांना मदत केली होती. त्याच कुटुंबाच्या वारसांवर मंत्री संजय शिरसाट यांनी या कोट्यवधींचा जमिनीची खैरात उधळल्याचा आरोपही रोहित पवार यांनी केला आहे.

सोमवारी पत्रकार परिषदेत रोहित पवार म्हणाले की, इस्ट इंडिया कंपनीस केलेल्या निष्ठावान सेवेबद्दल आणि मराठा साम्राज्याविरूद्धच्या युद्धात दिलेल्या सहाय्याबद्दल राजकीय इनाम (संरजान इनाम) म्हणून 4078 एकरपेक्षा जास्त जमीन बिवलकर कुटुंबाला 1816-17 मध्ये देण्यात आली होती.

मात्र, बॉम्बे सरंजाम्स, जाहागिरी व अन्य इनामे (राजकीय स्वरूपातील) पुनर्प्राप्ती नियम 1952 नुसार सर्व राजकीय इनामे सरकारच्या मालकीची झाली, असेही रोहित पवार यांनी सांगितले. पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले की, मराठा साम्राज्याविरोधात ब्रिटिशांना मदत केल्याप्रकरणी नवी मुंबई परिसरातील सुमारे 4 हजार एकरहून अधिक जमीन ब्रिटिशांनी बिवलकर नावाच्या कुटुंबाला दिली होती.

## दमदाटी व शिवीगाळ प्रकरणी नांदेडच्या माजी नगरसेविकेला अटक

**नांदेड :** नांदेडच्या माजी नगरसेविकेने सोमवारी दमदाटी, जातीवाचक शिवीगाळ करून मारण्याचीही धमकी दिल्यानंतर या प्रकरणी पोलिसांनी रात्री उशिरा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली.गुन्हा दाखल झालेल्या आरोपी आणि फियार्दी यांच्यात भ्रमणध्वनीवरून झालेल्या संभाषणाची ध्वनीफित सर्वत्र प्रसृत झाल्यामुळे पोलिसांनी या घटनेची गंभीर नोंद घेऊन सदर ध्वनीफितीवरून कोणीही अफवा पसरवू नये व संयम राखावा, असे एका स्वतंत्र प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले. सदर महिलेविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई केली जात असल्याचेही पोलीस विभागाने स्पष्ट केले. वरील प्रकरणाची थोडक्यात माहिती अशी की, आरोपीच्या शेतातील विद्युत पुरवठा खंडित झाला असून त्याच्या दुरुस्तीसाठी त्यांनी फियार्दी नोंदणीकृत व्यावसायिक-कंत्राटदार यांना त्यांच्या भ्रमणध्वनीवरून संपर्क साधला असता, या संभाषणादरम्यान आरोपीनी फियार्दीस अतिशय अश्लील भाषेमध्ये शिवीगाळ केल्याचे तसेच त्याला जीवे मारण्याची धमकी दिल्याचे प्रसृत झालेल्या ध्वनीफितीवरून निदर्शनास आले. फियार्दी यांनी वरील प्रकारानंतर विमानतळ पोलीस ठाण्यामध्ये रीतसर तक्रार नोंदविल्यानंतर पोलिसांनी भा.न्या.सं.च्या कलम २९६, ३५३ (२), ३५१ (४) अनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सोमवारी रात्री उशिरा पार पाडली. आरोपी यांचे दिवंगत पती पाटबंधारे खात्यात कार्यकारी अभियंता पदावर होते. त्यांची एक कन्या तहसीलदार आहे. आपल्या पतीच्या हुद्याचा उल्लेख करून त्यांनी फियार्दीस दमदाटी केल्याचे दिसून आले.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर बलात्कार

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ९ :**

लग्न करण्याचे आमिषाने २४ वर्षीय तरुणीवर बलात्कार करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी चंदननगर पोलिसांकडून आरोपी तरुण विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. अरबाज रशीद शेख (वय २७, रा. जयहिंद चौक, साईनाथनगर मूळ रा. कसाई गल्ली, बारामती, जि. पुणे) असे गुन्हा दाखल केलेल्या आरोपीचे नाव आहे. याबाबत एका तरुणीने चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि आरोपी शेख याची काही महिन्यांपूर्वी सोशल मीडियावर ओळख झाली होती. आरोपीनेलग्न करण्याचे आमिष दाखवून तिच्या सोबत प्रेमाचे नाटक केले.

# ठाण्यात भाजपला धक्का

## ८ नगरसेवकांचा शिवसेना शिंदे गटात प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी, ठाणे, दि. ९ :**

आगामी महानगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात अनेक घडामोडी घडताना दिसत आहेत. सर्वच राजकीय पक्षांनी रणनीती आखणे तसेच मोर्चेबांधणी सुरू केली आहे. आपला पक्ष स्थानिक पातळीवर वाढवण्याचे देखील जोरदार प्रयत्न सुरू आहेत. त्यातूनच पक्षात इनकमिंग आणि आऊटगोइंग सुरू झाले आहे. महायुतीतील घटक पक्षात देखील एका पक्षातून दुसऱ्या पक्षात येणे-जाणे सुरू असल्याचे दिसत आहे.



ठाणे जिल्ह्यातील मुरबाड नगरपंचायतीमध्ये मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. नगरपंचायतीतील 17 पैकी भाजपच्या 'परिवर्तन पॅनल'मधील तब्बल ८ नगरसेवकांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केला आहे. या पक्ष प्रवेशामुळे भाजपला मोठा धक्का बसला असून, मुरबाडमधील राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

या नगरसेवकांनी भाजपने विकासकामांसाठी निधी न देणे आणि जाणूनबुजून कामे अडवून ठेवणे, याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विकासाभिमुख कार्यशैलीने आणि जनसंपर्कानें प्रेरित होऊन हा निर्णय घेतल्याचे सांगितले. या पक्षप्रवेशावेळी शिवसेना नेते प्रकाश पाटील, उपनेते रुपेश म्हात्रे, जिल्हाप्रमुख देवानंद थळे आणि मारुती धिरडे उपस्थित होते.

भिवंडीतील पडघा येथे शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या उपस्थितीत अनेक पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. यामध्ये माजी नगराध्यक्ष रामभाऊ भगवान दुधाळे, उपनगराध्यक्षा दीक्षिता विकास वारघडे, गटनेते मोहन भालचंद्र गडगे, बांधकाम सभापती उर्मिला सुजित ठाकरे, पाणीपुरवठा सभापती स्नेहा सागर आंबवणे, नगरसेविका नम्रता नंदकुमार जाधव, रविना विनायक राव आणि अनिता संतोष मारके यांचा समावेश आहे. त्यांच्यासह विकास वारघडे, सुजित ठाकरे आणि नंदकुमार जाधव यांसारख्या इतर कार्यकर्त्यांनीही शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. माजी नगराध्यक्ष रामभाऊ दुधाळे यांनी आपले मत व्यक्त करताना म्हटले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून जिल्ह्याचा खऱ्या अर्थाने विकास होताना आम्ही बघितला आहे.

## घराच्या मालकीवरून दोन गटात हाणामारी

### जखमी वृध्दाचा मृत्यू, ४ जणांना अटक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**

घराच्या मालकिच्या वादातून कांदिवली येथे दोन गटात तुफान हाणामारी झाली. या हल्ल्यात जखमी झालेल्या ६५ वर्षीय वृध्दाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. याप्रकरणी कांदिवली पोलिसांनी ४ जणांना अटक केली.

कांदिवलीच्या लालजीपाडा येथे राहणाऱ्या यादव आणि जोगेश्वरी येथे राहणाऱ्या चौहान कुटुंबियांमध्ये कांदिवली येथील एका घराच्या मालकीवरून वाद होता. याप्रकरणात पोलिसांकडेही तक्रार अर्ज देण्यात आले होते.

हा वाद मिटला नव्हता. चौहान कुटुंबातील १० ते १५ जण शुक्रवार ४ सप्टेंबर रोजी यादव यांच्या घरात जबरदस्तीने घुसले. त्यांनी घरावर दावा करत यादव कुटुंबावर काठ्या, बांबू, आणि दांडक्याने हल्ला केला. यावेळी यादव आणि चौहान कुटुंबियांत हाणामारी झाली. मात्र चौहान कुटुंबातील सदस्य मोठ्या संख्यने होते आणि ते हल्ला करण्याच्या उद्देशाने तयारीने आले होते. त्यांनी यादव कुटुंबियांना बेदम मारहाण केली. या हल्ल्यात यादव कुटुंबातील ५ जण जखमी झाले. रामलखन यादव (६५) या हल्ल्यात गंभीर जखमी झाले होते.

रुग्णालयात उपचारा दरम्यान मृत्यू यादव यांना सुरवातीला उपचारासाठी कांदिवलीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर (शताब्दी) रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

उपचारानंतर त्यांना सोडण्यात आले. मात्र दुसऱ्या दिवशी छातीत दुखू लागल्याने त्यांना ५ सप्टेंबर रोजी पुन्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु अतिदक्षता विभागात उपचार सुरू असताना यादव यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणी चार आरोपींना अटक केली असून अन्य आरोपींचा शोध सुरू असल्याचे कांदिवली पोलिसांनी सांगितले. सुरुवातीला कांदिवली पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९(१) (खून करण्याचा प्रयत्न) आणि इतर कलमान्वये गुन्हा दाखल केला होता.

मात्र यादव यांच्या मृत्यूनंतर कलम १०३ (२) (हत्या) वाढवण्यात आले. न्यायालयाने आरोपींना १२ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## गणेशोत्सवादरम्यान जमा झालेल्या साडे पाच टन निर्माल्यापासून खतप्रक्रिया सुरू

■ **महासागर प्रतिनिधी पालघर, दि. ९ :**

गणेशमूर्तीचें विसर्जन झाल्यानंतर गणेशकुंड, नवली तलाव तसेच विसर्जन घाटावरून जवळपास साडे पाच टन निर्माल्य नगर परिषदेकडून संकलित करण्यात आले आहे. या निर्मल्यातून प्लॅस्टिक व इतर कचरा वेगळा करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील १५ दिवसात यातून खत निर्मिती होणार आहे.



शनिवारी रात्री उशिरा संपन्न झालेल्या विसर्जन मिरवणुकीनंतर विसर्जन घाट, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे परिसर, विसर्जन मिरवणुकांचे मार्ग या ठिकाणी विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. विसर्जनानंतर पाण्यातील निर्माल्य तसेच निर्माल्य कलश मधील निर्माल्य जमा करून ते साठविण्यात आले. विसर्जन स्थळांवर जमा झालेल्या साडे पाच टन निर्माल्यपासून पर्यावरणाच्या दृष्टीने सेंद्रिय खत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. निर्माल्याचे संकलन करण्यासाठी विसर्जन घाटांवर निर्माल्य कलश उभारण्यात आले होते. पालघर रेल्वे स्थानकापासून हुतात्मा चौक, कचेरी रोड, जुना मनोर रोड व पुढे गणेशकुंडाकडे जाणाऱ्या मार्गांवर फटाके, पताके तसेच इतर सजावटींच्या कागदांचे तुकडे यासह पाण्याच्या बॉटल, खाद्यपदार्थांच्या प्लेट, ग्लास असा अनेक कचरा पडला होता. नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाने कार्यक्षेत्रातील विविध ठिकाणी भेट देत स्वच्छता विषयक कार्यवाहीचा आढावा घेऊन परिसर स्वच्छ करण्यात आला.

कृत्रीम तलाव व विसर्जन स्रोतातून निघणारे निर्माल्य यांचे पावित्र्य राखून खत निर्मितीसाठी पाठविले आहे. या निर्माल्यापासून तयार झालेले सेंद्रिय खत नगरपरिषद क्षेत्रातील उद्यानांमध्ये वापरण्यात येणार असून इतर नागरिकांना हे खत हवे असल्यास पाच रुपये किलो दराने नगरपरिषद येथून घेऊन जाण्याचे आवाहन मुख्याधिकारी नानासाहेब कामठे यांनी केले आहे.

निर्माल्य नगर परिषद कार्यालयाच्या मागील जागेत खत निर्मितीसाठी ठेवण्यात आला आहे. यामध्ये असलेले प्लास्टिक हार, पिशव्या तसेच हारामध्ये वापरण्यात येणारे प्लास्टिक चेंडू व इतर अविघटनशील पदार्थ वेगळे करण्याचे प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर या निर्माल्य मधील केळीचे पान, फुलं यावर बायो कल्चर हे पावडर टाकून खत निर्मितीच्या प्रक्रियेसाठी ठेवण्यात येणार आहे.

# सरकारचा शिवभोजन थाळीचे पैसे बुडवण्याचा ध्यास

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :**

राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारने शिवभोजन थाळी नेटाने चालवणाऱ्याचे पैसे बुडवण्याचा ध्यास घेतल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या प्रकरणी त्यांनी राज्यातील 1800 केंद्रांचे 200 कोटी रुपये थकल्याचा दावाही केला आहे.

तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने 26 जानेवारी 2020 रोजी राज्यात शिवभोजन थाळी योजना सुरू केली होती. या योजनेंतर्गत गरीब व गरजू व्यक्तींना परवडणाऱ्या दरात पौष्टिक जेवण उपलब्ध करून देण्यात येते. अवघ्या 10 रुपयांत लाभार्थ्यांना 2 चपात्या, 1 वाटी भाजी, 1 वाटी वरण व भात असा संतुलित आहार मिळतो. या योजनेचा कोरोना काळात लाखो नागरिकांना मोठा आधार मिळाला होता. पण आता वाढती महागाई,




### ठाकरे गटाच्या अंबादास दानवे यांचा आरोप

अपुरे अनुदान यामुळे ही योजना संकटात सापडली आहे. विशेषतः अनेक जिल्ह्यातील शिवभोजन थाळी केंद्रांना सरकारकडून मिळणारे अनुदान थकले आहे.

या पार्श्वभूमीवर अंबादास दानवे यांनी सरकारवर राज्यातील 1800 केंद्रांचे 200 कोटी थकलवल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी त्यांनी महायुती सरकारवर विशेषतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, शिवभोजन ही 'झुणका भाकर' या हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेवर आधारित. गरिबाला स्वस्तात दोन घास सुखाचे मिळावेत हा त्याचा उद्देश.

बाळासाहेबांच्या विचारांचा मुखवटा घालून फिरणारे त्यांच्याच संकल्पनेला राजरोस हरताळ फसतात! शिवभोजन थाळी नेटाने चालवणाऱ्याचे पैसे बुडावण्याचा ध्यास आता सरकारने घेतलेला आहे.

1800 केंद्रांचे 200 कोटी थकीत आहेत. पवार-फडणवीस यांना याच्याशी देणेघेणे नाही. ज्याची तसबीर घेऊन गुवाहाटीला पळ काढलात, किमान त्यांच्या संकल्पनेशी तरी इमान राखा, असे ते म्हणालेत.

# झेडपीच्या महिला कर्मचाऱ्यांनी घेतला लाडकी बहिण योजनेचा गैरलाभ

### चार-पाचकर्मचाऱ्यांवर कारवाई होणार




■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ९ :

सरकारी, निमसरकारी कर्मचारी किंवा शासकीय योजनांमध्ये कार्यरत कर्मचारी महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ घेता येत नाही. परंतु खरी माहिती लपवून काहींनी असा प्रताप केला आहे. यामध्ये जिल्हा परिषदेच्या कर्मचारी महिलांचाही समावेश आहे. अशा चार-पाच महिला कर्मचारी रडारवर आल्या असून येत्या आठवडाभरात याबाबतचा अंतिम अहवाल उघड होणार आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेच्या सर्व सीडीपीओंना कामाला लावण्यात आले असून यापूर्वी या मदतीपासून दूर सारण्यात आलेल्या ६१ हजार महिलांबाबतचाही निकालही याच अहवालातून पुढे येणार आहे.

एकाच कुटुंबातील दोनपेक्षा अधिक लाभार्थी, वयोमर्यादेचे उल्लंघन, घरात चारचाकी वाहन, सरकारी किंवा निमसरकारी पदावर कार्यरत आणि मर्यादेपेक्षा अधिक उत्पन्न अशा कारणांमुळे शासनाने जिल्ह्यातील ६१ हजार लाडक्या बहिणींची 'रक्षाबंधन भेट' नाकारली आहे. ऐन सणासुदीच्या काळात घेतलेल्या या निर्णयामुळे त्या लाभार्थी महिलांना गेल्या महिन्याचे सन्मानधन मिळाले नाही. यामध्ये जिल्हा परिषदेच्या चार-पाच कर्मचारी महिलांचाही समावेश आहे. यापैकी एक महिला कर्मचारी ही अमरावती पंचायत समितीत कार्यरत असल्याची माहिती आहे. ही महिला सवलतीचा आधार घेऊन नोकरीला लागली असून तिने खरी माहिती लपवून लाडकी बहिण योजनेचा लाभ घेतल्याचे सांगितले जाते. याशिवाय इतर महिला कर्मचारी ह्या जिल्हा परिषदेच्या कायमस्वरुपी कर्मचारी नसून त्या कंत्राटी असल्याचा सूत्रांचा दावा आहे. जिल्ह्यात पात्र लाभार्थी महिलांची एकूण संख्या ६ लाख ९८ हजार आहे. त्यापैकी ६१ हजार महिलांना मदत नाकाल्याने त्यांच्यात रोष आहे. दरम्यान ज्या महिलांचा सन्माननिधी गेल्या महिन्यापासून नाकारला गेला त्यात तब्बल ४८ हजार महिला ह्या एकाच कुटुंबातील दोनपेक्षा जास्त लाभार्थी असलेल्यांपैकी आहेत. योजनेच्या अटी-शर्तीनुसार एका कुटुंबातील कोणत्याही दोन महिलांना (ज्यांचे वय १८ ते ६५ वर्षांदरम्यान आहे) सदर योजनेचा लाभ घेता येतो. मात्र हा नियम डावलून एकाच कुटुंबातील तीन-तीन महिलांनी अर्ज दाखल करुन लाडकी बहिणचा लाभ घेतला. आता पुन्हा त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी सुरु असून येत्या काळात यापैकी बऱ्याच महिला आणखी पात्रतेच्या यादीत समाविष्ट होणार आहेत. त्यासाठी अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून तालुक्याच्या ठिकाणी सीडीपीओंकडे डाटा संकलित केला जात आहे. हाच डाटा येत्या आवड्याअंती जिल्हा परिषद प्रशासनाकडे सादर केला जाणार आहे.

# घरोघर कचरा संकलनाचे काम खासगी कंपनीकडे घंटागाडी चालकाला द्यावा लागेल ५० रु. महिना

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ९ :

शहरातील वाढत्या कचऱ्याच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेने घरोघर कचरा संकलन खासगी कंत्राटदाराकडे सोपवले आहे. नागपूर येथील अर्बन एन्व्हायरो वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड या कंपनीला हे काम देण्यात आले असून, १ सप्टेंबरपासून कंपनीने कामाला सुरुवात केली आहे. कचरा संकलनासाठी येणाऱ्या घंटागाडी चालकाला प्रती घर ५० रुपये महिना द्यावा लागणार आहे.

दुकानदार, व्यावसायिकांना ६० तर मंगल कार्यालये, मोठे व्यावसायिक प्रतिष्ठाने, दवाखाने, संस्थांना १०० ते २०० रुपये असे शुल्क द्यावे लागेल.

दररोज शहरातील अंदाजे दीड लाख मालमत्तांकडून सुमारे १६० मेट्रिक टन कचरा संकलित करण्याचे लक्ष्य कंपनीला देण्यात आले आहे. यासाठी महापालिका दरमहा २७ लाख ५५ हजार रुपये, तर वर्षाकाठी ३ कोटी ३० लाख रुपयांचा खर्च करणार आहे. या खर्चातून महापालिकेला कुठलेही थेट उत्पन्न मिळणार नाही.

मात्र कचरा संकलनासाठी इंधन व मनुष्यबळावर होणारा खर्च वाचणार आहे.

शहरातील १ लाख ४० हजार मालमत्तांवर 'क्यूआर कोड' लावण्यात आले आहेत. घरातून कचरा घेतल्यावर स्वच्छतादूताला तो 'क्यूआर कोडब स्कॅन करणे बंधनकारक आहे.

तसेच चारही झोनचा रूट मॅप महापालिकेने तयार केला आहे. कचरा उचलण्यात त्रुटी राहिल्यास किंवा तक्रार आल्यास महापालिकेला कंत्राटदारावर दंड करण्याचा अधिकार राहणार आहे.



दुकानदार, व्यावसायिकांना ६० तर मंगल कार्यालये, मोठे व्यावसायिक प्रतिष्ठाने, दवाखाने, संस्थांना १०० ते २०० रुपये असे शुल्क द्यावे लागेल

# बुजवलेले खड्डे पावसामुळे पुन्हा उखडले वाहनधारकांना अपघाताची भीती

■ महासागर प्रतिनिधी,
मारेगाव, दि. ९ :



करंजी ते घुग्गुस या महामार्गावर पुन्हा एकदा मोठे खड्डे पडले असून नागरिकांच्या सुरक्षिततेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पंधरा दिवसांपूर्वीच या खड्डयांना बुजवण्यात आले होते. मात्र अल्पावधीतच ते 'जैसे थे' झाले आहेत. या खड्डयांमुळे अपघाताची शक्यता मोठ्या प्रमाणात वाढली असल्याने वाहनधारकांत भीती आहे.

या महामार्गाच्या निर्मितीसाठी तब्बल ५५० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला होता. एवढी मोठी रक्कम खर्चूनही महामार्गाची अवस्था बिकट झाली आहे.

कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे चित्र यातून स्पष्ट होत आहे. दुचाकीस्वार, चारचाकी वाहनधारक तसेच या मार्गाने जाणाऱ्या सर्व प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. एवढ्या मोठ्या निधीचा उपयोग करूनही रस्ते का टिकत नाहीत? जबाबदार कोण? प्रशासनाने आणि संबंधित विभागाने याची तातडीने दखल घायला हवी अशी नागरिकांची मागणी होत आहे. पावसाळ्याच्या दिवसात या खड्डयांमुळे अपघातांचा धोका निर्माण झाला आहे.

त्यामुळे तातडीने दुरुस्ती करून पुन्हा खड्डे पडणार नाहीत, याची खात्री संबंधित विभागाने द्यावी, अन्यथा होणाऱ्या अपघातांना तेच जबाबदार असतील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# यवतमाळात घरोघरी डास अळ्यांचा शोध!

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. ९ :



हातात टॉर्च आणि टेमिफॉसचे द्रावण घेऊन शहरातील गल्ल्यांमध्ये १५० महिलांची फौज घरोघरी जाऊन डास अळ्यांचा शोध असल्याचे हे चित्र आहे शहराने डेंग्यूविरुद्ध पुकारलेल्या प्रभावी युद्धाचे. जिल्हा हिवताप कार्यालय आणि नगरपरिषदेने 'वस्तीसेविकां'च्या माध्यमातून घरोघरी जाऊन डास उत्पत्तीस्थाने नष्ट करण्याची मोहीम युद्धपातळीवर हाती घेतली असून, त्याचे सकारात्मक परिणाम दिसू लागले आहेत. सन २०२३ मध्ये यवतमाळ शहरात ६६ डेंग्यू रुग्ण आढळल्याने आरोग्य यंत्रणेपुढील आव्हान वाढले होते. यावर मात करण्यासाठी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. तन्वीर शेख यांनी वस्तीसेविकांच्या नियुक्तीची संकल्पना मांडली. या उपक्रमामुळे २०२४ मध्ये रुग्णसंख्या घटून केवळ १४ वर आली. या यशाच्या पार्श्वभूमीवर, २०२५ मध्ये जिल्हाधिकारी विकास मिना, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मंदार पत्की आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अधिक व्यापक करण्यात आला आहे. १५० वस्तीसेविका शहरातील ७३ हजार ४९० घरांमध्ये महिन्यातून दोनदा सर्वेक्षण करत आहेत. घरातील पाण्याची भांडी, कुंड्या, टायर्स तपासून डासअळ्या नष्ट करणे आणि नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचे काम त्या करत आहेत. जुलै ते ऑक्टोबर या कालावधीत ही मोहीम अविरत सुरू राहणार असून, यामुळे डेंग्यू नियंत्रणात यश मिळत असल्याचा विश्वास डॉ. तन्वीर शेख यांनी व्यक्त केला आहे. वस्तीसेविकांचे काम अत्यंत सूक्ष्म पातळीवर चालते. त्या घरातील पाण्याची भांडी, टाक्या तर तपासतातच, शिवाय अनेकदा दुर्लक्षित होणारे फ्रिजच्या मागील ट्रे, फुलदाण्या, कुंड्यांखालील ताटल्या आणि परिसरातील टाकाऊ वस्तूही तपासतात. जिथे डासअळी आढळेल, ती जागा त्वरित रिकामी केली जाते किंवा औषधाने निर्जंतुक केली जाते. डासांची उत्पत्ती मुळातच रोखण्याची ही पद्धत सर्वाधिक प्रभावी ठरत आहे. यामुळे शहरातील डासांची उत्पत्ती रोखण्यात हिवताप विभागाला बऱ्यापैकी यश आले आहे. सध्या दवाखाने डेंग्यू तापाच्या रुग्णांनी खचाखच भरले आहेत. अशावेळी ही मोहीम तापाचे आजार रोखण्यासाठी सहाय्यकारी ठरत आहे. डेंग्यूचा फैलाव 'एडिस इजिप्टाय' नावाचा डास करतो. त्याच्या अंगावर काळे-पांढरे पट्टे असल्याने त्याला 'टायगर मॉस्क्यूटो' असेही म्हणतात. हा डास दिवसा चावतो आणि घरातील स्वच्छ साठवलेल्या पाण्यात अंडी घालतो. पाण्याच्या टाक्या, कुलर, कुंड्या आणि भंगार साहित्यात साचलेले पाणी त्याच्यासाठी सर्वोत्तम उत्पत्तीस्थाने आहेत. त्यामुळे आठवड्यातून एकदा 'कोरडा दिवस' पाळणे अत्यंत महत्वाचे आहे.

# गणेश विसर्जनासाठी गेलेल्या तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. ९ :



गणेशाचे मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी तलावावर गेलेल्या एका तरुणाचा खोल पाण्यात बुडून मृत्यू झाला तर दुसऱ्याचा मंडळाच्या कार्यकर्त्यांमुळे व नागरिकांच्या सतकर्तेमुळे प्राण वाचल्याची घटना वझर गावाजवळील तलावात घडली.

वझर गावातील एका सार्वजनिक गणेश मंडळाच्या मूर्तीचे विसर्जन असल्याने गावातील पवन गणेश मोहिते (वय २१), रोशन नामदेव मोहिते यांच्यासह मंडळाचे काही कार्यकर्ते मूर्ती विसर्जना करता तलावात घेऊन गेले होते. पवन व रोशन हे दोघे मूर्ती पाण्यात सोडत असताना तोल जाऊन ते पाण्यात बुडाले.

ही घटना तेथे हजर असलेल्या मंडळाच्या कार्यकर्त्यांना व काही लोकांच्या लक्षात आली. त्यामुळे काही जणांनी जीवाची पर्वा न करता पाण्यात उतरून दोघांचा शोध घेणे सुरू केले असता रोशनला पाण्यातून बाहेर काढले.

त्यावेळी तो बेशुद्ध अवस्थेत होता. काही लोकांनी समय सूचकता दाखवत त्याच्या पोटातील पाणी बाहेर काढले त्यामुळे तो शुद्धीवर आला आणि त्याचे प्राण वाचले. मात्र पवन मोहिते याला पोहणे येत नसल्यामुळे तो खोल पाण्यात बुडाला. अंधार झाल्याने गावातील लोकांनी तहसीलदार सुनील पाटील यांना या घटनेची माहिती दिली. त्यांनी तात्काळ एसएसडीआरएफ टीमला घटनास्थळी पाठवले. या टीम मधील लोकांनी पाण्यात शोध घेऊन पवनला तलावातून बाहेर काढले असता तो मरण पावला होता. याप्रकरणी हिवरखेड पोलिसांनी करण मोहिते यांच्या तक्रारीवरून पवन याच्या मृत्युप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास ठाणेदार चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेडकॉन्स्टेबल विलास साखरे करत आहेत.

# शेतातील झुडपात बिबट्याचा मृतदेह

## वन विभागात खळबळ : मृत्यूचे कारण अस्पष्ट

■ महासागर प्रतिनिधी,
चंद्रपूर, दि. ९ :




सावली वनपरिक्षेत्रातील मूल तालुक्यातील टेकाडी येथे सुनील गेडाम यांच्या पोल्ट्री फार्मच्या बाजुच्या शेतातील झुडपात बिबट मृतावस्थेत मिळाल्याने वन विभागात खळबळ उडाली आहे. बिबट्या शेतातील झुडपात दडुन असल्याची माहिती स्थानिक वनरक्षक यांना मिळाली. चंद्रपूर वनविभागाचे विभागीय वनाधिकारी तलमले, सहाय्यक उपवनसंरक्षक तरसे, सावली वनपरिक्षेत्र अधिकारी धुर्वे यांच्या सुचनेनुसार बिबट्याला पकडण्याचा निर्णय घेण्यात आला. चंद्रपूर टी.टी.सी.चे डॉक्टर तथा अतिशीघ्र कृती दल चे कर्मचारी, वनकर्मचारी व संजीवन पर्यावरण संस्था मूलचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले.

बिबट्याला बेशुद्ध करून सुरक्षितपणे पकडण्याची तयारी करण्यात आली, परंतु झुडपात पहाणी करीत असतांना तो बिबट आधीच मृत झाला असल्याचे आढळले. ही माहिती वरिष्ठ वनाधिकारी यांना देण्यात आली व त्यांचे मार्गदर्शनात मृत बिबटला सावली वनपरिक्षेत्र कार्यालयात नेण्यात आले. डॉ. कुंदन पोडचलवार यांनी त्या मृत बिबट्याचे सहाय्यक उपवनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी सावली यांचे समक्ष शवविच्छेदन केले नंतर त्याचे दहन करण्यात आले. यावेळी डॉ. कुंदन पोडचलवार, क्षेत्र सहाय्यक एन.एस. सिडाम, वनरक्षक एस.डब्लू. बोनलवार, वनरक्षक लंकेश आखाडे, अतीशीघ्र कृती दलाचे शुटर अविनाश फुलझेले, किशोर डांगे, मनोज चावरे, अंकीत पडगेलवार, संजीवन पर्यावरण संस्था मूल चे उमेशसिंह झिरे, तरूण उपाध्ये, तन्मयसिंह झिरे, हौशिक मंगर अक्षय दुम्मावार टेकाडी पीआरटीची टीम व सहाय्यक वनमजूर उपस्थित होते.

# तरुणीने घेतला एसटी वाहकावर विनयभंगाचा आळ

## प्रवाशांसह बस पोहचली थेट पोलीस ठाण्यात

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा , दि. ९ :



एसटी बसमध्ये अनेकदा खचाखच गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना एकमेकांचा धक्का लागतोच. अशाच प्रवाशांनी खचाखच भरलेल्या बसमधील प्रवाशांना पुढे सरकवण्याचा प्रयत्नात चुकून वाहकाचा स्पर्श एक तरुणीला झाला. मात्र, सदर तरुणीने एसटी बस वाहकाने तिचा विनयभंग केल्याचा आरोप करीत कांगावा करण्यास सुरुवात केली. अखेर सर्व प्रवाशांसह बस थेट पोलीस ठाण्यात नेली. भंडारा जिल्ह्याच्या साकोली येथून एक खळबळजनक प्रकार समोर आला आहे. साकोलीकडून बोडदे गावाला जाणारी रात्रीची शेवटची एसटी बस असल्याने शालेय विद्यार्थी आणि प्रवाशांनी बस खचाखचं भरली होती. त्यानंतरही काही प्रवाशी बसखाली असल्याने बसमधील प्रवाशांना पुढे सरकवण्याचा प्रयत्नात चुकून वाहकाचा स्पर्श एक तरुणीला झाला. मात्र, सदर तरुणीनं एसटी बस वाहकानं तिचा विनयभंग केल्याचा आरोप केला. वाहकाने तिला चुकून धक्का लागल्याचे सांगितले मात्र ती काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हती. अखेर सर्व प्रवाशांसह बस थेट पोलीस ठाण्यात नेण्यात आली. यावेळी तरुणीच्या तक्रारीवरून साकोली पोलिसांकडे तक्रार केली. या तक्रारीवरून बसमधील सर्व प्रवाशांची चौकशी केली असता, असा प्रकार झाला नसल्याचं समोर आलं.

त्यानंतर तब्बल तासाभरानंतर तरुणीची खोटी तक्रार असल्याचं निष्पन्न झाल्यानं पोलिसांनी तरुणीला समज देत एसटी पुढील प्रवासाला निघाली. यात मात्र, बस मधील प्रवाशांना तासभर नाहक मनःस्ताप सहन करावा लागला. हा संपूर्ण प्रकार ८ सप्टेंबर रोजी रात्री भंडाऱ्याच्या साकोली एसटी आगारात घडला.

# विद्यापीठात मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजनेचा समारोप

### रिसर्च अँड इन्क्युबेशन फाऊंडेशन सेंटरचा उपक्रम



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ९ :

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात प्रशिक्षणाचा नुकताच समारोप झाला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य विभागाचे उपायुक्त श्री. द.ल. ठाकरे, सहआयुक्त श्रीमती प्रांजली बारस्कर,

इन्क्युबेशन सेंटरप्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर उपस्थित होते.

प्रशिक्षणा दरम्यान प्रशिक्षणार्थीना विद्यापीठातील विविध प्रशासकीय विभागांमध्ये व्यवस्थापकीय कामकाजाची प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाली.

यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात भर पडली असून, या माध्यमातून त्यांच्या पुढील भविष्यकालीन कौशल्य विकासातही भर पडणार आहे.

कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी प्रशिक्षणार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व सकारात्मक दृष्टिकोन कसा अंगीकारता येईल यावर मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख अतिथी श्री द.ल.ठाकरे यांनी कार्यक्रम आयोजकांचे कौतुक करुन प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर प्रशिक्षणार्थींनी सुध्दा यावेळी आपले अनुभव सांगितले.

# चंद्रपुरातील राजुरामध्येही मतचोरी

## काँग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी,
चंद्रपूर, दि. ९ :



भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगाच्या मदतीने हातात हात घालून मतचोरी केल्याचे एकाएका मतदार संघातील घोटाळे काँग्रेस पक्ष उघड करत आहे. राहुल गांधी यांनी महादेवपुरा मतदार संघातील मतचोरीचा पर्दाफाश करून भाजप व आयोगाची भ्रष्ट युती पुढे आणली आहे.

महादेवपुराप्रमाणे मतचोरीचा प्रकार चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा विधानसभा मतदारसंघातही झाला असून याप्रकरणी एफआयआरही दाखल करण्यात आला आहे पण ११ महिने झाले तरी अद्याप यावर कोणतीच कारवाई होत नाही. या मतचोरी प्रकरणी पुढील एका महिन्यात कारवाई करावी अन्यथा काँग्रेस पक्ष न्यायालयात दाद मागेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे, काँग्रेसचे माजी आमदार सुभाष धोटे यांनी दिला आहे.

गांधी भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत मतचोरीची माहिती देताना काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते अतुल लोंढे पुढे म्हणाले की, लोकसभा ते विधानसभा निवडणुकीच्या ५ महिन्यांच्या कालावधीत राजुरा मतदारसंघात ५५ हजार मतदारांची वाढ करण्यात आली. राजुरा मतदारसंघात १ ऑक्टोबर २०२४ ते १५ ऑक्टोबर २०२४ दरम्यान ११ हजार ६६७ ऑनलाईन बोगस मतदारांची नोंदणी करण्यात आली होती. यासंदर्भात काँग्रेसचे उमेदवार सुभाष धोटे यांनी रितसर तक्रार दाखल केल्यानंतर ६८५३ मते डिलिट करण्यात आली. याप्रकरणी एफआयआर ही दाखल करण्यात आला आहे.

पण पुढे काहीच कारवाई केलेली नाही. ही ऑनलाईन बोगस मतदार नोंदणी करण्यात आली त्याचे खड्ड रववीर्शी, शारळश्र ळव आणि मोबाईल नंबर ची माहिती द्यावी अशी मागणी करण्यात आलेली आहे पण आजपर्यंत ती देण्यात आलेली नाही. ही माहिती दिल्यास चोर कोण, हे उघड होईल म्हणून पोलीस व प्रशासन माहिती देत नाही. अतुल लोंढे पुढे म्हणाले की, राजुरा मतदारसंघातील भाजपच्या उमेदवाराकडे ६१ लाख रुपये व निवडणूक साहित्य सापडले. निवडणूक आयोगाच्या ऋडढ पथकाने ही कारवाई केली आहे, गडचांदूर पोलीस स्टेशनमध्ये या प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आलेला आहे. पण आजपर्यंत यावरही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही. मतचोरी प्रकरणी काँग्रेस उमेदवार सुभाष धोटे यांनी निवडणूक आयोग, चंद्रपूरचे जिल्हाधिकारी, पोलीस अधिक्षक यांच्याकडे वारंवार निवेदन देऊनही कारवाई संदर्भात काहीच हालचाल केली जात नाही. मतचोरी प्रकरणी काँग्रेस जनतेच्या न्यायालयात लढा देत आहेच पण न्यायालयातही लढा देऊ, असे लोंढे म्हणाले. चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व राजुरा मतदारसंघाचे माजी आमदार सुभाष धोटे यांनीही यावेळी मतचोरीप्रकरणाची सविस्तर माहिती दिली.

# अनुकंपा तत्वावरील १० हजार जागा भरणार

## स्पर्धा परीक्षा समन्वय समितीचा आक्षेप

**अमरावती :** राज्य सरकारच्या भरती प्रक्रियेत दुर्लक्षित असलेल्या अनुकंपा तत्वावरील भरतीचा अनुशेष भरून काढण्याचा निर्णय सरकारने घेतला असून विविध विभागांमध्ये सुमारे १० हजार जागा भरण्यात येणार आहेत. मात्र, स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने सरकारच्या या निर्णयावर आक्षेप नोंदवला आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीचे निधन झाले, तर सरकारने त्या कुटुंबासाठी पर्यायी व्यवस्था करावी, पण आमच्या लाखमोलाच्या नोकऱ्या का म्हणून फुकट द्याव्या?, असा सवाल स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने केला आहे. सोबतच शासनाने याबाबत लावकरच निर्णय जाहीर करावा, अशी विनंतीही समितीने केली आहे. राज्यभरात जवळपास ९ हजार ६५८ रिक्त जागा असून, या सर्व जागा भरण्यात येणार आहेत. राज्याच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर अनुकंपा तत्त्वावरील भरती होत असल्याने प्रतीक्षेत असलेल्या जवळपास दहा हजार उमेदवारांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेष म्हणजे, यावेळी चतुर्थ श्रेणीतील जागाही भरल्या जाणार आहेत. आतापर्यंत या श्रेणीतील बहुतेक पदे खासगी कंत्राटदारामार्फत भरण्यात येत होती. मात्र आता अनुकंपा वरील जागा थेट पात्र वारसांना मिळणार आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य आणि नोकरीच्या माध्यमातून सुरक्षितता मिळेल. ही नियुक्ती प्रक्रिया जिल्हा प्रशासनाच्या देखरेखीखाली पार पडणार आहे. १५ सप्टेंबर २०२५ पासून

जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही भरती सुरू होईल. यासोबतच सरकारने प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

**जाहीर प्रकटन**

अखिल भारतीय मराठा महासंघ, सार्वजनिक न्यास नोंदणी क्रमांक ६६९९, मुंबई या न्यासाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २८/०९/२०२५ रोजी सकाळी ११ वा. **श्री दत्त मंगल कार्यालय, रंकाळा तलाव, गगनबावडा रोड, जि. कोल्हापूर** या ठिकाणी आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेची नोटीस (सन २०२५-२८ करिता पदाधिकारी निवडणूक अधिसूचना जोडपत्रासह) विभागीय कार्यालय व प्रशासकिय कार्यालय तसेच www.marathamahasangh.org या संकेतस्थळावर प्रसिद्ध करून त्या त्या जिल्हा कार्यकारिणीस अलाहिदा पाठविणेत आलेली आहे.

(शिक्का) सही/- सरचिटणीस
अ. भा. मराठा महासंघ

# मराठी' तरूणांनी आता 'कार्यकर्ता' होऊ नये!

महाराष्ट्र नव्हे तर संपूर्ण देशातील राजकीय पक्षांचा कार्यकर्ता होणे आता मराठी तरूणांनी बंद केले पाहिजे. आई-वडिलांनी देखील आपल्या मुलांना राजकीय नेत्यांच्या मागे फिरणे बंद करा, असं सल्ला दिला पाहिजे. नेत्यांसाठी किंवा त्यांच्या पक्षासाठी तुरुंगाची वारी करणाऱ्या मुलांना आयुष्यभर अपयश येत असते. सध्या महाराष्ट्रात तर पक्ष कोणताही असो राजकीय पक्षांनी फक्त कार्यकर्ते वापरले, त्यांची सायंकाळची 'सोय' केली, पण आयुष्यभर सतरंज्या झटकायची जबाबदारी त्यांच्यावरच दिली. हाताच्या बोटावर मोजता येतील इतके कार्यकर्ते कदाचित उभे केले असतील. पण ते आयुष्यभर लाचारच बनले गेले आहेत. नवी पिढी त्या बाबतीत हुशार असली तरी नोकरीच्या व्यतिरिक्त त्यांची झेप पुढे जात नाही. अति हुशार तरुणांनी तर आपल्या बुद्धिमत्तेच्या बळावर अन्य प्रदेशात जाणे पसंत केले. त्यामुळे कुटुंबातील अन्य घटकांची प्रगती मात्र घटतच गेली. जी कोणी मराठी तरुणाई शिवसेना आणि मनसेचे समर्थन करणारी असतील, त्यांनी सध्या महाराष्ट्रातील परिस्थितीचे अवलोकन सखोल केले पाहिजे. परंतु शिवसेना आणि मनसेच्या विरोधातील तरुणांनी देखील ज्यांच्या मागे आपण उभे आहोत त्यांचाही अभ्यास केला पाहिजे. 'मराठी-मराठी' करून काहींनी अनेक पिढ्या बसुन खाता येतील, एवढी माया गोळा केलीय ही वस्तुस्थिती आहे. पण समोर काही वेगळे अन् समाधानकारक चित्र नाही. तरूणाई अजुनही त्यांच्या नेत्यांचे संदेश फॉरवर्ड करतेय, झेंडे मिरवतेय. मराठी मुद्दा, मराठी माणुस, मराठी अस्मिता यासाठी चाललेला लढा महाराष्ट्र पाहतोय. पण पोटापाण्याच्या प्रश्नावर मराठी माणसं रस्त्यावर का येत नाही? शिवसेनेची स्थापना १९६६ मध्ये झाली. हाच 'मराठी'चा मुद्दा घेऊन, मराठी माणसाला न्याय हक्कासाठी पहिल्यांदा दसरा मेळाव्यात बाळासाहेबांनी 'मद्रासी' विरोधात घोषणा दिली होती 'बजाव पुंगी हटाव लुंगी'. बाळासाहेब ठाकरे त्यांच्या जागेवर योग्य होते. कारण मराठी तरुणांनी व्यवसायात उतरावे व आपापल्या जागा नक्की कराव्या. पण तसे काही झाले का? त्यावेळी मेळाव्याहुन परतताना, शिवसैनिकांनी उडप्यांच्या हॉटेल्सवर हल्ले केले व ताकद दाखवून दिली. पण त्याचा परिणाम पुढे काय झाला, हे महाराष्ट्र व मराठी माणसं आज बघत आहे. आज २०२६ मध्ये म्हणजे तब्बल ६० वर्षांनी या मुंबई-महाराष्ट्रात, ह्याच शिवसेनेच्या नाकावर टिच्चुन याच मद्रास्यांचे लाखाच्या वर बार आणि रेस्टॉरंट आहेत. ही वस्तुस्थिती आपण नाकारणार का? मराठी माणसाला त्यावेळी हा व्यवसाय करण्याची संधी होती. कारण बाळासाहेब ठाकरे किंवा त्यांच्या संघटनेचे बळ मराठी माणसाच्या पाठीमागे ठाम उभे होते. आज मुंबई मराठी माणसाची असताना सर्वच व्यवसायावर बिगर मराठी माणसांचे वर्चस्व आहे. त्याला जबाबदार कोण ? याचे संशोधन कोण करणार ? मराठी जपलीच पाहिजे, मराठी माणूस जोपासलाच पाहिजे, पण त्यासाठी लढा देण्यासाठी मराठी माणसांमध्येच फूट पडलेली आहे, याकडे कोण लक्ष देणार?

महाराष्ट्रातील राजकीय पक्ष विविध जाती व धर्मांमध्ये विभागले गेले आहेत. मराठी माणूस मध्य मुंबईच्या बाहेर फेकला गेला ही वस्तुस्थिती आहे. बाहेरून आलेल्या परप्रांतीयांनी अफाट मेहनत करून मुंबईत प्रॉपर्टी घेतल्या व व्यवसायात बस्थान बसविले. त्यांचे ग्राहक कोण आहे, तर ते सर्व मराठी माणस आहेत.

बारकाईने लक्ष दिले तर सर्व मोठ्या व्यापारावर आज गुजराती समाजाचं वर्चस्व आहे आणि मराठी माणुस त्यांच्याकडे नोकर म्हणुन राबतोय ही वस्तुस्थिती अमान्य करून चालणार नाही. संपूर्ण भारत देश ही आपलीच भूमी आहे. नोकरी व व्यापार करण्यासाठी कोणी कुठेही जाऊ शकतो.

आपण युपी, बिहार मधल्या भैयां विरोधात एक बिहारी लाख बिमारी आंदोलन करून पाहिले. परंतु मुंबईत आज व्यवसाय असो किंवा रस्त्यावरचा, फुटपाथवरचा व्यापार करणारा युवक असो, तो एक तर बिहारी किंवा यूपीचाच दिसतो. रेल्वेमध्ये तर संपूर्ण नेटवर्क त्यांचेच दिसते. राजकीय पक्षांच्या नेत्यांचे कार्यकर्ते मात्र आहे तिथेच राहिले.


मुंबई महाराष्ट्रा पासुन वेगळी होणार असा प्रचार दीर्घ काळापासून सुरू आहे. परंतु आता मुंबई मराठी माणसांची राहिली तरी किती? मुंबईत गिरण्या असताना मराठी माणूस त्या गिरण्यांमध्ये नोकरी करून आपल्या मुलाबाळांना मुंबईत स्थिरस्थावर करीत होता. दत्ता सामंतांचा गिरणी कामगारांचा संप मराठी माणसांच्या मुळावर आला. त्यात 'गिरणी कामगार' पूर्णपणे देशोधडीला लागला.

मराठी माणुस मुंबई सोडुन विरार, नालासोपारा, बदलापुरला पळाला. दुसरीकडे पर-प्रांतीय मात्र ह्याच मुंबईत नुसता स्थिरावलाच नाही तर मजबुत झाला. एकेकाळी शिवसेना, कॉंग्रेस, जनसंघ, कम्युनिस्ट, समाजवादी पक्ष या सर्वांनीच



महाराष्ट्रात मराठी माणसांसाठी भूमिका घेतली. पण त्यांच्या काळातही हाती काहीच लागले नाही.

तोच 'मराठीचा मुद्दा' घेऊन, राज ठाकरेंनी २००६ मधे 'मनसे' ची स्थापना केली. आता



थर्ड अम्पायर

जयंत महाजन

jayantmahajansir@gmail.com

मोबा. ९४२०६११४२०

त्यालाही वीस वर्ष झाली. मराठीची परिस्थिती तीच राहीली असे नव्हे; तर उलट अजुन बिकटच झाली.

शिवसेना, महाराष्ट्र निर्माण सेनाच नव्हे तर कोणत्या राजकीय पक्षांनी मराठी तरुणांना व्यवसायात उतरण्यासाठी नीट मार्गदर्शन केलं?

मराठी मुलांना वेगवेगळ्या पक्षांचे नेते गुंडगिरी करायला लावतात. त्यामुळे त्यांचे सरकारी असो अथवा खाजगी असो नोकरीचे दरवाजे बंद होतात. कारण पोलीस दप्तरी त्यांची नोंद 'गुन्हेगार' म्हणून झालेली असते. त्यामुळे असे म्हणावेसे वाटते की, 'मराठी तरुण मार्गाला लागणं' हे या कोणत्याही राजकीय पक्षांना परवडणारं नाही, हेच या मागील कटू सत्य आहे.

मराठी मुद्दा निकालात निघाला तर, काही राजकीय पक्षांकडे कोणताच मुद्दा शिल्लक राहिलेला नसणार, हेही एक सत्यच आहे. आज मुंबई मधली एकही बाजारपेठ अशी नाही, की जिथे मराठी माणसांचं वर्चस्व आहे. बांधकाम व्यवसायातील मुंबईतील प्रसिद्ध बिल्डर्स कोण आहे याकडे नजर फिरविली तर लोढापासून सुरुवात केली तर रुणवालपर्यंत ती जाऊन थांबते. त्यांना या व्यवसायात मदत करणारे सर्वच राजकीय पक्षातील मराठी नेतेच असतात.

मराठीसाठी गळा काढणारे अनेक नेते एकही मराठी शाळा वाचवु शकले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. मुंबई मध्ये सध्या हिंदी व मराठी भाषावादच्या नावाखाली गोंधळच सुरू आहे. भविष्यात त्याचे काय गंभीर परिणाम उमटणार आहे, हे आज तरी सांगणे कठीण आहे. मुंबईतील अनेक फेरीवाले बहुधा गरीब, अनौपचारिक क्षेत्रात काम करणारे आणि स्थानिक राजकीय पाठबळाशिवाय असतात. त्यामुळे, जेव्हा त्यांच्यावर दहशत निर्माण केली जाते, तेव्हा ते त्या भागातून पळ काढतात. नाईलाज असतो त्यांचा. त्यामुळे अनेक व्यवसायांमध्ये व त्यातही रेल्वे स्थानक, बाजारपेठा, फुटपाथ अशा महत्वाच्या ठिकाणी एक व्हॅक्यूम निर्माण होते.

जेव्हा एखादी जागा मोकळी होते, तेव्हा एखादा 'भाई' लगेचच 'आपल्या लोकांना' त्या जागेत बसवतो. फेरीवाल्यांवर दादागिरी करणाऱ्या स्थानिक लोकांना आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांना परप्रांतिय हफ्ता देतात आणि आपली जागा सुरक्षित करतात. मुंबईत गेल्या पंचवीस वर्षांत फेरीविक्रीच्या व्यवसायात मोठा बदल झालेला दिसतो.

आधी या ठिकाणी मुंबईतील मराठी, महाराष्ट्रातील इतर भागातील मराठी माणूस होता. आता तेथे उत्तर प्रदेश, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, झारखंड, पश्चिम बंगाल येथील व्यापाऱ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. आपण दिवसभर 'मराठी माणूस', 'मराठी माणूस' करत राहतो. मुंबईत नोकरी, धंदा, व्यवसाय यासाठी मदत करून 'सेटल' केलेले महाराष्ट्रातील कोणत्याही भागातील मराठी भाषिक सुतार, कुंभार, लोहार, चांभार, तेली, न्हावी, धोबी, माळी, गवळी, शिंपी, प्लम्बर, टॅक्सी-चालक, रिक्षा-चालक दाखवावे.

हे सगळे धंदे नीट बघा. सारेच परप्रांतिय गोळा झाले आहे. कोकण, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र सगळीकडे गरीब 'मराठी माणूस'च आहे. राजकीय नेत्यांनी त्या गरिबांसाठी कधी काय प्रयत्न केले ? म्हणूनच नवतरुणांनी कोणत्याही का होईना राजकीय पक्षांचा कार्यकर्ता होणे बंद करावे, हेच त्यांच्या व समाजाच्या हिताचे राहील!

### आजचा मराठी तरुण नक्की करतोय काय?

एकेकाळी मुंबईत रस्त्यावर केळी विकणारे कृपाशंकर सिंह कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून कुठल्या कुठे पोहोचले. कालांतराने ते भाजपमध्ये नेते झाले. तेथे गेल्यानंतर त्यांच्या मागे चौकशांचा लागलेला ससेमिरा थांबला. तर दुसरीकडे दुकानांवरच्या पाट्या मराठीत लावाव्यात म्हणुन आंदोलन करणाऱ्या नेत्यांच्या मुलांच्या साखरपुड्याच्या आमंत्रण पत्रिका इंग्रजीत छापलेल्या आपण पाहतोय. विविध राजकीय नेत्यांच्या मुलांचे कार्यक्रम ज्या भव्य दिव्य हॉटेलमध्ये होतात ती हॉटेल कोणाची असतात? आज नागरिकांना लागणाऱ्या गरजेच्या वस्तुंचा पुरवठा करणारे ९५% परप्रांतिय आहे. केवळ त्यांच्यामुळेच आज मराठी माणसं आपले सण आनंदाने साजरे करतायत. आपल्या पोटासाठी लागणारं अन्न-धान्य आपण त्यांच्याकडूनच खरेदी करतोय. कारण ह्या सर्वप्रकारच्या वस्तुंचा पुरवठा करण्यास मराठी माणुस पुर्णपणे असमर्थ ठरला आहे. एक वर्ग जो हुषार आहे, उच्च-शिक्षित आहे, तो उठतो आणि बुध्दीमत्तेच्या बळावर परदेशात जातो. दुसरा वर्ग जो मध्यम शिकलेला आहे, तो ह्याच पर-प्रांतीयांकडे नोकरी करतोय. बाकी फार मोठा वर्ग विविध राजकीय पक्षांच्या कार्यालयांत आपला अमुल्य वेळ वाया घालवतोय, तर अनेक तरुण दारु पिण्यात व्यस्त आहेत. मग नक्की चुकतंय कोण? परप्रांतीय की मराठी तरुण? बेरोजगार मराठी मुलांचा वापर करुन राजकीय नेते आपलं दुकान मात्र मस्त चालवत आहेत!

# पितृपक्षातील हाडपक्या (मस्कऱ्या) गणपती उत्सव

पितृपक्षामध्ये धार्मिक कार्यक्रमासह पारिवारिक कार्यक्रम किंवा शुभकार्य करणे टाळले जाते. परंतु पितृपक्षाच्या काळातही प्रामुख्याने विदर्भात २७० वर्षांपासून हाडपक्या (मस्क ?या) गणपती उत्सव साजरा करण्यात येतो. यामागे सुध्दा ऐतिहासिक परंपरा व संस्कृती आहे. नागपूरातील प्राचीन परंपरेतील ऐतिहासिक उत्सव म्हणजे 'हाडपक्या गणपती'.

हा उत्सव गणेशेत्सव संपल्यानंतर सुरू होतो. नागपूरसह विदभार्तील अनेक जिल्ह्यांत हाडपक्या गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा केला जातो. हा गणपती उत्सव घरघुती स्वरूपाचा नसुन सार्वजनिक स्वरूपाचा असतो. पूर्वी मोठ्या प्रमाणात सार्वजानिकरित्या हा उत्सव साजरा होत असे. परंतु कालांतराने आता काही मोजक्याच ठिकाणी हा उत्सव साजरा केला जातो. विदर्भात पितृपक्षाला हाडपक असेही म्हणतात. म्हणून हाडपकात बसविलेल्या गणपतीला 'हाडपक्या गणपती' असेही संबोधले जाते.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

राजे भोसले यांचे नागपूरात आगमन झाल्यानंतर अनेक प्रथा व परंपरांची सुरुवात झाली. भाद्रपद शुद्ध चतुर्थीर्ला घरगुती गणेशोत्सवाला सुरुवात होते व याला मोठे सार्वजनिक स्वरुप दिले जाते, हा उत्सव दहा दिवस चालतो. घरगुती गणेश विसर्जन झाल्यानंतर जी पितृपक्षातील चतुर्थी येते त्या कृष्णपक्ष संकष्ट चतुर्थीला हाडपक्या गणपतीची स्थापना केली जाते.

इ. स. १७५५ मध्ये नागपूरातील भोसले घराण्यातील तत्कालीन राजे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले उर्फ चिमनाबापू हे बंगालच्या स्वारीवर होते. बंगालवर ऐतिहासिक विजय मिळवून परत येत असताना कुळाचारी गणपतीचे विसर्जन झाले होते. त्यामुळे श्रीमंत खंडोजी महाराज भोसले गणपतीउत्सव साजरा करू शकले नाही.

त्यावेळी राजपुरोहित व अन्य विद्वानांसोबत चर्चा करून पितृपक्षातील भाद्रपद कृष्ण चतुर्थी (भाद्रपद संकष्टी चतुर्थी) ला गणपतीउत्सव साजरा करण्याचे ठरविले आणि त्यासोबत बंगालवर ऐतिहासिक विजय मिळविण्याच्या आनंदोत्सव सुद्धा सार्वजनिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले.तेव्हा पासून हाडपक्या गणपतीला सुरूवात झाली आहे.

त्यामुळे याला विजयत्सोव सुध्दा म्हणता येईल. याकाळात लावण्या, नकला, भारूड, खडीगंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असे. यावेळी अनेक गंमतीजमतीचे कार्यक्रम होत असत त्यात थट्टा,मस्करी, नाटक खडी गंमत इत्यादींचा भडीमार होत असत म्हणजेच कार्यक्रमाच्या माध्यमातून मस्करी व्हायची यातुनच मस्कऱ्या हे स्थानीय बोलीभाषेतील नाव प्रचलित झाले आणि पितृपक्षातील गणपतीला मस्कऱ्या गणपती' नावाने प्रसिद्धी मिळाल्याचे सांगितले जाते.

असे म्हणतात की लोकमान्य टिळकांनी ह्याच गणपती उत्सवाची प्रेरणा घेऊन भाद्रपद शुद्ध गणेश चतुर्थीला गणपती उत्सव सार्वजानिक स्वरूपात साजरा करण्याचे ठरविले. हाडपक्या गणपती उत्सवाचा मुख्य सोहळा नागपूरातील भोसले राजवाडा, महाल येथे आयोजित करण्यात येते. या उत्सवाला आज २७० वर्षे पूर्ण होत आहेत, ही ऐतिहासिक परंपरा आहे.

श्रीमंत राजे खंडोजी महाराज भोसले यांच्या काळात हाडपक्या गणपतीची स्थापन केली जात होती. तीच परंपरा आजही आपल्याला पहायला मिळते. त्याच प्रकारची मूर्ती स्थापन करण्यात येते. त्याकाळी लावण्या, भारूड, पोवाडे, खडी गंमत इत्यादी मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जायचे. परंतु आता कालांतराने वेगवेगळे मनोरंजनात्म कार्यक्रम आले, यात आर्केस्ट्रा, सुगम संगीत, नाटक, नवीन पिढीला आनंद देणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात येते.

हा उत्सव सलग दहा दिवस साजरा करण्यात येतो. या दरम्यान महाप्रसादचा कार्यक्रम आयोजित करण्यात येतो व भाद्रपद कृष्ण द्वादशीला गणपती उत्सवाची सांगता होते आणि हाडपक्या गणपतीचे विसर्जन करण्यात येते.

यामुळे लक्षात येते की भारतीय संस्कृतीतील प्रत्येक सणाला व उत्सवाला अत्यंत महत्व असते. मग तो कोणत्याही धर्माचा उत्सव असो, यातूनच आपली जडणघडण व विविधता दिसून येते, आपण परीपक्व होतो व आपल्या परिवाराला संस्कृतीतून चांगली चालना मिळते. यामुळेच आज संपूर्ण जग भारतीय संस्कृतीकडे आकर्षित झाल्याचे दिसून येते. ही भारतासाठी गौरवास्पद बाब आहे. गणपती बाप्पा मोरया!





# हा फोन दिवसातून फक्त २ तास चालू शकेल

अलीकडेच जपानमधील टोयोके शहरात एक प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, ज्यांअंतर्गत दररोज फक्त २ तास फोन वापरण्याचा नियम असेल.

त्याचा उद्देश जास्त स्क्रीन वेळेचे शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कमी करणे आहे.



प्रस्तावित मार्गदर्शक तत्वांमध्ये असे म्हटले आहे की ६ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांनी रात्री ९ नंतर स्क्रीन वापरू नये. दुसरीकडे, प्रौढांनी रात्री १० वाजेपर्यंत त्यांचे फोन बंद करावेत.



लोकांवर कोणतीही सक्ती केली जाणार नाही.

या नियमामुळे नागरिकांना स्मार्टफोन कधी आणि किती काळ वापरायचा याचा विचार करण्याची संधी मिळेल.

सद्धया एक समिती या विधेयकाचा आढावा घेत आहे. यानंतर नगरपालिका सभेत त्यावर मतदान होईल.

# भुके नाही अन्न.. मेल्यावरी पिंडदान

*भुके नाही अन्न'*
*मेल्यावरी पिंडदान''*
*हे तो चाळवाचाळवी'*
*केले आपणचि जेवी'*
*नैवद्याचा आळ'*
*वेचे ठाकणी सकळ'*
*तुका म्हणे जड'*
*मज न राखावे दगड'*



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८

प्रस्तुत अभंग भक्तिमागासोबतच समाजाला नीतीमार्गाची सुलभ वाट दाखविणाऱ्या संत तुकारामांचा आहे. या अभंगाचा सरळ सरळ भावार्थ लक्षात घेतला तर जिवंतपणे भुकेला असताना खायला अन्न पाणी देत नाही,परंतु मेल्यावर त्याच्या नावाने पिंडदान करतात. ही तर शुद्ध फसवणूक आहे. शिजवलेल्या अन्नापैकी मृत व्यक्तीच्या नावाने थोडासा नैवेद्य ठेवतात आणि उरलेले सर्व आपणच गिळंकृत करतो. तुकाराम महाराज भगवंताला म्हणतात मला असा निर्बुद्ध दगड बनू नको!

संत तुकाराम महाराज संसारिक होते. त्याकाळी समाजात आढळणाऱ्या रूढी परंपरेवर चिंतन करून ते भाष्य करीत आणि अनीतीच्या मार्गावर चालणाऱ्यांना खडे बोल सुनावत; असे त्यांच्या वाङ्मयातून अनेकदा स्पष्ट होते.

मातृदेवो भवः पितृदेवो भवः सांगणाऱ्या आपल्या संस्कृतीत आजही जिवंतपणी भुकेल्या आई-वडील अथवा आप्तस्वकीयांना वेळेवर अन्न-पाणी दिल्या जात नाही. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर मोठ्या दशक्रिया विधी, तेरावा विधी, शुद्ध पंगती श्राद्धविधी करून मृत व्यक्तीच्या नावाने सर्व समाजासाठी मिष्टांन्नाचे भोजन दिले जाते. मात्र त्यांच्या हयातीत उपेक्षा होते.

काही सन्माननीय अपवाद वगळता चौफेर विपरित चित्र आज समाजात दृष्टीस पडते. जिवंतपणी आई-वडिलांना उपाशी ठेवणारे ते मृत्यू पावल्यानंतर त्यांच्या नावाने पिंडदाना प्रसंगी, खोट्या प्रतिष्टेपायी मोठा खर्च करतात. भोजनाच्या पंगती बसवितात आणि स्वतःच बनवलेल्या भोजनाचा मनमुराद हसतपणे आस्वाद घेतात.

हे लोक नैवेद्य म्हणून देवाला आवडणारे नानाविध पदार्थ करून स्वतःच पोट भरत असतात. या कृतीतून स्वतःची काही न मागणाऱ्या देवाची देखील फसवणूक होते.कर्तव्य धमार्ला विसरणारे जडबुद्धीचे लोक माझ्याकडून रक्षिले जाणारच नाहीत. मी वेळोवेळी या फसणूक करणाऱ्या लोकांना त्यांच्या कर्तव्य धर्माची आठवण करून देईल! असे संत तुकाराम महाराज म्हणतात. ही परिस्थिती जशी आज अवतीभवती दिसते. तशी त्याकाळी ही असावी म्हणून संतांनी अनीतीच्या खोट्या परंपरेवर भाष्य केलेले आहे. ते आजच्या समाजालाही लागू पडते.

दुभत्या गाई म्हशींना वेळेवर चारा टाकता. हौसेसाठी कुत्री, मांजरी पोसता. त्यांच्या भुकेचा विचार करून पौष्टिक आहार पुरविणारे, आई बापाच्या भुकेचा विचार कधी करतील? आज तीर्थक्षेत्री भीक मागणारी वयोवृद्ध मंडळी, कुंभमेळ्यात सोडलेली, विधवेला दुर्लक्षित केलेली, गावाच्या पारावर थकलेली हिरमुसलेली म्हातारी चेहरे, वृद्धाश्रमा सोबतचं त्यात कितपत पडलेली दुर्लक्षित जेष्ठ मंडळींची संख्या का वाढताहेत! याचाही विचार समाजमन करेल?

ज्यांनी जन्माच्या आधीपासून तुमच्या भवितव्याचा विचार केला. एक कुटुंबप्रमुख म्हणून कुटुंबाचे संरक्षण केले.स्वतःच्या इच्छा आकांक्षा आवडीनिवडींचा विचार केला नाही, ती व्यक्ती आपले जन्मदाते असो वा पालक. जेव्हा ती वृद्धापकाळाने थकते, अंगी त्राण राहत नाही. अशा प्रसंगी खरा मानसिक आधार त्यांना हवा असतो.

अपेक्षित असे घडत नाही या उलट त्यांची परवड होत असते. त्यांना उपेक्षित ठेवून पापांचे आपण कळत नकळत धनकरी होतो. उलटपक्षी त्यांच्या मृत्यू पश्चात पिंडदान, तेरवी, श्राद्धविधी करून पुण्य पदरात पाडून घेण्याचे सोंग कशाला करायचे.

ही कृतघ्नता, निर्दयीपणाची, निर्बुद्धीची होत. मेलेल्याच्या नावाने कावळ्याला व गाईला नैवेद्य खाऊ घालण्यापेक्षा जिवंतपणीच त्यांची काळजी घेणे गरजेचे आहे. मेल्यानंतर तुमची पितरें कावळ्याच्या रूपाने येईल अशी निर्बुद्धी ठेवण्यासारखे दुसरे मूर्खत्व नाही.

म्हणून संत तुकारामांनी एकनाथांनी, कबीरदासांनी अशा कमार्चा धिक्कार केला आहे. खरे पुण्य कर्म जिवंतपणीच आहे, हा संत विचार मानवजीवनी अंगीकारला तर अनेक सामाजिक प्रश्न सुटायला मार्ग मोकळा होईल.

## समाज प्रबोधनाचं एक माध्यम चित्रपट

**वाचक लिहितात**

चित्रपट हे असं माध्यम आहे जे मनोरंजनाबरोबरच संस्कृती, परंपरा, इतिहास दाखवून लोकांचे प्रबोधन करू शकतो त्यामुळे मनोरंजनाशिवाय इतर विषयांवर चित्रपट निर्माण करणे ही काळाची गरज आहे ज्यात खरे आणि वास्तव इतिहास, परंपरा दाखवणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षात वेगळ्या विषयाचे काही चित्रपट निर्माण केले जात आहे पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की अशा चित्रपटातून दाखविला जाणारा इतिहास, परंपरा, रूढी यांच्याविरुद्ध साम्यवादी आणि पुरोगामी विचाराचे लोक विरोध करतात.

निर्मात्यांना सरसे तन जुदा करण्याची धमकी दिली जाते. अशा चित्रपटांच्या निर्मात्यांना मारहाण केली जाते. असे चित्रपट प्रदर्शित न होण्यासाठी प्रयत्न केले जातात किंवा त्याच्यावर बंदी आणली जाते. याचे ताजे उदाहरण म्हणजे नुकताच प्रदर्शित झालेला बंगाल फाईल हा चित्रपट. या चित्रपटात स्वातंत्र्यापूर्वी मुस्लिम लीगने कलकत्त्यात जो भयानक रक्तसंग्राम घडवला त्याचे सत्यचित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे.

आतापर्यंतच्या इतिहासाच्या पुस्तकात १६ ऑगस्ट १९४६ या दिवशी घडलेल्या या घटनेचा उल्लेख केवळ दंगल एवढ्याच एवढाच करण्यात आला होता या दंगलीतील मृतांच्या संख्येमुळे ही घटना कलकत्ता किलिंग या नावाने ओळखली जाते परंतु प्रत्यक्षात ते हिंदूंचे हत्याकांड होते.

त्यावेळी तेथील पोलीस ठाण्यामध्ये बहुतांशी पोलीस निरीक्षक मुसलमान होते त्यामुळे हिंसा वाढली. या हत्याकांडातील मृतांची औपचारिक आकडेवारी ४००० तर अनौपचारीक आकडेवारी आठ ते दहा हजार इतकी होती. अशा घटना राजकीय हेतूमुळे लपवल्या गेल्या आणि आताही बऱ्याच घटना लपवल्या जात आहे.

असाच एक चित्रपट डायरी ऑफ वेस्ट बेंगाल या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती. या चित्रपटात बांगलादेशातून भारतात होणारी घुसखोरी, रोहिंग्या निर्वासितांचे संकट, लव जिहाद आणि समाजातील आंतर धर्मीय संबंध याविषयीच्या सत्या घटनांवर आधारित गोष्टी दाखवण्यात आल्या होत्या.

सत्य घटनांवर आधारित अशा चित्रपटातून काही अंशी तरी इतिहास दाखवला जात आहे त्यामुळे या चित्रपटांच्या माध्यमातून आतापर्यंत समोर न आलेला घटना जाणून घेण्याचा प्रयत्न निश्चितच केला पाहिजे. मोगल आणि इंग्रज यांचे शासन तीन साडेतीनशे वर्षांचे होते पण त्याआधीचा इतिहास हा गौरवपूर्ण होता पण तो इतिहास पूर्णपणे पुसून टाकून फक्त नंतरच्या तीन साडेतीनशे वर्षातील इतिहास हा सांगितला आणि दाखवला गेला त्यामुळे खरा गौरवशाली इतिहास हे आजच्या पिढीला माहीत नाही. या इतिहासाचे स्मारक किंवा प्रतिके असलेल्या गोष्टी, वस्तू, गड किल्ले, मंदिरे गोपुरे आदी नष्ट करून त्यावर अन्यधर्मीयांनी आपली प्रार्थना स्थळे बांधली आहे. राजकीय नेत्यांच्या इच्छेनुसार व संगनमताने हे सगळे घडत आहे त्याला वेळीच आवर घातला नाही तर परिस्थिती बिकट होऊ शकते.

आपला जाज्वल्य इतिहास पुनर्जीवित करण्यासाठी चित्रपट निमार्ता ह्यांनी पुढे येऊन असे चित्रपट निर्माण करणे हे गरजेचे आहे. फक्त चित्रपट निर्माण करून काही साध्य होणार नाही त्याला लोकांनी प्रतिसाद दिला पाहिजे. विरोध करणाऱ्यांचे षडयंत्र हाणून पाडले पाहिजे व घुसखोरांना हकलण्याच्या सरकारी मोहिमेला नागरिकांनी पाठिंबा दिला पाहिजे.

■ लीना मकरंद गाडगीळ
पनवेल.





# रोज सकाळी प्या शेवग्याच्या पानांचे पाणी

शेवग्याची शेंग आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. त्यात असे अनेक पोषक घटक असतात जे चांगले आरोग्य राखण्यास मदत करतात. म्हणून शेवग्याची शेंग सुपरफूड मानली जाते. तर शेवग्याच्या शेंगप्रमाणेच या वनस्पतीची पाने देखील आपल्या आरोग्यासाठी खूप आरोग्यवर्धक आहे. तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी शेवग्याच्या पानांचे पाणी प्यायल्यास तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते.

त्यात व्हिटॅमिन-ए, सी, कॅल्शियम, पोटॅशियम आणि लोह यांसारखे आवश्यक जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक प्रमाणात आढळतात. ते प्रथिने आणि अँटी-ऑक्सिडंट्सचा देखील एक उत्कृष्ट स्रोत आहे.

**शेवग्याच्या पानांचे पाणी पिण्याचे फायदे**

**शरीरात ऊर्जेची पातळी वाढवते**- शेवग्याच्या पानांपासून तयार केलेल्या पाण्यात लोह आणि जीवनसत्त्वे शरीरातील रक्ताची कमतरता दूर करण्यास मदत करतात. ज्यामुळे थकवा कमी होतो आणि उजेर्ची पातळी वाढते. सकाळी हे पाणी प्यायल्याने दिवसभर ऊर्जावान राहता.

**पचनसंस्था मजबूत करते** : यात असलेले अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म पोटातील हानिकारक बॅक्टेरिया नष्ट करतात, तर त्यातील फायबर बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्त होऊन पोट स्वच्छ ठेवते.

**वजन कमी करण्यास उपयुक्त** : कमी कॅलरीज आणि उच्च पोषण असलेले हे पेय वजन कमी करण्यास खूप प्रभावी ठरू शकते. याच्या सेवनाने चयापचय वाढवते, शरीरातील अतिरिक्त फॅट कमी करण्यास मदत होते.

**रोगप्रतिकारक शक्ती मजबूत** : शेवग्याच्या पानांमध्ये व्हिटॅमिन सी आणि इतर अँटी-ऑक्सिडंट्स भरपूर असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यास मदत करतात. शेवग्याच्या पानांचे पाणी नियमितपणे प्यायल्याने सर्दी आणि खोकला सारख्या संसर्गाचा धोका कमी होतो.

**रक्तातील साखर आणि कोलेस्टेरॉल नियंत्रित** : शेवगा रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यास प्रभावी ठरू शकते. कोलेस्टेरॉलची पातळी देखील नियंत्रित ठेवते, त्याचबरोबर हृदय निरोगी राहते.

**त्वचा आणि केसांसाठी वरदान** : शेवग्याच्या पानांमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म त्वचेची चमक वाढवतात, मुरुमांपासून बचाव करतात आणि वृद्धत्वाची लक्षणे कमी करतात. तसेच यामध्ये असलेले पोषक घटक केसांना मजबूत करतात आणि केस गळण्याची समस्या कमी करतात.

**शरीरातील जळजळ कमी करते** : शेवग्याच्या पानांमध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात. त्यामुळे या पानांचे पाणी प्यायल्यास संधिवातासारख्या दाहक आजारांमध्ये वेदना आणि सूज कमी करण्यास उपयुक्त ठरू शकते.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### ! हुरहूर !

सुटी आहे वृत्तपत्राला
याचा पडतो विसर
गेटवर जाऊन बघतो
अजुन का बरं
आला नसेल महासागर?

जिल्हयातील घडामोडींची
सविस्तर वृत्त देते पेपर
टीव्ही वरील बातम्यात
हेच तर आहे अंतर ..!

बाजारभाव आज कुठे काय?
घरबसल्या समजते
म्हणूनच तर पेपरशी
मैत्रीचे नाते घट्ट होते ..!

# जेके मॅक्स पेंट्सची घर आने के बहाने ही नवी जाहिरात सादर



**नवी दिल्ली, ९ सप्टेंबर :** जेके मॅक्स पेंट्सतर्फे त्यांची नवी घर आने के बहाने ही जाहिरात प्रदर्शित करण्यात आली आहे. आकर्षक भिंतींमुळे फक्त घर छान दिसत नाही तर त्यासोबतच त्या घरात आनंद, संवाद आणि नात्यांची रुजवात होते हेच, जीवनाचे विविध पैलू दाखवणाऱ्या या विनोदी बाजाच्या जाहिरातीतून दाखवण्यात आले आहे.

या जाहिरातीच्या निमित्ताने जिमी शेरगील आणि मिनिषा लांबा साधारण दोन दशकांनंतर पुन्हा एकत्र पडद्यावर दिसणार आहेत. जिमी चोखंदळ आणि प्रेमळ शर्माजी या भूमिकेत आहेत तर मिनिषा त्यांची पत्नी आहे. त्यांचे नव्याने रंगवलेले घर शेजाऱ्यांसाठी आकर्षणाचे केंद्र बनले आहे. या घराच्या भिंतींमागील इन्फ्लुएन्सर्सना त्यांचे रिल्स बनवायचे आहेत, जरा जास्तच सलगी दाखवणाऱ्या कुणा काकूंना आमंत्रण नसतानाही त्यांच्या घरी यायचे आहे.

या नव्या कॅम्पेनबद्दल बिझनेस हेड (व्हाईट सिमेंट आणि पेंट व्यवसाय) नितिश चोप्रा म्हणाले, कुठल्याही घरमालकासाठी योग्य रंग निवडणे हे फक्त भिंती रंगवण्यापलिकडे बरेच काही असते. टिकाऊपणाची खात्री देणारी ती एक गुंतवणूक असते, त्यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांच्या सौंदर्याच्या व्याख्या नमूद करणारे ते प्रतिबिंब असते. रंग म्हणजे फक्त फिनिशिंग टच नाही, घराला घरपण देणारा तो एक पाया आहे, याची जेके मॅक्स पेंट्सला जाणीव आहे. जेके सिमेंट या विश्वासार्ह कंपनीतील आमची उत्पादने रंगांच्या विस्तृत श्रेणीसह उत्कृष्ट दर्जा, दीर्घकाळ टिकणारा परफॉर्मन्स आणि टिकाऊपणा यासाठी खास तयार करण्यात आली आहेत. त्यामुळे ती प्रत्येक घरमालकासाठी सुयोग्य ठरतात. घर आने के बहाने या कॅम्पेनच्या माध्यमातून आम्हाला हे नाते अधोरेखित करायचे आहे.

विपणन प्रमुख (व्हाईट सिमेंट आणि पेंट व्यवसाय) अमनदीप मल्हारी म्हणाल्या, रंगांच्या सर्वसाधारण लाभांपलिकडे काही देऊ करणारा ब्रँड तयार करावा यावर जेके मॅक्स पेंट्समध्ये आमचा नेहमीच भर असतो. घर आने के बहाने या कॅम्पेनमधून आम्ही भिंतींना आनंददायी क्षणांचा साक्षीदार बनवणारा विश्वासार्ह ब्रँड ही आमची ओळख अधिक दृढ करत आहोत. रंग घराला कशाप्रकारे हवीहवीशी जागा बनवतात, यावर या फिल्ममध्ये भर देण्यात आला आहे. भारतीय कुटुंबव्यवस्था आणि शेजार ही संकल्पना एकत्रितपणावर आधारली आहे. ही भावना जिवंत करण्यासाठी विनोद हा फारच सुसंगत मार्ग आहे. शिवाय रिल्स, ऑनलाइन मुलाखती आणि क्रिकेट अशा समकालीन बाबी आजच्या काळाशी सुसंगत आहेत. आपल्या घरांना फक्त भिंती न मानता आठवणी आणि आनंदांचा कॅन्व्हास मानणाऱ्या ग्राहकांना ही जाहिरात मनपासून आवडेल, असे आम्हाला वाटते.

# रॉयल ग्लिट्झसह सर्वोत्तम होम मेकओव्हर चित्रपटात दीपिका भूमिका करत आहे

**मुंबई, ९ सप्टेंबर :** डेकोरची शैली ठरवण्यात भारतात महत्वाचे स्थान असलेले एशियन पेंट्स, त्यांचा लक्झरी ब्रँड, रॉयल ग्लिट्झचा, प्रीमियम वॉल फिनिशपासून, संपूर्ण होम डेकोर प्रेरणा म्हणून विकास करत आहे. ब्रँड ॲम्बेसेडर दीपिका पदुकोणचा अभिनय असलेल्या एका नवीन जाहिरातीमध्ये, तिच्या पडद्यावर बहुप्रतिक्षित पुनरागमनाद्वारे हा प्रवास सजीव होतो. या जाहिरात चित्रपटाचा केंद्रबिंदू अभिनेत्री दीपिका पदुकोण आहे. ती रॉयल ग्लिट्झच्या रंग आणि पोतांशी संवाद साधत असताना, भिंती केवळ पृष्ठभागच नव्हे तर वैयक्तिक शैलीच्या अभिव्यक्ती म्हणून सजीव होतात. ती रॉयल ग्लिट्झ फिनिशचा वापर करून प्रयोग करते, जो तिच्या भिंतींचा कायापालट करतो आणि तिच्या वास्तव्याच्या जागेचे संपूर्ण स्वरूप बदलण्यास प्रेरणा देतो. एकूण डिझाइन निवडींवर वॉल फिनिश कसा प्रभाव टाकू शकते, ते या मोहिमेद्वारा दिसून येते.

एशियन पेंट्सचे एमडी आणि सीईओ अमित सिंगल म्हणाले, रॉयल ग्लिट्झद्वारा, आम्ही भारतीय घरांसाठी लक्झरीची पुन्हा नव्याने व्याख्या करत आहोत. एशियन पेंट्समध्ये, आम्ही नेहमीच स्वतःस व्यक्त करण्याच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवला आहे जो खरोखरच घर आपले बनवतो. ते तुम्ही कोण आहात याचे प्रतिबिंब असणारी भावनिकदृष्ट्या परिपूर्ण जागा तयार करण्याशी संबंधित आहे. रॉयल ग्लिट्झची ही मोहीम एक भिंत संपूर्ण जागेचा कायापालट कशी करू शकते याचा सोहळा निर्माण करते, डिझाइनचा आरंभ स्वतःस व्यक्त करण्यापासून होतो हे दर्शवते. ते प्रेक्षकांना त्यांची घरे पक्के बांधकाम म्हणून पाहण्यास नव्हे, तर ते कोण आहेत याच्या उत्क्रांतीचे प्रतिबिंब म्हणून पाहण्यास आमंत्रित करते.

आकर्षक डौल आणि लक्झरी यांचे जागतिक प्रतिक दीपिकाशह आमचा आमचा संबंध निरंतर ठेवण्यास आम्हाला आनंद होत आहे.

रॉयल ग्लिट्झ रंग, फिनिश आणि डेकोरच्या पैलूंत विस्तार करून, एशियन पेंट्स सुरुवातीपासूनच ग्राहकांच्या डेकोर वाटचालीत मूल्य जोडण्याचे उद्दिष्ट ठेवतो, वैयक्तिक जागा तयार करण्यात खरा भागीदार बनतो. यामुळे कंत्राटदाराशी संपर्क होण्यापूर्वीच ते ग्राहकांशी थेट संवाद साधू शकतात.

रॉयल ग्लिट्झला केवळ एक



उत्पादनापलीकडील जास्त स्थान देऊन, एशियन पेंट्स पुन्हा एकदा नावीन्यपूर्णता आणि कथाकथन या दोन्हीमध्ये आपले नेतृत्व मजबूत करतो.

# अंबुजा सिमेंट्सचे कबड्डी खेळाडू तरुणींच्या प्रतिभेला प्रोत्साहन

**नागपूर, ९ सप्टेंबर :** अदानी कंपनीच्या वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ अंतर्गत सिमेंट आणि बांधकाम साहित्य कंपनी अंबुजा सिमेंट्सने त्यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत, शारीरिक सक्षमता आणि क्रीडा जागरूकता प्रोत्साहन कार्यक्रम राबवला आहे. या अंतर्गत देहेगाव गोवारीसह नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात युवा सक्षमीकरण आणि समग्र विकासाला चालना मिळते आहे. २०२०-२१ पासून, चंद्रपूरच्या जिल्हा क्रीडा केंद्राच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात येत आहे, जो सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना कबड्डी, खो-खो आणि ऍथलेटिक्स सारख्या खेळांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करतो. यासोबतच शारीरिक आणि मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी देखील मुलांना प्रोत्साहन मिळते.

यंदा या उपक्रमात कबड्डीवर जास्त लक्ष केंद्रित करण्यात आले असून यासाठी सरकारी शाळांमधील २०० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. मुलांच्या अधिकाधिक सक्रिय सहभागासाठी, अंबुजा सिमेंट्स राज्यस्तरीय कबड्डी प्रशिक्षकांना या उपक्रमात सहभागी करून घेत आहे. यामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षणासोबतच नियोजनबद्ध मार्गदर्शन मिळेल. यासोबतच त्यांना ब्लॉक आणि जिल्हा स्तरावरील स्पर्धात्मक स्पर्धांसाठी तयार केले जाते आहे.

हरदोना खुर्द शाळेतील १४ वर्षांखालील मुलींचा संघ आणि जवळपासच्या गावांतील स्पर्धकांचा उल्लेखनीय कामगिरी केली आहे. राजुरा ब्लॉक-स्तरीय कबड्डी स्पर्धेत या संघाने प्रथम क्रमांक पटकावला आणि आता ते जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरले आहेत. त्यांचे उल्लेखनीय टीमवर्क, शिस्त आणि मैदानावरील आत्मविश्वास हा योग्य प्रशिक्षण आणि सामाजिक पाठिंब्याचा परिवर्तनीय परिणाम अधोरेखित करतो.

लखमापूर आफ्टर स्कूल स्पोर्ट्स प्रोग्राममधील अकरा मुलींनीही उत्तम समन्वय आणि सांघिक भावना दाखवत कोरपना ब्लॉक स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. आणि त्याही जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहेत. याव्यतिरिक्त, ऍथलेटिक्समध्ये राज्य पातळीवर सातत्याने प्रतिनिधित्व करणाऱ्या सलोनी आत्राम या विद्यार्थिनीने पुन्हा एकदा उत्कृष्ट कामगिरी करत तिच्या शाळेला आणि समुदायाची मान अभिमानाने उंचावली आहे.

क्रीडा प्रतिभेला वाव देऊन तसेच विकासासाठी एक नियोजनबद्ध मार्ग तयार करून देत अंबुजा सिमेंट्स केवळ सहभागालाच प्रोत्साहन देत नाही तर ग्रामीण भागातील तरुणांमध्ये शिस्त, टीमवर्क आणि लवचिकतेची जीवनमूल्ये देखील आयुष्यभरासाठी रुजवत आहे.

# अदाणी पॉवर आणि ड्रूक ग्रीन पॉवर मिळून भूतानमध्ये ५७० मेगावॅट जलविद्युत प्रकल्प उभारणार

**नवी दिल्ली, ९ सप्टेंबर :** भारतातील सर्वात मोठी खाजगी वीज उत्पादक कंपनी अदाणी पॉवर आणि भूतानची सरकारी वीज निर्मिती कंपनी ड्रूक ग्रीन पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (डीजीपीसी) यांनी आज भूतानमध्ये ५७० मेगावॅट क्षमतेच्या वांगचू जलविद्युत प्रकल्प उभारण्यासाठी भागधारक करार (एसएचए) केला. तसेच वीज खरेदी कराराचा (पीपीए) प्राथमिक करारही करण्यात आला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्रकल्पासाठी भूतान सरकारसोबत सवलत करार (सीए) वर देखील स्वाक्षरी केली.

हे करार भूतानचे पंतप्रधान माननीय डॅशो त्शेरिंग टोबगे आणि अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या करारामुळे अदाणी पॉवर आणि डीजीपीसी यांना बीओओटी (बिल्ड, ओन, ऑपरेट, ट्रांसफर) मॉडेलवर पीकिंग रन-ऑफ-रिव्हर वांगचू जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

वांगचू प्रकल्पासाठी सुमारे ६,००० कोटी रुपये (६० अब्ज) इतकी गुंतवणूक करून नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प आणि संबंधित पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. प्रकल्पाचा सविस्तर अहवाल पूर्ण झाला असून, २०२६ च्या पहिल्या सहामाहीत



बांधकाम सुरू होण्याची अपेक्षा आहे. भूमिपूजन झाल्यानंतर पाच वर्षांच्या आत प्रकल्प पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे.

अदाणी पॉवरचे सीईओ एस. बी. ख्यालिया यांनी सांगितले, भूतान हे शाश्वत विकासाच्या दृष्टीने जगासाठी एक आदर्श आहे. या नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पाद्वारे देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विकासात महत्त्वाची भूमिका निभावण्यास आम्ही खूप उत्सुक आहोत. वांगचू जलविद्युत प्रकल्प भूतानच्या हिवाळ्यातील वाढत्या वीज गरजा पूर्ण करेल, कारण त्या वेळी जलविद्युत निर्मिती कमी असते. उन्हाळ्यात मात्र ही वीज भारतात निर्यात केली जाईल.

डीजीपीसीचे व्यवस्थापकीय संचालक डॅशो छेवांग रिनझिन यांनी सांगितले, १९६० च्या दशकापासून भूतान आणि भारत यांनी एकत्र येऊन भूतानच्या मोठ्या जलविद्युत क्षमतेचा विकास केला आहे. जलविद्युत क्षेत्रातील या सहकार्यामुळे दोन्ही देशांना मोठा फायदा झाला आहे आणि हे दोन्ही देशांमधील आदर्श आणि मैत्रीपूर्ण संबंधांचे मुख्य आधार मानले जाते. पुढील दहा वर्षांत भूतानला उच्च उत्पन्न गाठण्याचा ग्रॉस नॅशनल हॅपिनेस देश व्हायचे आहे. त्यासाठी जलविद्युत आणि सौरऊर्जेसारख्या नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून परवडणारी आणि विश्वसनीय वीज मिळणे खूप महत्त्वाचे आहे, जेणेकरून इतर गुंतवणुकीला चालना मिळून आर्थिक वाढ साधता येईल. भूतानने २०४० पर्यंत १५,००० मेगावॅट जलविद्युत आणि ५,००० मेगावॅट सौरऊर्जा क्षमता वाढवण्याचा संकल्प केला आहे. डीजीपीसीसोबत अदाणी समूहासोबत ५७० मेगावॅट वांगचू जलविद्युत प्रकल्प उभारण्याचा करार करताना आनंद होत आहे. अदाणी समूहाची तांत्रिक आणि आर्थिक ताकद तसेच त्यांचा अनुभव आणि कौशल्य लक्षात घेता, हा प्रकल्प वेगाने पूर्ण होईल आणि इतर प्रकल्पांसाठीही आदर्श ठरेल, अशी अपेक्षा आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर भूतानची ऊर्जा सुरक्षितता वाढेल आणि भूतान आणि यांच्यातील ग्रिड कनेक्टिव्हिटी मजबूत होईल.

# ख्यातनाम फील्डर जॉन्टी ऱ्होड्स आता सुपर.मनीसोबत सुपर कॅशबॅक्स कॅच करतोय

**मुंबई, ९ सप्टेंबर :** फ्लिपकार्ट-समर्थित आघाडीचा यूपीआय प्लॅटफॉर्म असलेल्या सुपर.मनीने एक नवीन डिजिटल जाहिरात आणली असून त्यात महान क्रिकेटपटू जॉन्टी रोड्स 'कॅशबॅक कॅचर' झळकत आहे. मैदानावर आपली विजेसारखी चपळाई, वेग आणि अचूकतेसाठी ओळखले जाणारे, जॉन्टी आजच्या हुशारीने खर्च करणाऱ्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व दर्शवतात. तो चपळ, सतर्क आणि नाट्यमयतेने परिपूर्ण आहे.

सुपर.मनीचे सह-संस्थापक प्रेमांशु सिंग म्हणतात, सुपर.मनीमध्ये आम्ही रिवॉर्ड्स सोपे, सुसंगत आणि खरोखर मौल्यवान असले पाहिजेत, गुंतागुंतीचे किंवा सशर्त नसावेत यावर विश्वास ठेवतो. आमचे ध्येय वापरकर्त्यांना प्रत्येक वेळी खर्च करताना ते थेट आणि विश्वासार्ह कॅशबॅकद्वारे काहीतरी परत मिळवण्याचा आनंद मिळावा याची खात्री करण्याचे आहे. जॉन्टी रोड्स या जाहिरातीत आपला उत्साहाने सळसळता स्वभाव आणतात. ते सतत कार्यरत, सतर्क असतात आणि नेहमीच खरोखर फायदेशीर असलेल्या गोष्टीसाठी झटतात. जॉन्टी फक्त स्वतःची जबाबदारी पार पाडत नाही तर ते प्रत्येक भारतीय ग्राहकाची भूमिका बजावत आहेत. विविध ॲप्समधून पुढे जाऊन शेवटी कॅशबॅक प्रत्यक्षात येईपर्यंत चालत आहेत. या जाहिरातीतून आम्ही फक्त एक मजेदार कथा सांगत नाही आहोत, तर ग्राहकांच्या अपेक्षा बदलण्याची आणि रिवॉर्ड्सला एक मानक बनवण्याची आमची वचनबद्धता मजबूत करत आहोत.

कलात्मक दिग्दर्शक (जाहिरातीसाठी) आणि ब्रेनडॅडचे संस्थापक विशाल दायमा म्हणतात, कॅशबॅक गमावू नये म्हणून आमचा नायक ज्या पद्धतीने प्रयत्न करतो त्यामुळे ही जाहिरात फिल्म मजेदार आणि आनंददायी बनते. जॉन्टी रोड्सने एक चपळता आणि वेग आणला. त्यामुळे ही कल्पना फक्त विनोदी राहिली नाही तर ती वर्तन, सवय आणि काहीतरी परत मिळवण्याच्या थराराची गोष्ट बनली.

# पीएनजी ज्वेलर्सनी दिली ग्राहकांना प्युअर प्राइस ऑफर

**नागपूर, ९ सप्टेंबर :** भारतातील विश्वासार्ह दागिने ब्रँड आणि १९२ वर्षांची परंपरा लाभलेले पीएनजी ज्वेलर्स पुन्हा एकदा आपल्या बहुप्रतीक्षित प्युअर प्राइस ऑफर मोहिमेसह सज्ज झाले आहे. १ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत राबविण्यात येणारी ही योजना आगामी सण व लग्नसराईच्या हंगामात ग्राहकांना सोने खरेदी करताना आर्थिक दिलासा आणि आत्मविश्वास देण्यासाठी खास तयार करण्यात आली आहे.

सोन्याच्या किंमतीत सतत होणाऱ्या वाढीचा विचार करून, ही मोहिम ग्राहकांना योग्य समाधान देणारी आहे. या योजनेत ग्राहकांना त्यांच्या आवडीचे सोनं किंवा हीऱ्यांचे दागिने १ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर २०२५ या कालावधीत विद्यमान दराने प्री-बुक करण्याची संधी मिळते जर नंतर सोन्याचा दर वाढला, तरीही त्यांना आधीच्या कमी दराचा लाभ मिळतो. आणि जर दर कमी झाला, तर पीएनजी ज्वेलर्स बिलिंगवेळी कमी झालेला दर मान्य करून ग्राहकांना दिलासा देते. अशा प्रकारे ग्राहक नेहमीच फायद्यात राहतात. ही योजना ग्राहकांचा ताण कमी करून सोनं खरेदी अधिक सोपी आणि खात्रीशीर करते. त्यामुळे ग्राहक किंमतीतील चढ-उताराची चिंता न करता दागिन्यांच्या डिझाईन्स निवडण्यात लक्ष केंद्रित करू शकतात.

या मोहिमेबाबत पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, भारतीय कुटुंबांसाठी सोनं ही केवळ गुंतवणूक नसून भावनिक आणि सांस्कृतिक दृष्टीनेही महत्त्वाची गोष्ट आहे. प्युअर प्राइस ऑफरच्या माध्यमातून आम्हाला ग्राहकांना पारदर्शक, निश्चिंत आणि फायद्याचा खरेदी अनुभव द्यायचा आहे. हीच ग्राहक आणि पीएनजी ज्वेलर्समधील विश्वासाची जोडणी आहे.

ग्राहकांना प्युअर प्राइस ऑफर चा लाभ पीएनजी ज्वेलर्सच्या महाराष्ट्रातील सर्व लनांमध्ये घेता येणार आहे. या योजनेतून ग्राहकांसाठी उत्कृष्ट कारागिरी, पारदर्शकतेची खात्री आणि विश्वासासह उत्तम सेवा प्रदान करण्यासाठी उत्सुकतेने पीएनजी ज्वेलर्स वाट पाहत आहे.

# एचडीएफसी बँकेचा वार्षिक शॉपिंग बोनान्झा - फेस्टिव्ह ट्रीट्स २०२५, १०,००० हून अधिक ऑफर्ससह सुरू

**मुंबई, ९ सप्टेंबर :** भारतातील आघाडीची खासगी बँक एचडीएफसी बँकेने आपल्या वार्षिक फेस्टिव्ह ट्रीट्स २०२५ मोहिमेची घोषणा केली आहे. या मोहिमेमुळे देशातील सणासुदीच्या खरेदीची सुरुवात झाली आहे. या देशभर लागू असलेल्या शॉपिंग बोनान्झामध्ये ग्राहकांना क्रेडिट कार्ड्स, लोन, पेझॅप आणि इझीईएमआय वर १०,००० हून अधिक आकर्षक ऑफर्स मिळणार आहेत. त्यामुळे ग्राहकांसाठी सणासुदीची खरेदी अधिक परवडणारी आणि फायदेशीर ठरणार आहे.

या वर्षीची फेस्टिव्ह ट्रीट्स मोहीम टप्प्याटप्प्याने सुरू होणार आहे. ही मोहीम विविध सणांनुसार राबवली जाईल सुरुवात ओणमपासून होईल, त्यानंतर गणेश चतुर्थी, नवरात्र, दुर्गापूजा आणि नंतर दिवाळी अशा प्रमुख सणांनुसार ऑफर्स दिल्या जातील. यामुळे ग्राहकांना त्यांच्या सणासुदीच्या काळात योग्य आणि आकर्षक ऑफर्स मिळतील.

एचडीएफसी बँक तिच्या मोठ्या नेटवर्कचा उपयोग या सणासुदीच्या मोहिमेसाठी करणार आहे ज्यात ९,४९९ शाखा, २१,२५१ एटीएम आणि ६ लाखांहून अधिक व्यापारी आणि डीलर टचपॉइंट्स समाविष्ट आहेत. बँक ३७,००० हून अधिक ठिकाणी विशेष उपक्रम राबवणार आहे जसे की रिटेल सेंटर्स, रेसिडेन्शियल कॉम्प्लेक्स आणि ऑफिसेसमध्ये, जेणेकरून ग्राहकांपर्यंत या ऑफर्स सहज पोहोचू शकतील.

पराग राव, कंट्री हेड - पेमेंट्स, लायबिलिटी प्रोडक्ट्स, कन्स्युमर फायनान्स आणि मार्केटिंग, एचडीएफसी बँक म्हणाले, देश सणाच्या उत्साहात रंगू लागला असताना, आम्ही आमच्या ग्राहकांसाठी अनेक आकर्षक ऑफर्स घेऊन आलो आहोत. या ऑफर्समुळे त्यांना खरेदी करताना बचतही करता येईल आणि उत्सवाचा आनंदही घेता येईल. हे सर्व आमच्या कार्ड्स, लोन, पेझॅप आणि इझीईएमआय च्या ऑफर्स द्वारे शक्य होईल. फेस्टिव्ह ट्रीट्स ही आमची वार्षिक मोहीम असून ती देशातील खरेदीला चालना देते आणि ग्राहकांना त्यांच्या सणासुदीच्या खरेदीवर बचत करण्याची संधी उपलब्ध करून देते.

रवी संथानम, ग्रुप हेड आणि सीएमओ, डायरेक्ट टू कंझ्युमर प्रॉडक्ट्सचे प्रमुख, एचडीएफसी बँक म्हणाले, फेस्टिव्ह ट्रीट्स ही आमची अनेक वर्षे चालणारी मोहीम आहे, जी सणासुदीच्या काळातील एक मोठी सुरुवात मानली जाते. आम्ही आमच्या मजबूत भौतिक आणि डिजिटल नेटवर्कद्वारे या खास ऑफर्स ग्राहकांपर्यंत पोहोचवत आहोत. ओणमपासून दिवाळीपर्यंत टप्प्याटप्प्याने आणि स्थानिक पातळीवरील उपक्रमांद्वारे ही मोहीम राबवून आम्ही सुनिश्चित करू की या ऑफर्स केवळ आकर्षकच नव्हे तर स्थानिक समुदायांसाठीही अत्यंत उपयुक्त ठरतील.

# गॅलेक्सी टॅब एस११ सिरीज लॉंच

**नवी दिल्ली, ९ सप्टेंबर :** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज गॅलेक्सी टॅब एस११ अल्ट्रा आणि गॅलेक्सी टॅब एस११ च्या लॉंचची घोषणा केली, ज्यामधून सर्वात इंटेलिजण्ट व प्रगत टॅब्लेट अनुभव वितरित केला आहे. गॅलेक्सी टॅब एस११ सिरीज चालता-फिरता प्रभावी उत्पादकता देण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, ज्यामध्ये प्रो-ग्रेड हार्डवेअरसह मोठ्या स्क्रिनसाठी सानुकूल केलेले अनुभव आहेत. गॅलेक्सी टॅब एस११ अल्ट्रा आतापर्यंतचा सर्वात सडपातळ गॅलेक्सी टॅब आहे. कार्यक्षमतेबाबत तडजोड न करता हा टॅब्लेट स्लिम फॉर्म फॅक्टरच्या पलीकडे जात प्रीमियम टॅब्लेटच्या क्षमता दाखवू शकतो. गॅलेक्सी टॅब एस११ अल्ट्रा फक्त ५.१ मिमी जाड आहे आणि वजन फक्त ६९२ ग्रॅम आहे, तुलनेत त्याच्या पूर्वीच्या टॅब्लेटची जाडी ५.५ मिमी आणि वजन १ ग्रॅम आहे.

वन यूआय सह गॅलेक्सी टॅब एस११ सिरीज मल्टीमोडल एआयला प्रकाशझोतात आणते, वापरकर्ते टाइप करणाऱ्या, म्हणणाऱ्या व पाहणाऱ्या गोष्टींना समजून घेते आणि उपयुक्त सूचनांसह रिअल टाइम प्रतिसाद देते. हे टूल्स काम करण्यासाठी, कन्टेन्ट निर्माण करण्यासाठी आणि सहजपणे टास्क्स पूर्ण करण्यासाठी सोईस्कर मार्ग देतात.

टॅब एस११ सिरीज जेमिनी लाइव्हसह येते, जे रिअल-टाइम स्क्रिन शेअरिंग व व्हिज्युअल इनपुट देते, ज्यामुळे वापरकर्ते ते पाहत असलेल्या गोष्टींबाबत जेमिनीसोबत नैसर्गिकपणे संवाद साधू शकतात. स्क्रिनवरील कन्टेन्ट असो किंवा कॅमेरा नेत एखादी वस्तू दाखवायची असो जेमिनी लाइव्ह वापरकर्ते पाहत असलेल्या गोष्टी जाणून घेत संदर्भीय प्रश्नं व विनंत्यांची हाताळणी करू शकते. उदाहरणार्थ, वर्गामध्ये वापरकर्ते सहजपणे त्यांचे नोट्स स्क्रिनवर शेअर करू शकतात, ज्यानंतर जेमिनीला तक्त्याचे वर्णन करण्यास किंवा अभ्यासाचे स्पष्टीकरण देण्यास आणि माहिती संक्षिप्त रूपात सांगण्यास विचारू शकतात.

# आज का अंदाज

**बुधवार १० सप्टेंबर २०२५**

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४ | ५ | ८ | ४ | ७ | ८ | ९ |
| ३८० | २२० | ७८० | १२५ | २३९ | १२४ | ५६७ | ५६८ |
| ४८९ | ६८० | ६८० | २७९ | ७८९ | ४६७ | ४६८ | ३८८ |
| ५६० | ५९० | ५०० | ३७८ | ३४७ | २६९ | ११६ | १९९ |
| १० | ४० | ५३ | ८३ | ४० | ७० | ८६ | ९६ |
| १२ | ४२ | ५७ | ८७ | ४१ | ७१ | ८५ | ९५ |
| १९ | ४९ | ५६ | ८६ | ४२ | ७२ | ८३ | ९३ |

**१० सप्टेंबर : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३८ | ६८ | ९२ | ०२ |
| ३१ | ६१ | ९७ | ०७ |
| ३४ | ६४ | ९५ | ०५ |
| १२० | ६०० | १३५ | २३५ |
| ३०० | ५५६ | ३६० | ३७० |
| ७७१ | १५० | ५६८ | ५७८ |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

० ८ ९ ७ ६

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# सोनी सब घेऊन येत आहे, गणेश कार्तिकेय या ब्रह्मांडातील दिव्य परिवाराची महान गाथा

**मुंबई, ९ सप्टेंबर :** सोनी सब लवकरच घेऊन येत आहे एक भव्य मालिका गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय. या ब्रह्मांडातील सर्वात शक्तिशाली आणि दिव्य देवांच्या परिवाराची महान गाथा ही मालिका सादर करेल. ही मालिका प्रामुख्याने भगवान शिव, देवी पार्वती आणि त्यांची मुले गणेश आणि कार्तिकेय यांच्या माहीत नसलेल्या कथा सादर करेल. जीवनातील कसोट्यांना आणि आव्हानांना तोंड देऊन समस्त मानवतेला मार्गदर्शन आणि सामर्थ्य देणाऱ्या कुटुंबाची ही कहाणी आहे. दिव्य कथा मांडणारी ही मालिका भारतीय टेलिव्हिजनवरील एक भव्य मालिका असेल. या मालिकेत शिवाच्या भूमिकेत मोहित मलिक, पार्वतीच्या रूपात श्रेनू पारेख तर गणेश आणि कार्तिकेय यांच्या भूमिकेत अनुक्रमे आयुध भानुशाली आणि सुभान खान दिसणार आहेत.

प्रस्तुत मालिकेविषयी बोलताना मोहित मलिक म्हणतो, गणेश कार्तिकेय ही मूलतः शिव-पार्वती, आणि त्यांची मुले गणेश व कार्तिकेय या कुटुंबाची कहाणी आहे. शंकर आणि पार्वतीच्या त्यांच्या मुलांशी असलेल्या नात्यामधून ही मालिका प्रत्येक माता-पित्याच्या अनुभवाचा शोध घेते, मग परिस्थिती कशीही असो- प्रेमाचा वर्षाव असो, संघर्षाची वेदना असो किंवा कुटुंबाला एकत्र ठेवण्याची आशा असो. केवळ भक्ती नाही तर नात्यांमधील सौंदर्य आणि एकत्रित असल्याची ताकद दर्शविणाऱ्या या मालिकेचा भाग असल्याचा मला आनंद वाटतो.

# राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज तुम्ही कठोर परिश्रम आणि समर्पणाने काही काम करण्यात यशस्वी व्हाल, ज्यामुळे तुमच्या पालकांनाही अभिमान वाटेल.

**वृषभ :** आज नशीब तुम्हाला पूर्णपणे साथ देईल आणि तुमच्या योजना यशस्वी होतील. आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी थोडे अधिक परिश्रम करावे लागतील. तुम्हाला सहकाजयाकडून मदत मिळू शकते.

**मिथुन :** आज तुमची सामाजिक कार्यात रस वाढेल, तुम्हाला एखाद्या संस्थेत सामील होण्याची संधी मिळेल. आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुमचे लक्ष नवीन गोष्टींकडे आकर्षित होईल.

**कर्क :** आज तुम्हाला जवळच्या व्यक्तीकडून चांगली बातमी मिळेल, तुमच्या घरातील वातावरणही आनंददायी राहील. आज तुमची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा मजबूत होईल.

**सिंह :** तुम्हाला परदेशी कंपनीकडून नोकरीची ऑफर मिळू शकते. त्यात सामील होणे तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. आज प्रत्येकजण तुमच्या कामाने खूप प्रभावित होईल आणि तुमच्याकडून प्रेरितही होईल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी मिश्र असेल. दीर्घकाळापासून प्रलंबित असलेले काम पूर्ण होणार असल्याने आज तुम्ही आनंदी असाल. नवीन व्यवसाय आजच सुरू करू शकता.

**तुळ :** विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस शुभ असेल. आज तुम्हाला तुमच्या शिक्षकांकडून प्रशंसा मिळेल. कोणतीही योजना आखताना तुमच्या जोडीदाराकडून पूर्ण सहकार्य मिळेल. भावंडांशी सहकार्याचे वर्तन राहील.

**वृश्चिक :** आज कामाच्या बाबतीत घाईघाईने कोणताही मोठा निर्णय घेऊ नका. नवीन योजना इत्यादींवर खर्च होण्याची शक्यता आहे. तुम्हाला काहीतरी मोठे करण्याची प्रेरणा मिळेल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. तुमची एखाद्या वरिष्ठ व्यक्तीशी भेट होईल. आज तुम्ही तुमच्या जोडीदारासाठी भेटवस्तू खरेदी कराल. घरगुती उपकरणे देखील खरेदी करू शकता.

**मकर :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुम्हाला ट्रान्सफरशी संबंधित माहिती मिळू शकते, ज्यामुळे तुमचे काम सोपे होईल. या राशीच्या लोकांना आज त्यांच्या जोडीदाराकडून खूप प्रेम मिळेल.

**कुंभ :** आज तुम्ही व्यवसायातील बदलांबद्दल चर्चा करू शकता आणि ऑफिसमध्ये तुमची सर्जनशीलता पूर्वीपेक्षा चांगली असेल. या राशीच्या प्रेमींसाठी हा एक उत्तम दिवस आहे.

**मीन :** आज तुमचे मन सर्जनशील कामात गुंतलेले असेल, तुम्ही चित्रकला देखील करू शकता. आज तुम्हाला तुमच्या कठोर परिश्रम आणि चांगल्या वर्तनामुळे जे काही पात्र आहे ते मिळेल.

# शब्दकोडे क्रमांक २२१३




**आडवे शब्द :-**
१) अतिशय श्रीमंत मनुष्य
६) झाडाभोवतीचा कट्टा
८) पडदा
१०) फळातील खाद्यभाग
११) पंख
१२) वेळ घालविणे
१३) एक सुगंधी वनस्पती
१४) नोंदण्यासारखा गुन्हा
१७) आयुष्य
१९) बाई
२१) बोजा, भार
२४) देखावा, सजावट
२६) मत्स्य
२७) जास्तीतजास्त व कमीत कमी
२९) योग्यवेळी
३०) घबराटीमुळे होणारी धावपळ
३२) ईर्षा, बळ शक्ती, जोर
३३) फूल, पुष्प
३५) रात्री सुगंध पसरविणारी वनस्पती
३७) सापाने सोडलेली त्वचा
३८) गळ्यामागचा अवयव
३९) शेवट
४०) फोक, छडी
४१) लहान
४२) हात
४४) दक्षतेचा इशारा
४५) पक्ष, बाजू, काठ
४६) आरडाओरड, गोंधळ
४८) अलमारी
४९) पतिपत्नी
५१) केर
५३) हिन्दुस्थान
५५) गोष्ट विचारात घेणे (वा.प्र.)
५७) हत्तीचा शिक्षक
५८) उंच सखल नसलेले
६०) लाखाचा आकडा
६२) रतिचा पती
६३) लष्करी सिक्षण
६५) एक पालेभाजी
६६) सन्मानाची अल्प रक्कम
६७) उपयोग
६८) श्रीयुत, श्रीमान

**उभे शब्द :-**
१) दरिद्री माणूस
२) वरपांगी
३) गाडीचे छत
४) कळलाव्या मुनी
५) जावळा
६) भिंतीवर सरपटणारा प्राणी
७) गूढ
८) आजीची आई
९) छोटा
१२) पुण्याजवळचा एक घाट
१५) व्यय
१६) पर्जन्यकाळ
१८) नवरदेवाची आई
२०) विश्रांती
२२) चुकून, अजाणता
२३) कोकणी भाषेतील एक पोटभाषा
२४) आजूबाजूचा प्रदेश
२५) पुरापुरा अंदाज
२६) माप घेणे, मोजणे
२८) खून करणे (वा.प्र.), मारून रक्त पिणे
३१) तसराळे
३४) अंत:करण
३६) कमळासारखे सुंदर डोळे
३७) कर्णेंद्रिय
४०) सोने
४१) चीजवस्तू
४२) ज्वारीची वाळलेली ताटे, जनावरांचे खाद्य
४३) स्वत:ला
४५) युक्ती
४६) एक सुगंधी उष्ण पेय
४७) शस्त्र
५०) यमाचे घर
५२) सुकुमार व सुंदर
५३) स्तुती करणारा
५४) समशेर
५६) मंदिर
५९) पर्ण
६१) ऱ्हास, उतरती कळा नाश
६२) पुष्परस
६३) बशीचा जोडीदार
६४) अंधार
६५) बंधन, फास, फासा

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# शेंबाळिपंपरीत ७२ जणांना विषबाधा



■ महासागर प्रतिनिधी,
पुसद, दि. ९ :

तालुक्यातील शेंबाळिपंपरी येथे जवळपास ७२ जणांना विषबाधा झाल्याची घटना शनिवारी उघडकीस आली. गावातील लहान मुलांचा समावेश असून महिला, पुरुष बाधित झाले आहे. अनेकांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. उपजिल्हा रुग्णालयात १२ रुग्ण दाखल पुसद उपजिल्हा रुग्णालयात तब्बल १२ रुग्ण दाखल असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अशी माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. अतुल रुणवाल व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सरकुंडे यांनी दिली आहे. यामध्ये काही महिला व पुरुषांसह, १३ लहान मुलांचा समावेश आहे. नेमकी विषबाधा कशामुळे झाली याचा शोध लागलेला नसून डॉक्टरांमार्फत पिण्याच्या पाण्याचे घेण्यात आले आहे. शेंबाळिपंपरी येथे राहणाऱ्या तिघांना शनिवारी विषबाधा झाली होती. त्यानंतर अचानक रविवारी ३७ जणांना विषबाधा झाली होती. विषबाधित रुग्णांची रविवारी अचानक संख्या वाढल्याने शेंबाळिपंपरीतील खासगी रुग्णालय व पीएचसी रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. यामध्ये २६ लहान मुले व ११ महिला व पुरुषांचा समावेश आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात काही रुग्ण दाखल असून त्यांच्यावरही उपचार सुरू आहे. शुक्रवारी गावातील मिरवणूक होती. लोकवर्गणीतून खीर तयार करून प्रसाद म्हणून महिला, पुरुष व लहान मुलांना वाटण्यात आली होती. त्यानंतर रात्री पाणी व जेवण केल्यानंतर शनिवार, दि. ६ सप्टेंबरला सकाळी एक अडीच वर्षाच्या व एका १४ वर्षाच्या मुलासह एका बारा वर्षाच्या मुलीला अचानक उलटीसह इतर त्रास सुरू झाला. त्यांना शेंबाळिपंपरीतील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते. पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत प्राथमिक आरोग्य केंद्र शेंबाळिपंपरी येथे विषबाधा झाल्यामुळे रविवारी दि. ७ सप्टेंबरला यवतमाळ जिल्हा परिषदेचे माजी सदस्य जैनुल भाई सिद्दीकी यांच्या निवासस्थानी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सरकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या व सामाजिक कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शेंबाळिपंपरी आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निधी ताबेकर, डॉ.सुनील रबडे, डॉ.पल्लवी टाकस आणि आरोग्य केंद्राची टीम व गावातील सर्व आशा वर्कर्स यांच्या समवेत विषबाधा बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. गावात सध्या सर्वेक्षण सुरू असून पाण्याचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करिता पाठविण्यात आले आहे.

# प्रा. सदानंद माळी यांना सेवाव्रती पुरस्कार



■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. ९ : 'शिक्षक हे केवळ ज्ञान देत नाहीत, तर ते विद्यार्थ्यांमध्ये नैतिक मूल्ये आणि सामाजिक जाणीव निर्माण करतात. देशाच्या उज्वल भविष्याची पायाभरणी करण्याचे कार्य शिक्षकच करत असतात,असे प्रतिपादन अॅड. तुषार महाजन यांनी केले. बुलडाणा एज्युकेशन सोसायटी संचालित शिक्षण संस्थेतील शिक्षकांच्या योगदानाला गौरव देण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने कै. शंकर प्रल्हाद देशपांडे आणि प्रमिला शंकर देशपांडे स्मृती सेवाव्रती अध्यापक आणि अध्यापिका पुरस्कार वितरण समारंभ नुकताच एडेड हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रातील प्रा सदानंद माळी यांना त्यांच्या प्रदीर्घ सेवेबद्दल हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. शिक्षक दिनानिमित्त सेवाव्रती पुरस्काराचे आयोजन करण्यात आले. शिक्षकांनी विद्यार्थी घडवण्यासोबतच समाजासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव करणे हा या पुरस्कारामागील मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुलडाणा एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष अॅड तुषार महाजन होते. यावेळी ते बोलत होते. संस्थेचे सदस्य अॅड.आनंद चेकेटकर,तो.सी. उबरहंडे , मुख्याध्यापक किंबहुने , पर्यवेक्षिका निकाळजे मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळ अयाचित यांनी केले. पत्की मॅडम यांनी संस्कृत भाषेत अपले मनोगत व्यक्त केले. संस्थेतील सदस्य तो.सी.उबरहंडे यांनी शिक्षक हे समाजाला दिशा देणारे आहेत.त्यामुळे शिक्षकांचा सन्मान होणे महत्वाचे आहे. याप्रसंगी मागील शालेय आठवणीला उजाळा दिला. संस्थेचे सन्मानीय सदस्य अॅड. आनंद चेकेटकर यांनी शिक्षकांचे महत्व आपल्या भाषणातून सांगितले. अॅड. तुषार जी महाजन यांनी आपल्या भाषणात प्रा माळी यांचेसामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रातील योगदानातून त्यांच्या कार्याचे महत्व आणि त्यांचे समर्पण अधोरेखित केले. निष्ठेने काम करू यावेळी प्रा सदानंद माळी यांनी पुरस्कार दिल्याबद्दल आभार मानले आणि भविष्यातही अधिक निष्ठेने काम करण्याची ग्वाही दिली. या पुरस्काराने त्यांच्या कार्याला नवी प्रेरणा मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन एडेड हायस्कूल बुलडाणा शालेय प्रशासन व भालचंद्र शंकर देशपांडे कुटुंबीयांनी केले. कार्यक्रमानंतर सेवाव्रती पुरस्कार प्राप्त प्रा सदानंद माळी यांच्या हस्ते हरीत सेने अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले.

## शिक्षक सशक्त समाजाची निर्मिती करू शकतो : नरवाडे



■ महासागर प्रतिनिधी,
अकोला, दि. ९ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर टिचर्स असोसिएशन (डाटा), सीताबाई महाविद्यालयाच्या सभागृहात डाटाचे एकदिवसीय जिल्हा अधिवेशन आयोजित करण्यात आले. नवीन शैक्षणिक धोरणांचा विद्यार्थी व शिक्षण क्षेत्राला कसा फटका बसेल, याबाबत जनजागृती करण्याची आवश्यकता आहे, असा सूर अधिवेशनात उमटला. तसेच एकजूट शिक्षक सशक्त समाजाची निर्मिती करु शकतो, असे मत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे उपकुलसचिव राहुल नरवाडे म्हणाले. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी विभागीय सचिव डॉ. एम. आर. इंगळे यांच्या मार्गदर्शनात पार पडले. याप्रसंगी अधिवेशनाध्यक्ष म्हणून डाटाचे विभागीय सहसचिव डॉ. कल्याण साखरकर होते. स्वागताध्यक्ष डाटा संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. प्रसन्नजीत गवई होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी सिनेट सदस्य डॉ. प्रफुल्ल गवई, माजी जिल्हाध्यक्ष डॉ. संदीप भोवते, डॉ. वर्षा सुखदेवे, प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर, प्राचार्य डॉ. विलास तायडे उपस्थित होते. डॉ. नाना भडके यांनी स्वरचित संघटनेवर आधारीत स्वागत गीत गायले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष डॉ. प्रसन्नजीत गवई यांनी केले. त्यांनी संघटनेच्या आजपर्यंत केलेल्या कार्याचा आलेख मांडला आणि संघटनेची पुढील वाटचाल कशी राहील याविषयी मार्गदर्शन केले. अधिवेशनात डॉ. धनंजय तळवनकर, डॉ. आर. एम. भिसे, डॉ. सुनील पांडे यांचीही भाषणे झाली. समारोपीय सत्राच्या अध्यक्षीय भाषणात डॉ. आर. डी. सिकची यांनी अशाच प्रकारचे कार्य संघटनेने करावे, अशी आशा व्यक्त केली. सूत्रसंचालन अॅड. वैष्णवी हागोणे व प्रा. राहुल माहुरे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. मनीषा कांबळे यांनी केले.

विद्यार्थ्यांचे संघटन आवश्यक : उपकुलसचिव राहुल नरवाडे यांनी डाटा संघटनेची आवश्यकता आहे, असे म्हणत सर्वांनी एकजुटीने संघटीत होण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांना या माध्यमातून संघटीत करुन संघटना बळकट करता आली तर पुढील पिढीचे भविष्य निश्चितच उज्वल बनू शकते, असेही ते म्हणाले. उद्घाटकीय सत्राचे सूत्रसंचालन विशाल नंदागवळी तर आभार प्रा. राहुल माहुरे यांनी मानले. सत्कार समारंभ व समारोपीय सत्राचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. डी. सिकची होते. यांनी विविध प्राधिकरणातील पदांच्या प्रक्रियेवर भाष्य केले. अधिवेशनात सेवानिवृत्त प्राध्यापक, नेट-सेट, पीएचडी तथा पीएचडी मार्गदर्शक, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ७० मान्यवरांचा सत्कार डाटा संघटनेच्या वतीने करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे, प्राचार्य डॉ. धनंजय तळवनकर, प्राचार्य डॉ. सुनील पांडे, प्राचार्य डॉ. किरण खंडारे, प्राचार्य डॉ. विलास तायडे, प्राचार्य डॉ. नीरज अंभोरे, प्राचार्य डॉ. भास्कर पाटील, प्राचार्य डॉ. विनोद इंगळे उपस्थित होते.

# ओबीसी बचाव समितीचा आंदोलनाचा इशारा



■ महासागर प्रतिनिधी,
मूर्तिजापूर, दि.९ :

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाने १ सप्टेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या शासन निर्णय संदर्भात ओबीसी समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या निर्णयाद्वारे मराठा समाजातील काही व्यक्तींना कुणबी समाजाशी जोडून थेट ओबीसी प्रमाणपत्राचा मार्ग खुला करण्यात आला आहे. हा निर्णय 'अन्यायकारक, बेकायदेशीर व असंवैधानिक' असल्याचा ठपका ठेवत ओबीसी आरक्षण बचाव कृती समितीने उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन आंदोलनाचा इशारा दिला आहे. सर्वोच्च न्यायालयीन निर्णयांविरोधी धोरण असल्याचे म्हटले आहे. समितीच्या प्रमुख मागण्यांमध्ये वरील शासन निर्णय तत्काळ मागे घ्यावा, ओबीसी आरक्षणात अन्याय्य समावेश होऊ नये, ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व व हक्क संरक्षित करण्यासाठी ठोस धोरण जाहिर करावे, आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. या वेळी उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना लेखी निवेदन देण्यात आले. वेळी विनायक गुल्हाने, नरेंद्र खवले, आशीष निलखन, नंदकिशोर राऊत, श्रीकृष्ण बोळे, किशोर सोनोने, प्रा. अशोक बोळे, योगेश आगाशे, माजी प्राचार्य गजानन बोचरे, जगदीश तायडे, प्रदीप बेलसरे, अविनाश यावले, प्रशांत सेलवटे, सुरेंद्र वरोकार, श्रीकृष्ण घाटे आदी उपस्थित होते.

# फासेपारधी बांधवांचे ठिय्या आंदोलन



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. ९ :

गेल्या काही वर्षापासून सातत्याने रखडून पडलेल्या फासे पारधी समाजाच्या मागण्यांकडे शासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करीत मोठ्या संखेने फासे पारधी समाजातील महिला, पुरूष आणि लहान मुले यांचा मोर्चा सोमवारी दि. ८ ऑगष्ट रोजी अचानक शहरात दाखल झाला. त्यांनी आर्णी मार्गावर असलेल्या आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या निवासस्थानासमोर धडक देत ठिय्या आंदोलन सुरू केले.

राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या शहरातील निवासस्थानासमोर फासेपारधी बांधवांनी ठिय्या आंदोलन केले. श्री दादाजी आदिवासी फासेपारधी समाज संघटनाच्या नेतृत्वात अचानक करण्यात आलेल्या या आंदोलनात फासेपारधींचा मोर्चा उईके यांच्या निवासस्थानी धडकला. त्यांनी त्या ठिकाणी चक्क ठिय्या मांडून आंदोलन सुरू केले. विविध मागण्या मान्य होईस्तोवर हे ठिय्या आंदोलन सुरू राहील अशी भूमीका आंदोलकांनी घेतली. दरम्यान अचानक करण्यात आलेल्या या आंदोलनाची माहिती मिळताच अवधूत वाडी पोलिसांनी घटनास्थळ गाठले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. उईके हे मुंबई येथे असल्याने अध्यक्ष मतीन भोसले यांचा भ्रमणध्वनी वरून आदिवासी विकास मंत्र्यांशी संपर्क साधून दिला.

यावेळी त्यांनी सर्व मागण्यासंदर्भात योग्य कारवाई करु असे आश्वासन दिले.

# अंध मातेला परत मिळाली दृष्टी बाळाचा चेहरा पाहून आई भावूक



■ महासागर प्रतिनिधी
खामगाव, दि. ९ :

जनुना येथील वैशाली ज्ञानेश्वर गटूले या ३५ वर्षीय महिलेच्या दोन्ही डोळ्यांवरील मोतीबिंदूची मोफत शस्त्रक्रिया यशस्वी झाली. नांदुरा येथील मोहनराव नारायणा नेत्रालयात ही शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर वैशालीला पुन्हा स्पष्ट दिसू लागले. दोन महिन्यांच्या बाळाचा चेहरा पाहून तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू आले. पती ज्ञानेश्वर गटूले यांना नांदुरा येथील मोहनराव नारायणा नेत्रालयात मोफत शस्त्रक्रिया केली जाते, ही माहिती मिळाली. त्यांनी वैशालीला रुग्णालयात नेले. तपासणीदरम्यान डॉक्टरांनी दोन्ही डोळ्यांवर शस्त्रक्रिया आवश्यक असल्याचे सांगितले. नेत्रालयाचे सीईओ डॉ. विजय पाटील यांना वैशालीची अडचण समजावून सांगण्यात आली. त्यांनी तज्ज्ञ डॉक्टरांशी चर्चा करून शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय घेतला. सर्व तपासण्या पूर्ण करून दोन्ही डोळ्यांवरील मोतीबिंदूची शस्त्रक्रिया यशस्वी झाली. वैशालीला पूर्वीप्रमाणेच स्पष्ट दिसू लागले. शस्त्रक्रियेनंतर गटूले कुटुंबाने रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांचे आभार मानले. मोहनराव नारायणा नेत्रालयात आतापर्यंत तीन लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. डॉ. विजय पाटील यांनी सांगितले.

या महिलेची परिस्थिती गंभीर होती. तिच्या बाळाला आणि जगाला पाहण्यासाठी आम्ही थोडीशी मदत केली. वैशाली म्हणाली, आता नव्या दृष्टीमुळे कुटुंबाच्या आयुष्यात आनंदाचा नवा प्रकाश आला आहे.

# डीजे मुक्त मिरवणूक व आरोग्य शिबिरातून 'एकलव्य गणेशोत्सव मंडळा'चा उपक्रम



■ महासागर प्रतिनिधी,
संग्रामपूर, दि. ९ :

तालुक्यातील वरवट खंडेराव येथीलएकलव्य गणेशोत्सव मंडळयावर्षीच्या गणेशोत्सवात सामाजिक बांधिलकीची जपणूक करत नवा आदर्श निर्माण केला आहे. कोणताही गाजावाजा न करता डीजेच्या कर्णकर्कश आवाजाला फाटा देत मंडळाने पारंपरिक पद्धतीने भजनी मंडळासह विसर्जन मिरवणूक काढली. ढोल-ताशकिंवा डीजेच्या धांगडधिंगा ऐवजी संतपरंपरेतील अभंग व भजनांचा गजर करत भक्तिमय वातावरणात गणरायाला निरोप देण्यात आला. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण मिरवणुकीत सहभागी झाले होते. नागरिकांनीही या बदलाचे स्वागत करत मंडळाच्या पुढाकाराचे कौतुक केले.भक्ती, संस्कार आणि सामाजिक जबाबदारी यांचा संगम घडवणारी ही मिरवणूकअनेकांसाठी प्रेरणादायी ठरली. याचबरोबर मंडळाने गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोफत आरोग्य शिबिराचेही आयोजन केले होते.


या शिबिरात सर्वसामान्य तपासणीबरोबरच रक्तदाब, मधुमेह, डोळ्यांची तपासणी आदी चाचण्या करण्यात आल्या. ग्रामीण भागातील १४६ नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. अनेकांना वैद्यकीय सल्ला व औषधोपचार मोफत उपलब्ध करून देण्यात आले.

एकीकडे पर्यावरणपूरक आणि शांततेचा संदेश देणारी मिरवणूक, तर दुसरीकडे आरोग्याच्या जाणिवा जागृत करणारा उपक्रमअशा दुहेरी सामाजिक जाणिवेतून एकलव्य गणेशोत्सव मंडळाने खरीच एक आदर्श परंपरा घडवली आहे. आगामी काळात इतर गणेश मंडळांनीही या उपक्रमातून प्रेरणा घेण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## मादी अस्वलसह पिल्लाला सोडले अभयारण्यात

**बुलढाणा** : एका महिन्यापासून चिखली तालुक्यातील शेतशिवारात आपल्या एका पिलासह वावरणाऱ्या आणि हजारो शेतकऱ्यांसह ग्रामस्थांना भयभीत करणाऱ्या मादी अस्वल व तिच्या पिल्लाला वनविभागाने पकडले आहे. उंचपुऱ्या मादीला बेशुद्ध केल्यावर ती झाडावर अडकली होती. वनविभागाच्या चमूने तिची सुटका केली. या मादी अस्वल आणि तिच्या पिल्लाला जिल्ह्याच्या सीमेवरील सातपुडा पर्वत राजीतील अंबाबरवा अभयारण्या मध्ये सुखरूरित्या सोडण्यात आले .या बुलढाणा वन परिक्षेत्र अंतर्गतच्या दहिगाव ( तालुका चिखली) परिसरातील गाव शिवारात अस्वलाने आठ दिवसापासून धुमाकूळ घातला होता.

## वसंत आबाजी डहाके यांना प्रा. राम शेवाळकर आधारवड पुरस्कार जाहीर



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ९ : ज्येष्ठ साहित्यिक आणि ८५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष वसंत आबाजी डहाके यांना २०२४ सालासाठीचा प्राचार्य राम शेवाळकर आधारवड पुरस्कार जाहीर झाला आहे. १२ सप्टेंबर रोजी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सोमेश्वर पुसतकर सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार संजय खोडके असतील. मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. ९० व्या अखिल भारतीय साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला जाईल. पुरस्काराचे स्वरूप एक लक्ष रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे आहे. यावेळी आदित्य अनघा संस्थेचे संस्थापक समीर सराफ यांनाही २०२३ सालचा आधारवड पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या संस्थेत ६१० कर्मचारी व १३०० दैनिक प्रतिनिधी कार्यरत आहेत. प्राचार्य राम शेवाळकर हे अचलपूरचे रहिवासी होते.

ते एक प्रख्यात साहित्यिक आणि विचारवंत होते. त्यांच्या वक्तृत्व कलेमुळे त्यांना 'वक्ता दशसहस्रेषु' म्हणून ओळखले जात असे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी हा पुरस्कार विविध क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना दिला जातो.

# शनी ग्रहाची प्रतियुती म्हणजे काय?

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. ९ :

अवकाश निरीक्षक, अभ्यासक यांच्या दृष्टीने सूर्यमालेतील एक महत्त्वाचा ग्रह म्हणजे शनी होय. शनीच्या भोवतीने असलेल्या कड्यामुळे शनीचे वेगळेपण खुलून दिसते. शनी ग्रह येत्या २१ सप्टेंबरला पृथ्वीच्या जवळ राहणार आहे. या दिवशी शनी ग्रह हा अगदी सूर्यासमोर राहील. याला खगोलशास्त्रात प्रतियुती म्हणतात. प्रतियुतीच्या आसपास शनी व पृथ्वी यांचे सरासरी अंतर कमी असते. त्यामुळे या काळात शनीची सुंदर कडी चांगल्या प्रकारे दिसू शकते. तथापि ही कडी साध्या डोळ्यांनी नव्हे तर दुर्बिणीने पाहावी लागणार आहे. ही घटना डोळ्यात टिपण्यासाठी नागरिकही उत्सुक झाले आहेत.शनीला एकूण ८२ चंद्र आहेत, यामध्ये सर्वांत मोठा चंद्र टायटन आहे. या ग्रहाला सूर्याभोवती एक प्रदक्षिणा घालायला २९.५ वर्षे लागतात. या ग्रहाचा व्यास १.२० लाख किमी व तापमान शून्याखाली १८० अंश सेल्सिअस आहे. या ग्रहाची घनता सर्वांत कमी आहे. शनीची कडी २.७० लाख किमीपर्यंत पसरलेली व बर्फाची आहे. शनीचे वस्तुमान पृथ्वीच्या ९५ पट आहे. पृथ्वी ज्यावेळी शनीच्या विषववृत्त पातळीत असते, अशावेळी शनीचे कडे पृथ्वीवरून चांगल्या प्रकारे दिसू शकत नाही. शनीचा अभ्यास करणारे महिले मानवरहित यान 'कॅसिनी' हे आहे. 'व्हायेजर' या मानवरहित यानानेसुद्धा शनीचे जवळून छायाचित्र घेतले आहे. येत्या २१ सप्टेंबरला सूर्य मावळल्यानंतर लगेच हा ग्रह पूर्व क्षितिजावर उगवेल आणि पश्चिमेला मावळेल, हा ग्रह रात्रभर आकाशात दिसेल. शनीची कडी साध्या डोळ्यांनी दिसू शकत नाही. त्यामुळे ही दृश्ये पाहण्यासाठी विशिष्ट प्रकारची दुर्बीण वापरावी लागेल. त्यासाठीची माहितीही मराठी विज्ञान परिषदेमार्फत दिली जात आहे. हा ग्रह काळसर व पिंगट रंगाचा अगदी चमकदार असल्याने सहज ओळखता येईल. हा ग्रह पृथ्वीच्या जवळ आल्याने मानवी जीवनावर कोणताही परिणाम होणार नाही. याआधी ८ सप्टेंबर २०२४ रोजी शनी ग्रह पृथ्वीच्या जवळ आला होता, अशी मराठी विज्ञान परिषदेचे अमरावती विभागीय अध्यक्ष प्रवीण गुल्हाने व हौशी खगोल अभ्यासक विजय गिरुळकर यांनी दिली.विषुववृत्तावर शनीचा चेंडू फुगीर आणि ध्रुवांकडे चपटा आहे. सर्व ग्रहांत शनी ग्रह हा जास्त चपटा आहे.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **SHE KHAJA SHE MUNSHI**. NOW MY NEW NAME IS **SHAIKH KHAJA SHAIKH MUNSHI QURESHI.**
**ADD :** WARD NO 14, IMAMBADA CHOUK MEHKAR BULDHANA 443301

MY OLD NAME WAS **GHULAM MASOOD**. NOW MY NEW NAME IS **GULAM MASOOD KABIR AHMED.**
**ADD :** NEAR HAFIZ BEKRY CHOODI GALLI, MOMINPURA, NAGPUR - 440018

**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

क्र.म.अ./तह.नाग(शहर)/जकि-१२६/२०२१ दिनांक : ०९/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार.
२. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-१ अ.दि. १७/०३/२०२५
३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५
४. गणेश गोपालराव मानेकर, रा. प्लॉट नं. ३११, देवांजली अपार्टमेंट, रेशिमबाग, नागपूर यांचा अर्ज दिनांक ०५/०८/२०२५

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार गणेश गोपालराव मानेकर, रा. प्लॉट नं. ३११, देवांजली अपार्टमेंट, रेशिमबाग, नागपूर यांनी त्यांच्या मुलीच्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अपेक्षा गणेश मानेकर यांचा जन्म दिनांक ०२/०६/१९९४ रोजी त्यांच्या राहते घरी महावीर नगर, नागपूर येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

क्र.म.अ./तह.नाग(शहर)/जकि-१२७/२०२१ दिनांक : ०९/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार.
२. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-१ अ.दि. १७/०३/२०२५
३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५
४. अब्दुल रहमान अब्दुल हफीज, कब्रस्तान दरगाह जवळ, मोमीनपुरा, नागपूर यांचा अर्ज दिनांक २८/०७/२०२५

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार अब्दुल रहमान अब्दुल हफीज, रा. मोमीनपुरा, नागपूर यांनी त्यांच्या स्वत:च्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अब्दुल रहमान अब्दुल हफीज यांचा जन्म दिनांक ०१/०१/१९५९ रोजी त्यांच्या राहते घरी मोमीनपुरा, नागपूर, येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

**महसूल व वनविभाग**
**कोर्ट विद्यमान तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर शहर, यांचे कार्यालय**
(जुने पोलीस अधिक्षक कार्यालय, (शहर) नागपूर पिन कोड ४४०००१
तालुका - नागपूर शहर, जिल्हा - नागपूर
E-mail ID tahsildarngpcity@gmail.com दूरध्वनी क्र. ०७१२-२५६११७५

क्र.म.अ./तह.नाग(शहर)/जकि-१२१८/२०२५ दिनांक : ०९/०९/२०२५
वाचा: १. सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार.
२. मा.उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. ०३/ई-१ अ.दि. १७/०३/२०२५
३. मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१०४/२०२५ दिनांक १७/०३/२०२५
४. मोहम्मद शकील अब्दुल कलाम, रा. मोहम्मद अली सराय, मोमीनपुरा, नागपूर यांचा अर्ज दिनांक २८/०७/२०२५

**-: जाहिरनामा :-**

ज्याअर्थी अर्जदार मोहम्मद शकील अब्दुल कलाम, रा. मोहम्मद अली सराय, मोमीनपुरा, नागपूर यांनी त्यांच्या स्वत:च्या जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणेकामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू मोहम्मद शकील अब्दुल कलाम यांचा जन्म दिनांक ११/१२/१९६८ रोजी त्यांच्या राहते घरी मोमीनपुरा, नागपूर, येथे झाला. असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्माचे प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणेकामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), उपरोक्त वाचा क्र. १ आणि २, व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्मबाबत नोंद घेणेकामीचा आदेश देणेकरिता व गृहचौकशी करणेकामी कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी नागपूर (शहर), यांचे न्यायालयात स्वत: जातीने/वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहिरनाम्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठल्याही आक्षेप/उजर/विपरीत पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही असे गृहीत धरून प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, नागपूर शहर करीता

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# जोश



## कुरकुरीत ब्रेड भजी

**झटपट रेसिपी**

मित्रांनो, संध्याकाळी चहासोबत तुम्ही छानपैकी ब्रेड भजी खाऊ शकता. ही कुरकुरीत भजी संध्याकाळच्या वेळी पोटभरीची ठरतील.

**सामग्री:** चार ब्रेड स्लाईस, अर्धा कप दही, पाउण कप बेसन, वाटलेली हिरवी मिरची एक चमचा, थोडी कोथबिर, चवीनुसार मीठ, तेल

**कृती:** ब्रेड स्लाईसच्या कडा कापून घ्या. उरलेल्या ब्रेडचे छोटे तुकडे करून घ्या. आता एका भांड्यात बेसन, मिरची, दही आणि मीठ घालून घट्टसर पीठ बनवून घ्या. त्यात ब्रेडचे तुकडे घाला. आता कढईत तेल गरम करायला ठेवा. आता चमच्याने हे मिश्रण हलकेच कढईत सोडा. सोनेरी रंगावर तळून घ्या. कुरकुरीत आणि खमंग ब्रेड भजी चहासोबत खा.

## शेतकऱ्याची साबणनिर्मिती



**अचिव्हर**

असे म्हटले जाते की आवड असेल तर शेती फक्त धान्यांपुरती मर्यादित नाही, नवीन प्रयोग करून शेतकरी स्वतःसाठी रोजगार आणि ओळख दोन्ही निर्माण करू शकतात. मध्य प्रदेशातील बुरहानपूर जिल्ह्यातील एक्झिरा गावातील शेतकरी सूपडू चौहान यांनी असाच एक पराक्रम केला आहे. गेल्या चार वर्षांपासून केळीची नैसर्गिक शेती करणाऱ्या सूपडू चौहान यांनी आता शेतीसोबतच नवनवीन प्रयोग करून कडुनिंब आणि कोरफडीपासून हर्बल साबण बनवण्यास सुरुवात केली आहे.

टाळेबंदीदरम्यान सर्व काही बंद होते, तेव्हा सूपडू यांनी मोबाईलवर एक व्हिडीओ पाहिला. त्यात कडुनिंब आणि कोरफडीपासून साबण बनवण्याची पद्धत समजावून सांगितली होती. सुरुवातीला त्याने लहान प्रमाणात प्रयोग केले आणि यशस्वी झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू केले.

**साबण कसा बनवला जातो?**

सूपडू सांगतात, मी कडुलिंबाची पाने, कोरफडीचे जेल आणि ग्लिसरीन मिसळून साबण तयार करतो. यात कोणत्याही प्रकारचे रसायन नसल्यामुळे ते पूर्णपणे हर्बल आणि त्वचेला अनुकूल आहे. मुरुम आणि मुरुमांच्या समस्येत ते खूप प्रभावी ठरते. एकदा प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सुमारे १५ दिवस लागतात. एका बॅचमध्ये २०० ते ३०० नग साबण तयार केले जातात. बाजारात त्यांची कमत प्रति नग २० रुपये आहे.

**किती कमाई?**

शेतकरी सूपडू चौहान दरमहा ६०० ते ७०० साबण विकतात. ते घरोघरी आणि दुकानांमध्ये साबण पुरवतात आणि दरमहा चांगले उत्पन्न मिळवतात. ते म्हणतात, की शेतीतून जितका आनंद आणि समाधान मिळते तितकाच आनंद लोक म झा साबण वापरतात आणि म्हणतात, की त्याचा त्वचेला फायदा झाला तेव्हा मिळतो. माझ्यासाठी ही सर्वात मोठी कमाई आहे.

**नैसर्गिक शेतीतून दुहेरी फायदा**

केळ्याच्या शेतीमध्ये सूपडू फक्त सेंद्रिय खते आणि नैसर्गिक पद्धती वापरतात. यामुळे पिकाची गुणवत्ता चांगली राहते आणि आता त्याच्या हर्बल साबण व्यवसायाने त्याची ओळख आणि उत्पन्न दोन्ही दुप्पट केले आहे.

## शेर की जुबानी

| | | |
|---|---|---|
| जिंदगी गुजर जाए पर दोस्ती कम न हो, याद हमें रखना चाहे पास हम न हो। | तारों में अकेला चांद जगमगाता है, मुश्किलों में अकेला इन्सान डगमगाता है, कांटो से मत घबराना मेरे दोस्त, क्योंकी काटों में भी गुलाब मुस्कुराता है। | कभी रात में तारे गिनके देख लेना, जितना तुम गिन पाए उतना तुम हमें यात करते हो, और जितने तारे बच जाए उतना हम तुमको याद करते हैं। |

## 'रेझ्युमे' अधिक चांगला कसा कराल?

**सल्ला मोलाचा**



डिजिटलायझेशन'च्या युगात नोकरी शोधण्याची प्रक्रिया झपाट्याने बदलत आहे. कंपन्यांकडे आज वेळेची कमतरता असून प्रत्येक उमेदवाराचा सीव्ही सखोलपणे वाचला जात नाही. त्यामुळेच आता जुन्या पद्धतीचे रेझ्युमे चालत नाहीत. त्याऐवजी कमी पण योग्य आणि प्रभावी माहिती असलेला सीव्ही महत्त्वाचा ठरत आहे.

आजही अनेकजण आपल्या 'सीव्ही'मध्ये वैयक्तिक माहिती, जसे की वैवाहिक स्थिती, धर्म, जन्मतारीख, आई-वडिलांची नावे अशा बाबी नमूद करतात; परंतु या माहितीचा नोकरीशी थेट काही संबंध नसतो. यामुळे सीव्ही लांबतो आणि मुख्य गोष्टींचे महत्त्व कमी होते. या जागेचा वापर आपण LinkedIn प्रोफाईल, पोर्टफोलिओ लक्स, ऋळींर्कील प्रोफाईल (IT क्षेत्रासाठी) यासाठी करू शकता. मोबाइल क्रमांक आणि ई-मेल मात्र अनिवार्य असावेत. कारण हेच तुमच्याशी संपर्क ठेवण्यासाठी मुख्य साधन ठरतात.

**'ऑब्जेक्टिव्ह' ठरवा**

एक मोठी चूक अनेक उमेदवार करतात, ती म्हणजे एकच 'Career Objebtive' अनेक ठिकाणी वापरणे; मात्र प्रत्येक कंपनीची गरज, कार्यपद्धती आणि संस्कृती वेगळी असते. त्यामुळे ज्या संस्थेसाठी अर्ज करत आहात, त्यानुसार ऑब्जेक्टिव्ह ठरवणे गरजेचे आहे. यामुळे 'एचआर' ला उमेदवाराच्या गंभीरतेचा आणि नोकरीसाठीच्या तत्परतेचा अंदाज येतो. केवळ नोकरीसाठी सुसंगत अनुभवच नमूद करा.

आपल्याकडे अनेक नोकरी कवा इंटर्नशिपचा अनुभव असतो; पण त्या सर्व नोंदवणे ही चूक ठरू शकते. कारण प्रत्येक अनुभव आवश्यकच असेल असे नाही. त्याऐवजी, संबंधित जॉबच्या भूमिकेशी जुळणारेच अनुभव समाविष्ट करा. यामुळे 'एचआर'चे वाचन सुकर होते आणि 'सीव्ही' अधिक लक्षवेधी ठरतो.

**स्पर्धा आणि उपक्रम गरजेपुरतेच लिहा**

शाळेतील लहान वयातील स्पर्धा, निबंध, चित्रकला अशा गोष्टी जर नोकरीशी संबंधित नसतील, तर त्यांचा उल्लेख टाळा. त्याऐवजी, शैक्षणिक प्रगती, मिळवलेली स्कॉलरशिप, संबंधित कोर्सेसचे उल्लेख फायदेशीर ठरू शकतात.

## राजस्थानात ही ठिकाणे अवश्य पाहा...



**स्टाईल स्टेटमेंट**

भारतातील सर्वात रंगीबेरंगी आणि ऐतिहासिक राज्य म्हणजे राजस्थान. ते खासमखास राजवाड्यांसाठी, किल्ल्यांसाठी, वाळवंटांसाठी, तलावांसाठी आणि चैतन्यशील संस्कृतीसाठी ओळखले जाते. राजस्थानची राजधानी असलेले गुलाबी शहर जयपूर, त्याच्या ऐतिहासिक वारसा आणि शाही वैभवासाठी ओळखले जाते. येथे आमर महल, सिटी पॅलेस आणि हवा महलला भेट देणे आवश्यक आहे. जयपूरच्या रंगीबेरंगी बाजारपेठांमध्ये दागिने, बूट आणि हस्तकला खरेदी करणेदेखील आनंददायी आहे.

**※ उदयपूर लेक सिटी**

रोमँटिक ठिकाणांची आवड असेल, तर उदयपूर परिपूर्ण आहे. येथे सिटी पॅलेस, लेक पिचोला आणि सहेलियों की बारीसारखी सुंदर ठिकाणे आहेत. रात्री पिचोला लेकवर बोटग करणे हा एक संस्मरणीय अनुभव ठरतो. उदयपूर हे केवळ भारतीय पर्यटकांमध्येच नाही, तर परदेशी पर्यटकांमध्येही खूप प्रसिद्ध आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने परदेशी पर्यटक येथे भेट देण्यासाठी येतात.

**※ सोनेरी वाळूचे शहर जैसलमेर**

जैसलमेर सोनेरी वाळू आणि वाळवंट संस्कृतीसाठी प्रसिद्ध आहे. सोनार किल्ला आणि गडीसर तलाव हे येथील मुख्य आकर्षण आहेत. जैसलमेरच्या वाळवंटात सँड सर्फिंग आणि कॅम्पफायरचा आनंद घेण्यास विसरू नका.

**※ जोधपूर ब्लू सिटी**


जोधपूरचा मेहरानगड किल्ला आणि उम्मेद भवन पॅलेस पाहण्यासारखे आहेत. जोधपूरच्या रस्त्यांवर फिरताना निळ्या घरांचे सौंदर्य तुम्हाला मंत्रमुग्ध करेल. येथील स्ट्रीट फूडचादेखील आवर्जून आस्वाद घ्यायला हवा.

**※ रणथंभोर आणि सवाई माधोपूर**

निसर्गप्रेमी असाल, तर रणथंभोर राष्ट्रीय उद्यानात वाघ सफारी नक्की करा. येथे तुम्हाला वाघ, बिबटे आणि इतर वन्य प्राणी पाहायला मिळतील. प्रत्येक कोपरा तुम्हाला एक नवीन कहाणी सांगतो. कधी राजांच्या अभिमानाची आणि वैभवाची, कधी वाळवंटातील सोनेरी वाळूची आणि साहसी अनुभवाची.

राजस्थानमध्ये प्रवास करणे हे केवळ पर्यटन नाही, तर तो एक अनुभव आहे. येथील रस्त्यांवर चालताना तुम्हाला इतिहास, कला आणि लोकसंस्कृतीचे थेट प्रदर्शन पहायला मिळेल. रंगीबेरंगी बाजारपेठा, स्वादिष्ट स्ट्रीट फूड, पारंपारिक राजस्थानी पोशाख आणि संगीत इथे भुरळ घालते.

## करीअर निवडीसाठी काय कराल?




**करीअरवेध**

करीअरच्या प्रवासाला सुरुवात करणे हा एखाद्याच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा क्षण असतो. आज तुम्ही घेतलेले निर्णय तुमचे भविष्य घडवतील, तुमच्या आनंदावर, आर्थिक स्थिरतेवर आणि एकूण समाधानावर परिणाम करतील. उपलब्ध असंख्य शक्यता आणि मार्गांमुळे योग्य करिअर मार्ग निवडणे कठीण वाटू शकते. तथापि, एक संरचित दृष्टिकोन अवलंबून आणि विविध घटकांचा विचार करून तुम्ही आपल्या कौशल्यांना, आवडींना आणि आकांक्षांना अनुकूल असा निर्णय घेऊ शकता.

**१. स्व-मूल्यांकन:** योग्य करिअर मार्ग निवडण्याचे पहिले पाऊल म्हणजे स्वतःला समजून घेणे. तुमची ताकद, कौशल्ये, आवडी आणि मूल्यांचे मूल्यांकन करण्यासाठी वेळ काढा. तुम्ही नैसर्गिकरित्या कशात चांगले आहात, कोणत्या बाबी तुम्हाला ऊर्जा देतात याचा अंदाज घ्या. तुमचे छंद, शैक्षणिक यश आणि मित्र आणि मार्गदर्शकांकडून मिळालेल्या अभिप्रायाचा विचार करा. तुमच्यासाठी योग्य असलेले करिअर पर्याय ओळखण्यासाठी आत्म-जागरूकता ही गुरुकिल्ली आहे.

**२. संशोधन:** विविध करिअर पर्यायांचा शोध घ्या. जगात करिअरचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत, त्यापैकी बरेच तुम्हाला कदाचित माहितीही नसतील. विविध उद्योग, नोकरीच्या भूमिका आणि व्यवसायांचा शोध घ्या. त्यांच्या जबाबदाऱ्या, आवश्यक पात्रता आणि संभाव्य वाढीच्या शक्यतांबद्दल जाणून घ्या. या क्षेत्रात आधीच असलेल्या व्यावसायिकांकडून अंतर्दृष्टी मिळविण्यासाठी नोकरी मेळे, सेमिनार आणि कार्यशाळांना उपस्थित रहा. येथेच रोजगार मेळा योजना कामाला येते.

**३. नोकरी मेळावे यांचा परिचय:** रोजगार मेळा हा एक मौल्यवान उपक्रम आहे, त्याचा उद्देश म्हणजे नोकरी शोधणाऱ्यांना नियोक्त्यांशी जोडणे. हे नोकरी मेळे व्यासपीठ म्हणून काम करतात, जिथे विविध कंपन्या आणि संस्था त्यांचे काम आणि उपलब्ध पदे प्रदर्शित करण्यासाठी बूथ स्थापित करतात. नोकरी मेळाव्यात सहभागी झाल्याने संभाव्य नियोक्त्यांशी थेट संपर्क साधता येतो. त्यामुळे संवाद साधण्याची, नोकरीच्या भूमिकांबद्दल चौकशी करण्याची आणि तुमचा सीव्ही सबमिट करण्याची संधी मिळते. ही योजना नोकरी शोधणाऱ्या आणि रोजगाराच्या संधींमधील अंतर कमी करण्यासाठी पूल म्हणून काम करते.

**४. कौशल्य विकास:** संभाव्य करिअर मार्ग ओळखल्यानंतर, तुम्हाला काही कौशल्यातील तफावत जाणवू शकते. स्वतःला अधिक आकर्षक उमेदवार बनवण्यासाठी या तफावती भरून काढणे आवश्यक आहे. आवश्यक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी कार्यशाळा, अभ्यासक्रम कवा ऑनलाइन वर्गांमध्ये नावनोंदणी करण्याचा विचार करा. रोजगार मेळा योजना अनेकदा कौशल्य विकास सत्रेदेखील देतात. त्यामुळे क्षमता वाढते आणि इच्छित क्षेत्रात नोकरी मिळण्याची शक्यता वाढते.

**५. ध्येय निश्चिती:** अल्पकालीन आणि दीर्घकालीन सुस्पष्ट ध्येय तुमच्या करिअर प्रवासाला दिशा देऊ शकते. अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही ध्येये निश्चित करा. पुढील काही वर्षांमध्ये तुम्ही काय साध्य करण्याचे ध्येय ठेवता? ते तुमच्या दीर्घकालीन आकांक्षांशी कसे जुळते हे बघून घ्या. स्पष्ट ध्येय असणे तुम्हाला लक्ष केंद्रित करण्यास आणि प्रेरित राहण्यास मदत करू शकते.

## स्मार्ट टिप्स



**'व्हॉट्स ॲप' वर नवीन वैशिष्ट्ये**

'व्हॉटस प'मध्ये ही तीन नवीन वैशिष्टये आली आहेत.

**※ शेड्यूल्ड कॉल**

आता वापरकर्ते 'व्हॉटस प' मध्ये ग्रुप कॉल शेड्यूल करू शकतात. याचा अर्थ असा, की वापरकर्ता त्याच्या कोणत्याही संपर्कांना कवा संपूर्ण गटाला व्हिडीओ कॉलसाठी आगाऊ सूचना पाठवू शकतो.

**※ इन-कॉल इंटरॅक्शन टूल्स**

दुसरे नवीन वैशिष्ट्य इन-कॉल इंटरॅक्शनबद्दल आहे. याचा अर्थ असा, की आता 'व्हॉटस प' वापरकर्ते व्हिडीओ कॉल दरम्यान प्रतिक्रिया देऊ शकतील. उदाहरणार्थ, एखाद्या वापरकर्त्याला बोलायचे असेल तर तो व्हिडीओ कॉल दरम्यान हात वर करू शकतो. त्याचप्रमाणे, तो संभाषणात व्यत्यय न आणता कॉल दरम्यान प्रतिक्रिया देऊ शकतो.

**※ नवीन कॉल व्यवस्थापन**

कंपनीने कॉल टॅबदेखील अपडेट केला आहे. आता त्यात येणाऱ्या कॉलम ध्ये सहभागी होणाऱ्या लोकांची यादी आणि शेअर करण्यायोग्य कॉल लक्सचे स्पष्ट दृश्य असेल. यासोबतच, जेव्हा कोणी शेअर केलेल्या लकवरून कॉल अटेंड करेल, तेव्हा कॉलरला त्याची सूचना मिळेल. ही 'व्हॉटस प'ची तयारी आहे. 'व्हॉटस प'ने वैयक्तिक आणि व्हिडीओ कॉलशी संबंधित ही महत्त्वाची वैशिष्ट्ये आणून तयारी केली आहे.

## टेक्नो टॉक


**'व्हॉट्स ॲप'ला इन्स्टाग्राम अकाऊंट जोडणारे फीचर**



**हे फीचर कसे काम करते?**

'मेटा'च्या अकाउंट सेंटरद्वारे इंस्टाग्राम अकाउंट लक करता येते. या फीचरमुळे वापरकर्त्यांना 'मेटा'च्या अकाउंट सेंटरद्वारे त्यांचे इंस्टाग्राम अकाउंट व्हॉट्स प्रोफाइलशी लक करण्याचा पर्याय मिळेल. 'व्हेरिफिकेशन'नंतर हे अकाउंट लक केले जाईल. एकदा पडताळणी झाल्यानंतर प्रोफाइलवर 'सोशल आयकॉन' दिसेल. यामुळे 'व्हॉट्स अप' वापरकर्त्यांच्या संपर्काला हे अकाउंट खरे आहे हे कळेल. हा पर्याय आधीही होता; परंतु आधी त्यात व्हेरिफिकेशन जोडले गेले नव्हते. 'व्हॉट्स अप' वापरकर्ते त्यांच्या प्रोफाइलवर कोणतेही इंस्टाग्राम अकाउंट दाखवू शकत होते. अशा परिस्थितीत काही वापरकर्ते गोंधळले होते, की 'व्हॉट्स अप' प्रोफाइलवर दिसणारे अकाउंट खरे आहे की दुसऱ्याचे इंस्टाग्राम अकाउंट आहे. हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी आणलेले नाही. सध्या कंपनी फक्त बीटा वापरकर्त्यांसाठी याची चाचणी घेत आहे. नंतर अभिप्रायाच्या आधारे टप्प्याटप्प्याने सर्व वापरकर्त्यांसाठी आणले जाईल. 'व्हॉट्स अप'च्या या नवीनतम वैशिष्ट्याचा लाभ घेण्यासाठी, प नियमितपणे अपडेट करत राहणे महत्त्वाचे आहे.

## टिप्स अँड ट्रिक्स




**इच्छेप्रमाणे फोटो एडिटींग करता येणार**

'गूगल'ने आपल्या गूगल फोटोज पसाठी एकदम मस्त अपडेट आणले आहे. हे फीचर फोटो प्रेमींसाठी वरदान ठरणार आहे. त्यामुळे फोटो एडिटग आता सोपे आणि मजेदार होणार आहे. या नव्या फीचरमुळे वापरकर्ते फक्त आपली इच्छा बोलून सांगून फोटो एडिट करू शकतील.

सर्वात अगोदर हे फीचर अमेरिकेतील पिक्सेल १० डिव्हाइसेसवर उपलब्ध होईल. त्यानंतर येत्या काही आठवड्यांमध्ये इतर अँड्रॉइड आणि 'आयओएस डिव्हाइसेस'वरही ते विस्तारित होईल. 'गूगल'च्या जेमिनी मॉडेल्सवर आधारित हे नवे फीचर 'गूगल फोटोज'च्या एडिटरचा भाग आहे. आता फोटो एडिट करण्यासाठी अवघड साधने शोधण्याची कवा स्लायडर्स ड करण्याची गरज नाही. हे वापरणारी व्यक्ती हवे असलेले बदल बोलून सांगू शकतात. उदाहरणार्थ 'बॅकग्राउंडच्या गाड्या काढा', 'हा जुना फोटो नवीन बनवा' कवा अगदी 'हा फोटो जरा चांगला कराफ अशा सूचना देता येतील. गूगल फोटोज त्या सूचनांचे पालन करून एडिट करेल. या फीचर्समुळे फोटो एडिटग केवळ जलदच होणार नाही, तर सर्वसामान्य वापरकर्त्यांसाठीही आणखी सोपे होईल.

## तिला गमवायचं नाही...




**मॅच मेकिंग**

गेल्या सहा महिन्यांपासून मी एका मुलीच्या प्रेमात आहे. तिच्या आणि माझ्या आईवडिलांना आमच्या नात्याबद्दल कल्पना आहे. पण गेल्या काही दिवसांपासून माझी मैत्रीण खूपच विचित्र वागते आहे. तिच्या आईवडिलांना आमचं हे नातं पसंत नसल्याचं तिचं म्हणणं आहे. ती याचं कारणही सांगायला तयार नाही. मी तिच्या पालकांशी बोलायला तयार आहे. पण ती याबद्दल काहीच बोलत नाही. आता मी काय करू? मला तिला गमवायचं नाही.

**उत्तर :** मित्रा, सध्या तू विचित्र परिस्थितीत अडकला आहेस. खरं तर तुझ्या मैत्रिणीने तिच्या पालकांच्या मनातलं जाणून घ्यायला हवं. त्यांच्या मनात तुझ्याबद्दल नेमकं काय आहे, न भेटताच ते तुला का नाकारत आहेत हे तिला कळायला हवं. आधी तिच्या पालकांचं म्हणणं ऐकून घ्या. मग तुम्ही दोघं बोला आणि पुढे काय करायचं हे ठरवा. तुम्ही दोघांनीही शांत रहाणं गरजेचं आहे. अजिबात गोंधळून जाऊ नका. काहीतरी मार्ग नक्कीच निघेल.

## सांभाळा शरीराचा तोल



**फिटनेस फंडा**

दोस्तांनो, आपल्याला आपल्या शरीराचा तोल सांभाळता आला पाहिजे. तोल सांभाळण्याचा सराव तुम्ही करू शकता. शरीराचा तोल सांभाळण्याचे लाभ जाणून घेऊ.

※ तोल सांभाळण्याच्या सरावामुळे तुमचे सांधे, स्नायू बळकट होतात. गुडघे, पायाच्या घोट्यालगतच्या स्नायूंना याचा लाभ होतो.

※ शरीराचा तोल सांभाळण्याचं तंत्र गवसल्यामुळे दुखापतीची शक्यता कमी होते.

※ शरीराचा तोल सांभाळण्याचा सराव करण्याआधी शरीराची क्षमता तपासून घ्या. यासाठी एका पायावर उभे रहा. अशा स्थितीत किती वेळ उभं रहाता येतं हे बघा. साधारण मिनिटभर या स्थितीत उभं रहाता यायला हवं.

※ तोल सांभाळण्यासाठी स्क्वॅट्स करायला सुरुवात करा. यामुळे पाय, पोटऱ्या आणि मांड्यांचे स्नायू बळकट होतील आणि एका पायावर तोल सांभाळणं शक्य होईल.

※ एका पायावर शरीराचा तोल सांभाळायचा सराव करा. स्क्वॅट्सच्या तुलनेत हा व्यायामपकार थोडा कठीण आणि गुंतागुंतीचा आहे. मात्र यामुळे तुम्हाला तोल सांभाळण्याचं तंत्र गवसेल.

※ योगासनं करताना शरीराच्या स्थितीत सतत बदल होत असतात. यामुळे शरीराचा तोल साधणं शक्य होतं. अगदी साधी योगासनं करतानाही वेगवेगळ्या स्नायूंवर ताण येतो. या सगळ्याचे लाभ शरीराला होतात.

## कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करायचंय?



**वेगळ्या वाटा**

सध्या ऑनलाईन शॉपिंगचा बराच बोलबाला आहे. विविध ऑनलाईन साईट्स ग्राहकांवर सवलतींची खैरात करतात. मोबाईल फोनसह विविध इलेक्ट्रॉनिक वस्तू अर्ध्या किमतीत मिळतात. अशा ऑनलाईन शॉपिंग साईट्समुळे दुकानदारांपुढे बरीच आव्हानं उभी राहिली. तरुण मंडळी ऑनलाईन खरेदी करत असली तरी अनेकांना वस्तू प्रत्यक्ष बघून, स्पर्श करून खरेदी करायला आवडतं. सध्याच्या तीव्र स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी दुकानदारही वेगवेगळे फंडे लढवत असतात. त्यातूनच कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना उदयाला आली आहे. या कॉन्सेप्ट स्टोअरच्या माध्यमातून तुम्हीही उद्योजक बनू शकता. याबाबतचं मार्गदर्शन...

कॉन्सेप्ट स्टोअर विशिष्ट संकल्पनेवर आधारित असतं. म्हणजे या स्टोअर्समध्ये ठराविक उत्पादनं विक्रीसाठी ठेवली जातात. काही दुकांनांमध्ये फक्त सौंदर्यप्रसाधनं मिळतात तर काहींमध्ये गृहोपयोगी वस्तू असतात. पुस्तकं, सजावटीच्या वस्तू अशा विविध संकल्पनांवर आधारित असणारी ही स्टोअर्स आता लोकप्रिय ठरत आहेत. ठराविक ग्राहकवर्ग समोर ठेऊन हे स्टोअर सुरू केलं जातं.

कॉन्सेप्ट स्टोअर ही संकल्पना अजूनही नवी आहे. त्यामुळे हा प्रकार लोकप्रिय होईपर्यंत थोडं थांबावं लागेल. दुसरं म्हणजे कॉन्सेप्ट स्टोअर्स नेहमीच्या दुकानांपेक्षा पूर्णपणे वेगळी असतात. ही स्टोअर्स ग्राहकांना आपल्याशी जोडून घेण्याचा पयत्न करतात. त्यांच्याशी जोडलेली रहातात. त्यामुळे कॉन्सेप्ट स्टोअर सुरू करताना ही बाब नेहमी लक्षात ठेवा.

## कोणत्या व्यक्तिमत्त्वासाठी कोणती जिन्स उपयुक्त?



**स्टाईल स्टेटमेंट**

जीन्स हा एक असा पोशाख आहे, जो आजकाल सर्व वयोगटातील लोकांच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. ऑफिसपासून बाहेरगावी जाईपर्यंत आणि पार्ट्यांपर्यंत, पुरुष तसेच महिलांना जीन्स घालायला आवडते. ते खरेदी करणेदेखील सोपे आहे. फक्त तुमच्या आकारानुसार ऑफलाइन कवा ऑनलाइन जीन्स खरेदी करा.

जीन्सदेखील शरीराच्या प्रकारानुसार येतात. हे ऐकायला विचित्र वाटत असले, तरी हे वास्तव आहे. प्रत्यक्षात, प्रत्येकाचा शरीराचा आकार वेगळा असतो आणि त्यानुसार जीन्स निवडणे महत्त्वाचे आहे. योग्य जीन्स केवळ तुमचे व्यक्तिमत्वच वाढवत नाही, तर तुम्हाला आरामदायीदेखील बनवते.

**※ जीन्स खरेदी करण्याच्या टिप्स**

पीअर शेप बॉडीः ज्या लोकांचे शरीर नाशपातीच्या आकाराचे असते, त्यांचे नितंब जड असतात, कंबर आणि वरचे शरीर पातळ असते. अशा लोकांनी बहुतेकदा सरळ फिट जीन्स, हाय-वेस्ट जीन्स, बूटकट जीन्स घालाव्यात. अशा जीन्स नाशपातीच्या आकाराच्या लोकांवर चांगल्या दिसतात.

**※ ॲपल शेप बॉडीः** ज्या लोकांचे शरीर सफरचंदाच्या आकाराचे असते, पोट जड असते, कंबर पातळ असते अशा लोकांनी मिड-राईज जीन्स, फ्लेर्ड जीन्स, रिलॅक्स फिट जीन्स घ्याव्यात. त्या त्यांना नेहमीच चांगल्या दिसतात. म्हणून पल शेप बॉडी असलेल्या लोकांनी अशा जीन्स खरेदी कराव्यात.

**※ अवरग्लास शेपः** तुमचे शरीरही अवरग्लास शेपचे असेल, शरीर वक्र असेल, कंबर लहान असेल, कंबर आणि छाती संतुलित असेल तर स्किनी जीन्स, हाय-वेस्ट स्ट्रेच जीन्स चांगल्या दिसतात. अशा लोकांनी जीन्स हुशारीने खरेदी करावी, अन्यथा त्यांचा लूक खराब होऊ शकतो. ज्या लोकांचे शरीर आयताकृती असते, त्यांची कंबर आणि छातीचा आकार जवळजवळ समान असतो. अशा लोकांनी नेहमी लो-राईज जीन्स, डिस्ट्रेस्ड जीन्स, बॉयफ्रेंड जीन्स घालावी. या प्रकारच्या जीन्स त्यांचे सौंदर्य वाढवेल.

**※ इनव्हर्टेड ट्रॅंगलः** ज्या लोकांचे शरीर उलटे त्रिकोण असते, त्यांचे वरचे शरीर रुंद असते आणि कंबर सडपातळ असते. अशा लोकांनी नेहमी फ्लेर्ड जीन्स, रुंद पायांची जीन्स, हाय-व्हॉल्यूम जीन्स घालावीत. यामुळे त्यांचे शरीर आणखी सुंदर दिसेल.

# दसरा मेळाव्यानंतर बसणार ठाकरे गटाला मोठा धक्का

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. ९ :
महाराष्ट्रात सध्या आगामी स्थानिक निवडणुकीचे वारे वाहण्यास सुरू झाले आहे. त्यानुसार सर्वच राजकीय पक्षांनी निवडणुकीसाठी रणनीती तसेच पक्ष बांधणी सुरू केली आहे. अनेक नेते, पदाधिकारी तसेच कार्यकर्ते एका पक्षातून दुसऱ्या पक्षात येणे-जाणे देखील सुरू झाले आहे.

यातच शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी दसरा मेळाव्यात मोठा धमाका होणार असल्याची घोषणा केली होती. यावर ठाकरे गटालाच मोठा धक्का बसणार असल्याचे शिवसेना शिंदे गटाचे नेते कृपाल तुमाने यांनी म्हटले आहे.



### शिंदे सेना भाजपमध्ये विलीन होणार?

दरम्यान, कृपाल तुमाने यांनी केलेल्या या वक्तव्यावर संजय राऊत यांनी देखील प्रत्युत्तर दिले आहे. पत्रकारांशी बोलताना संजय राऊत यांना यावर प्रश्न विचारण्यात आला तेव्हा ते म्हणाले, ज्यांचा स्वतःचा पक्ष भाजपमध्ये विलीन व्हायला निघाला आणि ते दुसऱ्यांचे आमदार विलीन व्हायच्या गोष्टी करत आहेत. आताची जी शिवसेना आहे, ही निष्ठावंतांचा आहे. जे लोक पक्ष सोडून गेले त्यांनी बाळासाहेब ठाकरेंचा शिवसेनेचा अपमान केला आहे. भविष्यात शिंदे सेना भाजपमध्ये विलीन होणार, असे संजय राऊत म्हणाले.

ठाकरे गट राहिला आहे आता त्या ठाकरे गटाला आम्ही दसरा मेळाव्यानंतर एक मोठा दणका देणार आहोत. त्यानंतर त्यांना कळेल की त्यांचा पक्ष या राज्यातून नेस्तनाबूत झाला आहे, असे तुमाने यांनी म्हटले आहे.

**माजी नगरसेवक हे आमच्याकडे**

पुढे बोलताना कृपाल तुमाने म्हणाले, आमच्या संपर्कात त्यांचे दोन आमदार सोडले तर सर्वच आमदार आहेत. मुंबईतील ६० टक्के माजी नगरसेवक हे आमच्याकडे आलेले आहेत. त्यातील जे काही उर्वरित आहेत ते देखील आमच्या संपर्कात आहेत, तेही येण्यासाठी इच्छुक आहेत. आम्ही फक्त मुहुर्त काढणे बाकी आहे. आम्ही मुहुर्त काढला की त्या दिवशी ते आमच्याकडे येतील,

तुमाने म्हणाले, संजय राऊतांना सकाळी भोंगा वाजवण्याची सवय आहे. त्यांना काहीतरी बोलायचे असते म्हणून ते बोलतात. पण आम्ही लवकरच धमाका करणार आहोत. आता जी काही उरलेला सुरलेला तेव्हा संजय राऊतांना दणका मिळेल. महानगर पालिका निवडणुकांमध्ये शिवसेना शिंदे गट आणि भाजप युती जोरदार कामगिरी करेल, असा विश्वास देखील तुमाने यांनी व्यक्त केला आहे.

## श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रमातून ७.४ लाख नागरिकांची
# मोफत आरोग्य तपासणी

## १६,७९८ नागरिकांनी केले रक्तदान

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या श्रीगणेशा आरोग्याचा या विशेष उपक्रमाला राज्यभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे लाखो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला.

राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर दरम्यान १२,६५५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले. या शिबिरांतून ७ लाख ४०७३ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या १८,८०० रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता पाठविण्यात आले. नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून सामाजिक जबाबदारी पार पाडत २३६ शिबिरांतून १६,७९८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.



या अभियानात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धमार्दाय रुग्णालय मदत कक्ष, महात्मा फुले जन आरोग्य योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, जिल्हा रुग्णालये तसेच धमार्दाय रुग्णालयांशी संलग्न तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. राज्यभरातील गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करीत उपक्रमास हातभार लावला.

अभियानात १२,६५५ आरोग्य शिबिरे घेण्यात आली, त्यात ३,१३,५०८ पुरूष आणि ३,०५,०३४ महिला अशा ७ लाख ४,०७३ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. ८५,५०८ लहान बालकांनीही लाभ घेतला. २३६ रक्तदान शिबिरातून १६,७९८ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सर्वाधिक २५२५ शिबिरे पुणे जिल्ह्यात झालीत, त्यात १,६५,७१८ इतकी सर्वाधिक रुग्ण तपासणी केली गेली . सर्वाधिक रक्तसंकलन कोल्हापूर जिल्ह्यात (४,५०४) झाले . आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अभिनव कल्पना प्रत्यक्ष उतरविण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या १८,८०० रुग्णांना पुढील मोफत उपचार दिले जाणार असल्याचे मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धमार्दय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी सांगितले.

## बंडू आंदेकरसह सहा जणांना अटक

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. ९ :
गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला पुण्यात एका टोळीच्या संघर्षात मोठी घटना घडली. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या हत्येचा बदला घेण्यासाठी आंदेकर टोळीने त्यांचा मुलगा आयुष कोमकरवर गोळ्या झाडून त्याची हत्या केली. या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने कठोर कारवाई सुरू केली आहे.

या प्रकरणी पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकरसह सहा जणांना अटक केली आहे. हे सर्व जण बुलढाण्याला पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. अटक केलेल्यांमध्ये बंडू आंदेकरची मुलगी आणि दोन नातवांचाही समावेश आहे, अशी माहिती समोर आली आहे.

## सोलरच्या मालकावर गुन्हे दाखल करा..

जिल्हाधिकाऱ्यांना प्रहारचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
बाजारगाव येथील सोलार इंडस्ट्री लिमिटेड मध्ये ४ सप्टेंबरला झालेल्या भिषण स्फोटात दोन जणांचा मृत्यू झाला. आता सात दिवसांत कंपनीचे मालक आणि व्यवस्थापनावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला नाही तर आंदोलनासाठी रस्त्यावर उतरू अशा इशारा प्रहार संघटनेने जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांची भेट घेऊन दिला.

जिल्हा पोलीस अधिक्षक हर्ष पोद्दार यांचीही संघटना पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली.

बाजारगावातल्या सोलर कंपनीत आजवर ९ स्फोट झाले. त्यापैकी केवळ ३ चव्हाट्यावर आले. किरकोळ स्फोट दडवले जातात. कंपनीने सामाजिक उत्तरदायित्व निधीतून स्थानिक पोलीस प्रशासनाला दबावाखाली ठेवले आहे. वारंवार होणाऱ्या स्फोटात माणसे जीवानिशी जात असताना कंपनी मालक आणि व्यवस्थापन नैतिक दृष्ट्या जबाबदारी घ्यायला तयार नाही. कंपनीत वारंवार अशा घटना घडत असताना सरकार जर यावरून कंपनी मालकाला जाब विचारत नसेल तर हे गंभीर आहे, असे प्रहारचे प्रमुख तथा माजी आमदार बच्चू कडू म्हणाले.

## मंत्रालयात बनावट मुलाखती घेऊन
# तरूणांची लाखोंनी फसवणूक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :
चक्क मुंबईच्या मंत्रालयात बनावट आयकार्डच्या आधारे प्रवेश मिळवत मुलाखती घेऊन काही तरुणांना फसवल्याचा अनोखा प्रकार समोर आला आहे. मंत्रालयात कनिष्ठ लिपिक पदाची नोकरी लावून देण्यासाठी सात आरोपींनी मंत्रालयात मुलाखत घेऊन ९ लाख ५५ हजार रुपये घेऊन फसवणूक केली. यातील एका आरोपीला अटक करण्यात आली, तर तीन अद्याप फरार आहेत. दोषींना त्वरित अटक करून न्याय देण्याची मागणी राहुल तायडे यांनी पत्रकार परिषदेत केली.

लॉरेन्स हेनरी (४५, रा. अष्टविनायक लॉनजवळ, म्हाळगीनगर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तर शिल्पा उदापुरे (४०, रा. अष्टविनायक लॉनजवळ, म्हाळगीनगर), वसंतकुमार ऊर्फ वसंतराव उदापुरे (६०, रा. पंचतारा हाऊसिंग सोसायटी, नरेंद्रनगर) आणि विजय पाटनकर (४०), नितीन साठे (४१), सचिन डोळस (४५) आणि बाबर नावाचा शिपाई (५५) अशी फरार आरोपींची नावे आहेत.

राहुल तायडे (रा. सुगतनगर नारी रोड, जरीपटका) हे नोकरीच्या शोधात होते. त्यांच्या मित्रासोबत आरोपी लॉरेन्स हेनरी त्यांच्या घरी आला. त्याने मंत्रालयात कनिष्ठ लिपिकाची नोकरी लावून देतो, अशी बतावणी करून वेळोवेळी तायडे यांच्याकडून ९ लाख ५५ हजार रुपये घेतले. त्याने तायडे यांची मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय तपासणीदेखील केली.

त्यानंतर मुंबईच्या मंत्रालयात आरोपी शिल्पा उदापुरेच्या नावाची पाटी लावलेल्या कॅबिनमध्ये तायडे यांची मुलाखतदेखील आरोपींनी घेतली. परंतु, आरोपींनी २०१९ मध्ये पैसे घेऊनही जॉइनिंग लेटर न दिल्यामुळे हा प्रकार समोर आला. तगादा लावून आयकार्डसुद्धा दिले.

हे आयकार्ड दाखविल्यानंतर मंत्रालयात सहज प्रवेश मिळत होता. परंतु, अनेक दिवस होऊनही आरोपींनी नोकरीवर रुजू करून न घेतल्यामुळे तायडे यांनी हुडकेश्वर ठाण्यात तक्रार दिल्यानंतर यातील आरोपी हेनरीला मागील आठवड्यात मुंबईतून अटक करण्यात आली. फसवणुकीतील सहा आरोपी अद्याप फरार असून, त्यांना अटक करून आपणास न्याय देण्याची मागणी तायडे यांनी पत्रकार परिषदेत केली.

**अधिकाऱ्यांचे लागेबांधे?**

मंत्रालयात आरोपींनी आपल्या नावाची पाटी लावून तेथे मुलाखत घेतल्याचे चंद्रपूरमध्ये झालेल्या पोलिस तक्रारीतून सिद्ध झाले आहे. यामुळे यात मंत्रालयातील बड़े अधिकारीदेखील सामील असल्याची दाट शक्यता आहे. नागपुरातदेखील मंत्रालयातील काम करून देतो, अशी बतावणी करीत पैसे घेऊन मुंबईच्या चकरा मारणाऱ्या दलालांची संख्या वाढली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी केल्यास मोठे रॅकेट उजेडात येण्याची शक्यता आहे.

**शेकडोंच्या फसवणुकीची शक्यता**

आरोपींनी महाराष्ट्रात २०० च्या वर बेरोजगारांची फसवणूक केल्याची शक्यता तायडे यांनी पत्रकार परिषदेत वर्तविली. यातील फसवणूक झालेल्या चार जणांनी आतापर्यंत हुडकेश्वर, चंद्रपूर आणि वर्धा येथील पोलिस ठाण्यात तक्रारी केल्या असून, हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

## हे असेच का तुमचे स्टील हब?

संतप्त नागरिकांचा पालकमंत्र्यांना सवाल

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ९ :
गडचिरोलीतील राष्ट्रीय महामार्ग आणि अंतर्गत रस्त्यांची झालेल्या बिकट अवस्थेमुळे गडचिरोली जिल्ह्यातील बाराही तालुक्यात प्रशासनाविरोधात प्रचंड असंतोष आहे.

त्रस्त नागरिकांनी समाज माध्यमावर मुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांना हेच का तुमचे ह्यस्टील हब, असा संतप्त सवाल केला आहे. सोबतच दररोज खड्डेमुक्त रस्त्यांसाठी राजकीय पक्षांकडून आंदोलन सुरु आहे. मागील ५ वर्षापासून हीच परिस्थिती असल्याने यावर लवकर मार्ग न काढल्यास याविरोधात मोठे जनआंदोलन उभे राहण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील आष्टी ते सिरोंचा राष्ट्रीय महामार्गाचे गेल्या सहा वर्षांपासून काम रखडले आहे. त्यामुळे या मार्गावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहन चालविणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत गंभीर आजारी रुग्णांना जिल्हा मुख्यालयी नेण्यासाठी जोखीम पत्करावी लागत आहे. सर्वसामान्य प्रवाशांना दररोज नरकयातना सोसण्याशिवाय पार्याय नाही. अंतर्गत रस्त्यांची तर अक्षरशः चाळण झाली आहे. अहेरी शहरातून जाणाऱ्या रस्त्याची तर अत्यंत बिकट अवस्था आहे.

भामरागड तालुक्यात तर अनेक गावांना जोडणाऱ्या वाटेत असलेल्या नाल्यावर पूल नसल्याने आजारी रुग्णांना व नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. सिरोंचा, एटापल्ली आणि मुलचेरा तालुक्यात तर अधिकच विदारक पारिस्थिती आहे. सुरजागड लोहखानीच्या जवळून जाणारा गट्टा मार्गावरून तर पायदळ चालणे कठीण झाले आहे. कम्युनिस्ट पक्षाकडून वारंवार आंदोलनानंतरही परिस्थिती जैसे थे आहे. अन्य मार्गावर मोठमोठे खड्डे पडले असून, नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.



: मुलखावेगळी माणसं :

## खाण्याचा नवा जागतिक विक्रम

लोकमानस

जगात खाण्या-पिण्याऱ्या लोकांची कमी नाही. अनेक लोक असे आहेत जे त्यांच्या खान-पानामुळेच वर्ल्ड रेकॉर्ड कायम करतात. तुम्ही अनेक प्रकारचे रेकॉर्ड ऐकले असतील, जसे की सर्वात उंच इमारत बांधणे, मोठी रोटी बनवणे, एखाद्या मोठ्या भाज्याची शेती करणे, लांब नदी पार करणे किंवा सर्वात वेगाने धावणे.

पण तुम्हाला कधी सर्वात जास्त रोटी खाण्याचा रेकॉर्ड बद्दल ऐकायला मिळाले आहे का, जो तुम्हाला आश्चर्यचकित करेल? होय, बिहारमधील कटिहार येथील राहणाऱ्या एका व्यक्तीबद्दल आहे ही गोष्ट. जर तुम्ही त्याच्या खाण्याच्या सवयींबद्दल ऐकले तर नक्कीच थक्क व्हाल.



हा व्यक्ती इतकी रोटी खातो की त्याच्यामुळे दोन-तीन कुटुंबांचे भुके भागतील इतकी रोटी तो एकटाच खाण्याचा विक्रम साधतो. चला तर मग जाणून घेऊया तो व्यक्ती कोण आहे आणि तो एवढे अन्न कसे खातो.

बिहारमधील कटिहार जिल्ह्यातील मोहम्मद रफिक अदनान त्याच्या असाधारण आहारामुळे चर्चेत आहे. रफिक फक्त ३० वर्षांचा आहे आणि तो दिवसाला ३ किलो भात, ४ लिटर दूध, ८० ते १०० रोट्या खातो, एवढेच नाही तर २ किलो मटण किंवा चिकन आणि १.५ ते २ किलो मासे खातो. इतक्या जास्त आहारामुळे त्याचे वजन सुमारे २०० किलो आहे. तुम्हाला सांगतो की त्याचे वजन त्याच्या खाण्याच्या विकारामुळे आहे. तो त्याच्या लठ्ठपणा आणि खाण्याच्या सवयीमुळे कटिहारमध्ये प्रसिद्ध आहे.

रफिकला बुलिमिया नर्वोसा नावाच्या खाण्याच्या विकाराने ग्रासले आहे. त्यामुळे तो जास्त खातो. यामुळे त्याला सामाजिक आणि शारीरिक समस्यांना तोंड द्यावे लागते जसे की लोक त्याला पार्टीला आमंत्रित करण्यास कचरतात आणि त्याच्या लठ्ठपणामुळे त्याच्यासाठी आरोग्य समस्या निर्माण होत आहेत.

त्याच्या जास्त वजनामुळे, रफिकला जास्त चालता येत नाही. त्याच्या वजनामुळे, त्याने एक जड बुलेट खरेदी केली पण ती देखील त्याचे वजन सांभाळू शकत नाही. रफिकने त्याच्या आजाराबद्दल डॉक्टरांशी संपर्क साधला तरी, सर्व काही निष्फळ ठरले.रफिकचे वजन त्याच्यासाठी त्रासाचे कारण बनले आहे.

रफिकचे दोनदा लग्न झाले आहे. कुटुंबाचे म्हणणे आहे की त्याची पहिली पत्नी त्याची भूक भागवू शकली नाही, म्हणून त्याने दुसरे लग्न केले. व्यवसायाने धान्य व्यापारी असलेल्या रफिकला या आजारामुळे मुले नाहीत. त्याच्या आजूबाजूचे लोक आणि नातेवाईकही त्याला घरी बोलावण्यास घाबरतात. एकूणच रफिक्सारखा खादाडभाऊ हा आपल्या याच खाण्याच्या सवयीमुळे आज जागतिक स्तरावरचा खादाडी म्हणून ओळखला जात आहे खरोखरच या मुलखां वेगळ्या रफिकची हि सवय दखलपत्रच ठरते नाही का?

■ ■ ■

## सुझुकी मोटरसायकलच्या विक्रीत ९% वाढ




सुझुकी मोटर कॉर्पोरेशन, जपानची दुचाकी उपकंपनी असलेल्या सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एसएमआयपीएल) ने ऑगस्ट २०२५ साठीच्या विक्री कामगिरीची घोषणा केली.

कंपनीने ऑगस्ट २०२५ मध्ये एकूण १,१३,९३६ युनिट्सची विक्री नोंदवली, जी ऑगस्ट २०२४ मध्ये विकल्या गेलेल्या १,०४,८०० युनिट्सपेक्षा ९% जास्त आहे. यामध्ये ९१,६२९ युनिट्सची देशांतर्गत विक्री समाविष्ट आहे, जी गेल्या वर्षी याच कालावधीत नोंदवलेल्या ८७,४८० युनिट्सपेक्षा ५% जास्त आहे. दरम्यान, निर्यातीत २९% वाढ झाली, ऑगस्ट २०२४ मध्ये १७,३२० युनिट्सच्या तुलनेत २२,३०७ युनिट्सची निर्यात झाली.

या कामगिरीवर भाष्य करताना, सुझुकी मोटरसायकल इंडिया प्रायव्हेट लिमिटेडचे विक्री आणि विपणन उपाध्यक्ष दीपक मुत्रेजा म्हणाले, सुझुकी दुचाकींवर सतत विश्वास ठेवल्याबद्दल आम्ही आमच्या ग्राहकांचे मनापासून आभार मानतो. ऑगस्ट विक्रीतील वाढ आम्हाला सणासुदीच्या हंगामात गती देते आणि आम्ही आमच्या उत्पादनांनी आणि सेवांनी अधिक ग्राहकांना आनंदित करण्यास उत्सुक आहोत.

दुचाकी विक्रीसह विक्रीनंतरच्या ऑपरेशन्सला बळकटी देत, सुझुकी मोटरसायकल इंडियाने ऑगस्ट २०२५ मध्ये आतापर्यंतची सर्वाधिक सुटे भाग विक्री गाठली, जी ८५६ दशलक्ष रुपये किमतीची होती, जी वर्षभरात २१% वाढ दर्शवते.

■ ■ ■

: माझं मत :

## प्रसार भारतीचे भवितव्य धोक्यात आहे का?

■ रविंद्र गद्रे, बँक अधिकारी

बहुजन हिताय बहुजन सुखाय असे ब्रीद घेऊन जन्मास आलेली आकाशवाणी आणि सत्यम शिवम सुंदरम ब्रीद असलेले दूरदर्शन हि एकेकाळची गाजलेली माध्यम अर्थात प्रसार भारती च्या या श्राव्य आणि दृकश्राव्य माध्यमाची सध्याची अवस्था हि अत्यंत मरणासन्न अशी आहे.

आकाशवाणी मुंबई केंद्राने यगोदरच्या असंख्य पिढ्या आपल्या उत्तमोत्तम कार्यक्रमामुळे घडविल्या आणि त्याच वेळी मुंबई दूरदर्शनने देखील प्रेक्षकांना एकापेक्षा एक प्रबोधनात्मक आणि मनोरंजक कार्यक्रमाची मोट बांधत अविस्मरणीय अशा कार्यक्रमांची भेट दिलेली आहे. मात्र सध्या केंद्र सरकारने नवीन निमार्ता मंडळी पासून तांत्रिक पदापर्यंतची मागील अनेक वर्षांपासून न केलेल्या भरतीमुळे प्रसार भारती आता शेवटचे श्वास मोजते आहे हे नक्की.

■ मीनल वनमाळी, दूरदर्शन प्रेक्षक

जसजसा काळ बदलतो त्याप्रमाणे सर्वच क्षेत्रात बदल हा अपरिहार्यच असतो. एकेकाळी आकाशवाणी सारखं श्राव्य माध्यम आणि दुर्दर्शनसारखं दृकश्राव्य माध्यम म्हणजे रसिकांसाठी नवलाई आणि विविधरंगी कार्यक्रमांची एक पर्वणी असलेली लोकप्रिय माध्यम होती. परंतु आता असांख्य प्रमाणात खाजगी वाहिन्यांच पेव फुटलं आणि प्रेक्षकांना कार्यक्रम मनाप्रमाणे पाहण्याचे मुक्त स्वातंत्र्यच मिळाले. अर्थात याला जबाबदार दूरदर्शनचे निमार्ता मंडळी देखील आहेत.

बदलत्या काळानुसार नवोन्मेषी कार्यक्रमांची निमिर्ती करण्यापेक्षा अनेक सरकारी नोकरांना केवळ पारंपरिक पद्धतीने पाट्या टाकण्यात आनंद मिळतो म्हणूनच कार्यक्रमांचं मार्केटिंग आणि त्याअनुषंगाने महसूल याची वानवा असते मग सरकारने तरी लोकहिताच्या नावाखाली हा पांढरा हत्ती किती दिवस पोसायचा बर हाही तात्विक प्रश्न आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## ठाकरे गटाला हायकोर्टाचा धक्का

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ९ :
मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी ठाणे लोकसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवार राजन विचारे यांची याचिका फेटाळून लावत सत्ताधारी शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या खासदारकीवर शिक्कामोर्तब केले. यामुळे म्हस्के यांच्या खासदारकीला आव्हान देणाऱ्या ठाकरे गटाला जबर झटका बसला आहे.

ठाणे लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के व ठाकरे गटाचे उमेदवार राजन विचारे यांच्यात अतितटीची लढत झाली होती. त्यात म्हस्के यांना ७ लाख ३४ हजार २३१ मते, तर विचारे याना ५ लाख १७ हजार २२० मते मिळाली होती. त्यानंतर विचारे यांनी एका याचिकेद्वारे म्हस्के यांच्या विजयाला आव्हान दिले होते.

नरेश म्हस्के यांची ठाणे लोकसभा मतदार संघातून खासदार म्हणून झालेली निवड रद्दबातल करून त्यांच्या जागी आपली खासदार म्हणून निवड करावी, अशी मागणी त्यांनी कोर्टाकडे केली होती. यासंबंधीचे काही दस्तऐवजही त्यांनी कोर्टात दाखल केले होते.

हायकोर्टाने त्यांच्या याचिकेवर प्रदिर्घ सुनावणी करून आपला निर्णय राखून ठेवला होता. अखेर न्यायमूर्ती रियाझ छागला यांच्या एकलपीठाने मंगळवारी आपला निर्णय देत विचारे यांची याचिका धुडकावून लावली.

राजन विचारे यांनी आपल्या याचिकेत म्हस्के यांनी आपल्या उमेदवारी अर्जात आपल्याला कोणत्याही प्रकरणात दोषी ठरवण्यात आले नसल्याचा दावा केला होता. प्रत्यक्षात दंगलीच्या प्रकरणात त्यांना दोषी ठरवण्यात आले होते, असा दावा केला होता.

## टेबलाखालून लाच : अभियंता निलंबित

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ९ :
जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता विवेक फेढे यांचा एक धक्कादायक व्हिडिओ आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार यांनी समाज माध्यमावर सार्वत्रिक केला आहे.

या व्हिडिओत अभियंता फेंढे कंत्राटदाराकडून २० हजार रुपयाचे पॉकिट टेबलाचे आडून घेत असल्याचे त्यात स्पष्टपणे दिसत आहे. दरम्यान हा व्हीडीओ समाज माध्यमात सार्वत्रिक होताच सीईओ पुलकीतसिंग यांनी अभियंता फेंढे यांच्यावर निलंबनाची कारवाई केली.

या व्हिडिओमध्ये फेंढे हे स्वतःच्या कार्यालयातील टेबलाच्या ड्रॉवरमध्ये २० हजार रुपये स्वीकारताना स्पष्टपणे दिसत आहेत एवढेच नाही, तर पैसे स्वीकारल्यानंतर ते समोरील व्यक्तीला विचारतात किती आहे? यावर समोरील व्यक्ती सांगतो २० आहे. यानंतर फेंढे उर्वरित पैशांची मागणी करतात. त्यावर समोरील व्यक्ती लवकरच उर्वरित पैसे आणतो असे आश्वासन देताना ऐकू येतो.

विवेक फेंढे यांना काही महिन्यांपूर्वीच भ्रष्टाचाराच्या गंभीर आरोपांमुळे निलंबित करण्यात आले होते. परंतु स्थानिक सत्ताधारी आमदाराच्या राजकीय आशीर्वादामुळे ते पुन्हा सेवेत रुजू झाले असा आरोप आम आदमी पक्षाने केला.

दरम्यान आता या व्हीडीओ नंतर अभियंता फेंढें यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई केल्याने अधिकाऱ्यांच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी विवेक फेंढे यांच्यावर गुन्हा दाखल करून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (एसीबी) चौकशी सुरू करावी अशी मागणी आपच्यावतिने करण्यात आली आहे.

# अमरावतीची हवा सर्वात स्वच्छ : देशात पहिला क्रमांक

■ महासागर प्रतिनिधी अमरावती, दि. ९ :
स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२५ या स्पर्धेत ३ ते १० लाख लोकसंख्येच्या गटात अमरावती शहराने २०० पैकी २०० गुण मिळवून देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्री भुपेंद्र यादव यांच्या हस्ते मंगळवारी नवी दिल्ली येथील गंगा ऑडिटोरियम, इंदिरा पर्यावरण भवन येथे पार पडलेल्या समारंभात अमरावती महापालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांनी हा पुरस्कार स्वीकारला. ७५ लाख रुपये आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



स्वच्छ वायू सर्वेक्षणांतर्गत हवा शुद्ध ठेवण्यासाठी उत्कृष्ट प्रयत्न करणाऱ्या शहरांमध्ये केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने गोळा केलेल्या आकडेवारीनुसार केंद्र सरकारच्या पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन मंत्रालयाने हे पुरस्कार जाहीर केले होते पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या या सर्वेक्षणामध्ये वायू गुणवत्ता, नागरिकांचा सहभाग, शाश्वत उपाययोजना आणि प्रशासनाची भूमिका अशा विविध निकषांवर आधारित मूल्यांकन करण्यात येते.

शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी वृक्षारोपण, रस्ते धूळमुक्त ठेवण्याचे उपक्रम, वाहतुकीसाठी पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर आणि औद्योगिक भागात प्रदूषण नियंत्रणासाठी विशेष उपाययोजना यातून हे यश साध्य झाले आहे.

स्वच्छ वायु सर्वेक्षण २०२५ मध्ये अमरावतीने देशात पहिले पारितोषिक पटकावणे, ही संपूर्ण शहरासाठी गौरवाची बाब आहे. ही केवळ महानगरपालिकेची नाही, तर अमरावतीतील प्रत्येक नागरिकाची एक सामूहिक उपलब्धी आहे. या यशामध्ये स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांचा, अभियंत्यांचा, पर्यावरण तज्ज्ञांचा, आणि सर्वसामान्य नागरिकांचा मोलाचा वाटा आहे.

आपल्या शहराच्या वायू गुणवत्ता सुधारण्यासाठी आम्ही राबवलेले विविध उपक्रम आपल्या सर्वांसमोर आहेत. हे पारितोषिक आम्हाला अधिक प्रेरणा देणारे असून, भविष्यातील पर्यावरणपूरक धोरणे अधिक बळकटपणे राबवण्याचा आमचा संकल्प आहे. अमरावतीला देशातील एक हरित आणि स्वच्छ शहर म्हणून ओळख मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी प्रतिक्रिया महापालिका आयुक्त सौम्या शर्मा-चांडक यांनी दिली.

यापुर्वी स्वच्छ वायू सर्वेक्षण २०२४ मध्ये अमरावती शहराने देशातून दुसरा क्रमांक पटकावला होता. २०२३ मध्ये अमरावती शहर तिसऱ्या स्थानी होते. यंदा अमरावतीने थेट अव्वल क्रमांकावर झेप घेतली. या उल्लेखनीय यशाबद्दल संपूर्ण अमरावती चमूचे अभिनंदन करण्यात येत आहे. पर्यावरण मंत्रालयाद्वारे महापालिकांना स्वयं मुल्यांकन अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले होते. त्यानंतर केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने तपासणी केली. त्यांनी पाठविलेल्या निष्कर्षांच्या आधारे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ बुधवार, दि. १०, सप्टेंबर २०२५ ■

## भोपाळ येथून सुटलेली लव्ह एक्स्प्रेस नागपुरात डीरेल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

भोपाळ येथील १४ वर्षीय मुलगी अचानक मध्यरात्रीला घरून बेपत्ता झाली. कुटुंबीयांनी तिचा शोध घेतला, मात्र ती मिळाली नाही. भोपाळ पोलिसात अपहरणाचा गुन्हा नोंदविण्यात आला. दरम्यान ती मुलगी एका अल्पवयीन मुलासोबत नागपुरात असल्याची माहिती मिळाली. स्थानिक पोलिसांनी एटीएसला मदत मागितली. एटीएसने नागपूर जीआरपीसह संपूर्ण रेल्वे स्थानकावर शोध मोहीम राबवून दोघांनाही ताब्यात घेतले.

अपहृत बालिका रेशमा (बदललेले नाव) ही आठव्या वर्गात शिकते. परिसरातच राहणाऱ्या १७ वर्षीय राहुल (बदललेले नाव) याच्यासोबत तिची मैत्री होती. दोघांनीही घरून पलायन करण्याचा निर्णय घेतला. शनिवारी रात्री रेशमाने आईच्या मोबाईलमध्ये असलेले दोन्ही सीमकार्ड काढून घरी ठेवले आणि मोबाईल घेऊन निघून गेली. पहाटे ४.३० वाजताच्या सुमारास आईची झोप उघडली असता रेशमा गायब होती. शक्य त्या ठिकाणी तिचा शोध घेण्यात आला, मात्र ती कुठेही मिळाली नाही. त्यानंतर भोपाळच्या अशोक विहार ठाण्यात अपहरणाचा गुन्हा नोंदविण्यात आला. पोलिस तपासात रेशमाची राहुलशी मैत्री असल्याचे पुढे आले. तो सुद्धा घरून बेपत्ता होता. त्याच्या मोबाईलचे लोकेशन काढले असता नागपूर रेल्वे स्थानक परिसरात असल्याची माहिती मिळाली. स्थानिक अधिकाऱ्याने एटीएसला याबाबत माहिती दिली. एटीएसने नागपूर जीआरपीच्या अधिकाऱ्यांना सूचना दिली. संयुक्त पथक बनवून संपूर्ण रेल्वे स्थानक परिसरात दोघांचाही शोध घेण्यात आला. दोघेही रामझुल्याखाली दिसले. त्यांना ताब्यात घेऊन भोपाळ पोलिसांना माहिती देण्यात आली.

# प्रारूप प्रभाग रचनेच्या हरकतींवर सुनावणी पूर्ण

## सर्व हरकतींवर प्राधिकृत अधिकारी श्रावण हर्डीकर यांचे समक्ष सुनावणी




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी तयार करण्यात आलेल्या प्रारुप प्रभाग रचनेवर मगाविण्यात आलेल्या हरकती व सूचनांवर मंगळवारी (ता.९) महानगरपालिकेच्या मुख्यालयातील आयुक्त कार्यालयातील सभाकक्षात सुनावणी पूर्ण झाली. राज्याच्या नगरविकास विभागाने या सुनावणीसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्त केलेले महाराष्ट्र महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या समक्ष व नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त व प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या प्रमुख उपस्थितीत ही सुनावणी पूर्ण झाली. यावेळी हद्द बदल बाबत ६०, मतदार यादी व विधानसभा निहाय प्रभाग रचना करण्याबाबत १६, व्याप्तीतील नावाबाबत २५, तर आरक्षणाबाबत ७ आक्षेप प्राप्त झाले होते.

महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रारुप प्रभाग रचना गेल्या २३ ऑगस्टला प्रसिद्ध करण्यात आली होती. यावर गेल्या ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. एकूण ११५ आक्षेपकर्ते यांनी हरकती व सूचना दिल्या होत्या. सुनावणी दरम्यान यातील १५ आक्षेपकर्ते अनुपस्थित होते. यावेळी महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी, उपायुक्त विजया बनकर, उपायुक्त मिलिंद मेश्राम, नगर रचना विभागाचे उप संचालक गिरीश गोडबोले, ऋतुराज जाधव, कार्यकारी अभियंता सुनील उईके, रितेश लोखंडे आदी उपस्थित होते.

सुनावणीपूर्वी मनपा डॉ, अभिजीत चौधरी व वैष्णवी बी. यांनी श्रावण हर्डीकर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या हरकती व सूचनांचे चार गटामध्ये वर्गीकरण करण्यात आले होते. यात प्रभागांच्या हद्दीबाबत आक्षेप, मतदार यादी व विधानसभा निहाय प्रभागरचना करण्याबाबत आक्षेप, व्याप्तीतील नावाबाबत हरकती व आरक्षणाबाबत हरकतींचा समावेश होता. यावेळी हरकत घेणाऱ्यांचे आक्षेप सविस्तरपणे नोंदविण्यात आले. सकाळी ११ वाजता सुनावणीला सुरूवात झाली आणि सायंकाळी ६.३० वाजता सुनावणी प्रक्रिया शांततेत पूर्ण झाली.

संपूर्ण सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मनपाचे सहायक आयुक्त श्याम कापसे, सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक राजकुमार मेश्राम, निवडणूक विभागाने अनंत नागमोते,आनंद वराडपांडे, सागर पवार,मकरंद सातपुते, किशोर मोगलेवार, जीवराज काळे यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

भावना संतोष लोणारे (२), अॅड. आकाश लालवानी (९), दीपक अरोरा (९), तुषार उर्फ सुबोध छाया मिलिंद साखरे (७), रविंद्र जनबंधू (६ व ७), कल्पना राजा द्रोणकर (७), दीपक रामदास खोब्रागडे (७), चेतन तरारे (७), शेखर पाटील (२), असलम खान मुल्ला (६), विद्यासागर त्रिपाठी (४), मोहन ठाकरे (४), आसिफ शेख (७), वामन पारवे व हेमंत नंदनवार (२०), रिजवान अंसारी (८ व १९), अंकित अशोक नायक (१९), मोहम्मद वकील शाहीद (८), जावेद अख्तर शमीम अख्तर (८), अनुपकुमार शिवदासजी कठाणे (१९), राशिद शेख ईस्त्राईल शेख (१९), शमीम भाहा (८), दीनानाथ खरबीकर (८ व १९), नवजीत सतीश सोनी (८), निशाद इंदुरकर (९), जितू नारनवरे (११), श्री. राजेश परतेकी (१३ व १४), सत्यम सोडगीर (१४ व १५), गजानन चकोले (३६ व १६), हितेश मुंदाफळे (३२), महेश बोरीकर (१७),अनिता संजय तिडके (३१), धीरज चव्हाण (१८), कृष्णाभाऊ एनप्रेडीवार (३७), किशोर पलांदूरकर (२० व २१), सुनील पडोळे (२२ व २७), उमाकांत महाजन बावनकर (२१), अनिल राजगिरे (२१ व ५), चंद्रशेखर पौनीकर (२२), दुनेश्वर पेठे (२३), अभिजीत वंजारी (२३,२६, २७ व २९), महेश ठाकरे (२३), जितेंद्र (बंटी) कुकडे (२६), प्रशांत ढोले सागर लाडेकर, नरेश शाहू, धनराज वडीचार, भावेश कुहीकर, (सर्व प्रभाग क्रमांक २६),. विजय झलके (२८), प्रवीण बेलेकर (२६), प्रतीक बावनकर (२७), हेमंत पाडे (२६), राजेश अंबुलकर (२६), अविनाश कुंभलकर (१८ व २७), दीपक खोब्रागडे (६), नितीन वासनिक (९), प्रदीप सूर्यवंशी (१०), प्रमोद ठाकूर, प्रमोद सिंग ठाकूर (सर्व प्रभाग क्र. १०), इरफान काजी (१९), पारेंद्र पटले (३८), प्रकाश भोयर (३८), सिंधु रामाजी उईके (५), मंगेश सातपुते (५), निलेश बोरकर, कृष्णा खोपडे, सचिन माथाळे,(४), राजू कोटांगले (१), भावना संतोष लोणारे (२), राजेश नंदेश्वर (१), सतीश पाली (२), मंगेश सातपुते (२०), रामाजी उईके (५) , घनश्याम निखारे (५), मंसूर खान (३), मोहम्मद इरशाद गुलाम कादर शेख (६), सुधाकर लांजेवार (३), योगेश आमगे (३), संजय चावरे (५), जनहित मंच एज्युकेश अँड सोशल वेल्फेयर सोसायटी (६), अनिकेत येरखेडे (२), दिलीप गौर (२), अँड. मॅक्स बोधी (६), मोहम्मद इब्राहिम (६), वामन लांजेवार (५), नेताजी गजभिये (५), सुनील दांडेकर (३६),उत्तम शेवडे (३३),. चंद्रकांत धांडे (३१), ज्ञानेश्वर ठाकरे (२१), अविनाश ठाकरे (३५), राजेंद्र सोनकुसरे, योगेश लांजेवार, राजेश्वर सिंह (१२), अभिजीत झा (१२), रिझवान रुमवी (१२), युगलकिशोर विदावत (१२) व तीर्थराज नेताम (१२ व १४).

## भरधाव ट्रकने युवकाला चिरडले

नागपूर : एका ट्रकच्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून मोटारसायकलस्वाराला जबर धडक दिली. यात ट्रकखाली येऊन गंभीर जखमी मोटारसायकलस्वाराचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना मानेवाडा रिंगरोडवर घडली. अरुण कोंडबा गायकवाड (६५) रा. महाकालीनगर, बेसा असे मृताचे नाव आहे. विशेष म्हणजे गत काही महिन्यांपासून मानेवाडा रिंगरोडवर वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा आहे. अशात जड वाहनांच्या रहदारीने प्रत्येक क्षणी अपघाताचा धोका कायम असतो. अजनी वाहतूक झोन येथे व्यवस्था कायम ठेवण्यात पूर्णतः अपयशी ठरत आहे. शनिवारी दुपारी १२.४५ वाजताच्या सुमारास अरुण हे त्यांच्या एमएच-४९/एडी-७५६९ क्रमांकाच्या मोटारसायकलने घरी जात होते. तपस्या चौकातून मानेवाडा चौकाकडे जाताना सिंधू अपार्टमेंटसमोर ट्रक क्र. एमएच-४०/बीजी-८४०३ क्रमांकाच्या चालकाने त्यांच्या मोटारसायकलला मागून जबर धडक दिली.

## काँग्रेसचे आमदार अभिजित वंजारी यांची चंद्रपूर शहर व जिल्हा प्रभारीपदी नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :



महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष व विधान परिषदेचे आमदार अभिजित वंजारी यांची चंद्रपूर शहर व ग्रामीण जिल्हा प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. या नियुक्तीबाबतचे अधिकृत पत्र प्रदेश काँग्रेसकडून जारी करण्यात आले आहे.

प्रदेशाध्यक्षांच्या आदेशानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांसाठी प्रभारी नेमण्यात आले असून ब्रह्मपुरी व वरोरा विधानसभा मतदारसंघाचे प्रभारी म्हणून आ. वंजारी यांच्यावरच जबाबदारी देण्यात आली आहे. राजुरा विधानसभेसाठी हैदर अली दोसानी, चंद्रपूर विधानसभा क्षेत्रासाठी श्री. मुजीब पठाण (नागपूर), बल्लारपूर विधानसभा क्षेत्रासाठी उमाकांत अग्निहोत्री, तर चिमूर विधानसभा क्षेत्रासाठीश्री. विश्वजीत कोवासे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष अॅड. गणेश पाटील यांनी या नियुक्तीचे पत्र जारी केले असून, जिल्हा प्रभारी व विधानसभा प्रभारी यांनी स्थानिक कार्यकर्त्यांशी तातडीने संपर्क साधून संघटनात्मक बैठक घेण्याचे निर्देश दिले आहेत. या नियुक्तीमुळे चंद्रपूर जिल्ह्यात काँग्रेसच्या संघटनात्मक कामकाजाला नवे बळ मिळेल, तसेच आगामी राजकीय घडामोडींमध्ये काँग्रेस पक्ष मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## किसान समृद्धी मेळावाद्वारे शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी होणार जागर :अॅड.आशिष जयस्वाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

वातावरण बदलातील विविध आपत्तींना सामोरे जाऊन शेतीसाठी कटीबद्ध असलेल्या शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचा मंत्र मिळावा, शेती व शेतीपूरक विविध योजनातून त्यांची समृद्धी व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाने भर दिला आहे. कृषी क्षेत्रातील विविध योजनांच्या सुरेख संगमातून शेतकऱ्यांना प्रगतीचा नवा मंत्र मिळावा यासाठी रामटेक येथे नेहरु मैदानावर १२ सप्टेंबरला भव्य शेतकरी समृध्दी महोत्सवाचे आयोजन केले जात आहे. यात कृषी क्षेत्रासह गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या माध्यमातून सेंद्रीय नैसर्गिक शेतीचा व दुर्लभ सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शनाचा योग साधला जात आहे. या महोत्सवाचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन राज्याचे अर्थ व कृषी राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल यांनी केले. महाराष्ट्र शासन कृषि विभाग मार्फत रामटेक येथील नेहरू मैदान येथे १२ सप्टेंबर २०२५ रोजी स. ९.४५ वा या मेळाव्याचा शुभारंभ होईल. या महोत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, राज्य कृषि मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, राज्यमंत्री अॅड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, लोकसभा सदस्य, रामटेक मतदार क्षेत्र उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून परमपूज्य गुरुदेव श्री श्री रविशंकरजी, (संस्थापक, आर्ट ऑफ लिव्हिंग) उपस्थित राहणार आहे.

महोत्सवाला २५ हजार लोकांची उपस्थिती अपेक्षित अपेक्षित आहे. त्यासाठी आवश्यक असलेल्या सभामंडप उभारणीच्या कामाला वेग आलेला आहे. या महोत्सवात भव्य कृषी प्रदर्शनीचे देखील आयोजन करण्यात येणार आहे. यामध्ये सेंद्रीय शेती उत्पादने, विविध पशुधन, गोविज्ञान व अनुसंधान केंद्र देवलापार, माती परीक्षण, कृषी यांत्रीकीकरण व विविध उपकरणे, पीएमएफएम योजनेअंतर्गत निर्मित कृषी उत्पादने याविषयांच्या स्टॉल्सवरुन शेतकऱ्यांना अत्याधुनिक माहीती दिली जाणार आहे.

## काटोल मतदारसंघात पुन्हा शेतकऱ्यांची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. ९ :

काटोल तालुक्यातील खानगाव येथे रात्री रविवारला घडलेल्या दुर्दैवी घटनेने गावात हळहळ व्यक्त होत आहे. येथील प्रफुल दादाराव नेरकर (वय ४१) या शेतकऱ्याने आर्थिक अडचणींना कंटाळून स्वतःच्या शेतात विष प्राशन करून आत्महत्या केली.

प्रफुल नेरकर हे केवळ शेतकरीच नव्हते, तर आपल्या कुटुंबाचे एकमेव आधार होते. घरातील सर्व जबाबदाऱ्या त्यांनी खांद्यावर घेतल्या होत्या. शेतीबरोबरच घरगुती उत्पन्नासाठीही ते मेहनत करीत होते. त्यांच्या पश्चात पत्नी प्रीती प्रफुल नेरकर (वय ३५), मुलगा समर्थ (वय ११) आणि इतर कुटुंबीय असा परिवार असून, त्यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण कुटुंब उघड्यावर आले आहे.

प्राथमिक माहितीनुसार, सततची नापिकी, शेतीतील तोट्याची परिस्थिती, आर्थिक विवंचना आणि बँक व सहकारी संस्थांचे मिळून सुमारे ३ लाखांचे कर्ज या सर्व गोष्टींचा मानसिक ताण त्यांच्यावर होता.

या अडचणींना कंटाळून त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून, पुढील तपास सुरू आहे.

या हृदयद्रावक घटनेनंतर खानगाव व परिसरात शोककळा पसरली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढते प्रमाण चिंतेची बाब असून, शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येस राज्य सरकारच जबाबदार, सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा.



सततची नापिकी, शेतमालाचे पडलेले भाव, पीक विमाची भरपाई नाही, शेतकरी कर्जमाफी नाही अशा अस्मानी सुलतानी संकटात सापडलेला शेतकरी आपले जीवन संपवत आहे, हे महाराष्ट्रासाठी लाजिरवाणे आहे, काटोल-नरखेड तालुक्यातील आतापर्यंत झालेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सरकारच्या फसव्या घोषणांनी घेतलेले बळी असून या शेतकरी आत्महत्येप्रकरणी फडणवीस सरकारवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवा.

**दिनेश निंबाळकर**
**काटोल-नरखेड विधानसभा प्रमुख, प्रहार जनशक्ती पक्ष**

## दहेगाव गोवारी भूमिगत कोळसा खाणीला भाजप आमदारांचा विरोध

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

अंबुजा सिमेंट लिमिटेड कंपनीतर्फे प्रस्तावित दहेगाव गोवारी भूमिगत कोळसा खाण प्रकल्पाला स्थानिक नागरिकांसह भाजपच्या दोन आमदारांनीही कडाडून विरोध केला आहे. आमदार समीर मेघे आणि डॉ. आशीष देशमुख या दोघांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नागपूर कार्यालयाला पत्र देत या प्रकल्पाला मंजुरी देऊन आमच्या धरतीमातेसह आमचे जिवंतपणी शवविच्छेदन करू नका, अशी विनंती केली आहे. या प्रकरणाबाबत आपण जाणून घेऊ या.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने अंबुजा सिमेंट्स लि. यांच्या दहेगाव गोवारी भूमिगत कोळसा खाण प्रकल्पासंदर्भात पर्यावरणीय जनसुनावणी बुधवारी (१० सप्टेंबर) आयोजित केली आहे. या प्रकल्पाला स्थानिकांसह भाजपचे हिंगणा मतदारसंघाचे आमदार समीर मेघे आणि सावनेरचे आमदार डॉ. आशीष देशमुख यांनी विरोध केला आहे. भाजपच्या दोन्ही आमदारांनी प्रदूषण मंडळाला दिलेल्या पत्रात म्हटले की, या प्रकल्पामुळे परिसरातील १० गावांसह तेथील शेतकरी, नागरिक, पशुधनासह पर्यावरणाची मोठी हानी होणार आहे. नागरिकांवर रोग व आजारांचे संकट, विस्थापन, जीवाला धोका, उपजीविकेचे साधन हिरावले जाण्याची भीती आहे. प्रदूषण मंडळाने बुधवारी सकाळी ११.३० वाजता, प्रकल्प स्थळी, अंबुजा सिमेंट्स लि., दहेगाव गोवारी भूमिगत कोळसा खाण, ख. नं. ९०, वलनी, ता. नागपूर (ग्रामीण) येथे जनसुनावणी आयोजित केल्याची सूचना प्रसिद्धी माध्यमातून प्रकाशित केली. या सुनावणीला स्थानिक नागरिकांसह लोकप्रतिनिधी व विविध संघटनांनी उपस्थित राहून मत मांडण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

## भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादीचा प्रभाग रचनेवर आक्षेप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ : :

महापालिका निवडणूकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रभाग रचनेच्या प्रारुपावर जवळपास ११५ हरकतींमध्ये ५९ आक्षेप हे प्रभागांच्या सीमांकनाबाबत आहेत. या आक्षेपांवर महापालिकेच्या मुख्यालयात सुनावणीला सुरवात झाली. या सुनावणीसाठी नगरविकास विभागाने प्राधिकृत अधिकारी म्हणून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र मेट्रो रेल्वे, श्रावण हर्डीकर यांची नियुक्ती केली आहे. हर्डीकर यांच्यासह महापालिका आयुक्त, डॉ. अभिजीत चौधरी सुनावणीला उपस्थित आहेत. सुनावणीसाठी कडेकोड बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.

आक्षेप कर्त्यांचे नाव घेऊन सुनावणीच्या ठिकाणी सोडण्यात येत आहे, इतर कुणालाही सुनावणीच्या स्थळी प्रवेश देण्यात येत नाही आहे. भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी पक्षाच्या माजी नगरसेवकांनी प्रभाग रचनेवर आक्षेप घेतला आहे. महापालिकेकडून २३ ऑगस्टला प्रभाग रचनेचे प्रारूप जाहीर झाल्यानंतर त्यावर हरकती व सूचना मागवण्यात आल्या होत्या.४ सप्टेंबरपर्यंत यावर ११५ हरकती राजकीय पक्ष व नागरिकांकडून नोंदवण्यात आल्या. यामध्ये प्रभागांच्या सीमांकनासंबंधीचे ५९, तर प्रभागामधील वस्त्यांच्या नावांबद्दल २६, तर १६ आक्षेप मतदान केंद्र, बुथ यासंबंधीचे असल्याची माहिती निवडणूक विभागातील सूत्रांनी दिली. आक्षेप नोंदवलेल्यांना नोटीस पाठवण्यात आल्या असून त्यात दिलेल्या वेळेनुसार सुनावणी घेण्यात येणार आहे. प्रभागातील सीमांकनाच्या आक्षेपासंबंधीची सुनावणी एकाच वेळी घेण्यात येणार आहे.

या आक्षेपांवर आता सुनावणी होऊन लवकरच अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात येणार आहे. जवळपास सर्वच राजकीय पक्षांकडून आक्षेप नोंदवण्यात आले. बहुतांश आक्षेपांमध्ये प्रभागांचे सीमांकन, एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात जोडण्यात आलेल्या वस्त्या, मतदान बुथचे स्थानांतरण यांचा समावेश आहे. तर चार सदस्यीय प्रभाग रचना रद्द करावी अशीही मागणी करणारे आक्षेप आहेत. सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी आक्षेप नोंदवले.

## नागपुरात रंगणार आमदार महाकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा

# श्री सिद्धीविनायक सेवा ट्रस्टतर्फे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ : :

श्री सिद्धीविनायक सेवा ट्रस्टच्या वतीने विधान परिषद सदस्य आमदार संदीप जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार महाकरंडक राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा 2025चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा २२ ते २७ नोव्हेंबरदरम्यान नागपुरातील सायंटिफिक सभागृह, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर येथे पार पडणार असून उद्घाटन आणि समारोपीय कार्यक्रम लक्ष्मीनगर येथील व्हॉलीबॉल ग्राऊंड येथे होणार आहेत.

राज्यभरातील हौशी कलावंतांना नाट्यकलेचे कौशल्य प्रदर्शित करण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचे हे पहिलेच वर्ष असून राज्यभरातील विविध नाट्यसंघांना एकत्र आणणारा हा उपक्रम राज्यातील नाट्यसंस्कृतीला नवे बळ देणारा ठरेल, असा विश्वास आमदार संदीप जोशी यांनी व्यक्त केला आहे.




स्पर्धेत विजेत्यांसाठी तब्बल लाखो रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. सर्वोत्कृष्ट निर्मितीसाठी प्रथम पारितोषिक 1,51,000, द्वितीय 1,00,000 व तृतीय 50,000 रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र असेल. याशिवाय उत्तेजनार्थ, लक्षवेधी एकांकिका, तसेच दिग्दर्शन, लेखन, रंगभूषा, वेशभूषा, प्रकाशयोजना, नेपथ्य, संगीत, अभिनय अशा विविध तांत्रिक व कलात्मक गटांमध्ये स्वतंत्र पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत. महिला दिग्दर्शक, विनोदी अभिनय आणि बालकलावंतासाठीही विशेष पुरस्कार देण्यात येणार आहेत.

ही स्पर्धा केवळ मराठी भाषेतील एकांकिकांसाठी खुली असून, 1 ऑगस्ट 2023 ते 30 सप्टेंबर 2025 या कालावधीत राज्यातील कोणत्याही स्पर्धेत प्रथम किंवा द्वितीय पारितोषिक मिळवलेल्या एकांकिकेलाच प्रवेश दिला जाणार आहे. प्रत्येक एकांकिकेचा कालावधी किमान 30 तर कमाल 45 मिनिटांचा राहील. प्रवेश अर्ज ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारले जाणार असून अंतिम तारीख 10 नोव्हेंबर 2025 संध्याकाळी 6 वाजेपर्यंत आहे. स्पर्धेसाठी स्वतंत्र फेसबुक पेज आणि इंस्टाग्राम अकाऊंट असून त्यावर स्पर्धेचे अपडेट वेळोवळी बघायला मिळणार आहेत.

राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन आणि समारोप लक्ष्मीनगर मैदानावर होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात गाजत असलेली आणि रसिक प्रेक्षकांनी डोक्यावर घेतलेली कलाकृती द फोक आख्यान-'थाट ह्यो जुना खेळ हा नवा'.. ह्या कलाकृतीच्या शनिवार दि. 22 नोव्हेंबर रोजी सायंकाळी 6 वाजता व्हॉलीबॉल मैदान, लक्ष्मीनगर येथे होणाऱ्या सादरीकरणानं ह्या भव्य आमदार महाकरंडकाचे उद्घाटन होणार आहे. समारोपही दमदार होणार असून लवकरच त्याचीही घोषणा आयोजकांतर्फे करण्यात येईल.

एकांकिका स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंत कलावंत व तंत्रज्ञ राहणार असून पाचही दिवसात काही सेलिब्रेटी सहभागी होतील. राज्यभरातून स्पर्धेत सहभागी होणाऱ्या संघांना मानधन, भोजन व निवास व्यवस्था आयोजकांतर्फे करण्यात येणार आहे. यासोबतच विदभार्तील संघांना 2500 तर विदभार्बहिरील संघांना 5000 इतके प्रवास व सादरीकरण मानधन देण्यात येणार आहे.

या स्पर्धेसाठी आमदार संदीप जोशी यांच्या मार्गदर्शनात नरेश गडेकर, रमेश लखमापुरे, प्रफुल्ल फरकासे, प्रफुल्ल माटेगांवकर, सुशील सहारे, वैदेही चवरे आणि कु. स्नेहांजली तुंबडे अशी आयोजन समिती कार्यरत आहे. सिद्धीविनायक सेवा ट्रस्ट व आमदार संदीप जोशी यांच्या प्रयत्नांतून होणारी ही राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा कलावंतांसाठी नवे व्यासपीठ ठरणार असून नाट्यरसिकांसाठीही अविस्मरणीय मेजवानी ठरणार आहे.

# जीताऊ व टिकाऊला बसपा तिकिटा देऊन निवडूनही आणेल : ॲड. सुनील डोंगरे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत, कार्यकर्ते कामाला लागले आहेत, अशा वेळेस कार्यकर्त्यांच्या कामाच्या व विश्वासाच्या भरोशावर आपण निवडणुका जिंकू शकतो. त्यासाठी बंधूभाव आवश्यक आहे. पक्ष जीताऊ, टिकाऊ व सक्षम उमेदवारांना मैदानात उतरवून जिंकवेल सुद्धा असा विश्वास कार्यकर्त्यांच्या समीक्षा बैठकीत बसपा प्रदेशाध्यक्ष एडवोकेट सुनील डोंगरे यांनी व्यक्त केला.




सुनील डोंगरे यांनी काल नागपूर जिल्ह्यातील प्रदेश पदाधिकारी व प्रमुख कार्यकर्त्यांची संगठन समीक्षा बैठक घेतली. त्यात हा विश्वास व्यक्त केला. या बैठकीला महाराष्ट्र प्रदेशचे महासचिव पृथ्वीराज शेंडे, नागोराव जयकर, मंगेश ठाकरे, प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे, जिल्हा प्रभारी राजकुमार बोरकर, एड राहुल सोनटक्के, यशवंत निकोसे, तपेश पाटील, हर्षवर्धन डोईफोडे, योगीराज लांजेवार, तारा गौरखेडे, मोहम्मद इब्राहिम, चंद्रशेखर कांबळे, उमेश मेश्राम, अभिलेश वाहाने तसेच अंकित थूल, संजय इखार, सुनंदा नितनवरे, सहदेव किल्लेवान, माया ऊके, पूनेश्वर मोटघरे, सुरेंद्र शेंडे, चंद्रगुप्त रंगारी आदींनी आपापल्या कार्याचा आढावा दिला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विदर्भातील प्रत्येक विधानसभेतून एक जिल्हा परिषद जिंकून आणण्याचे टारगेट पक्षाने निश्चित केले असून नागपुरात बसपाच्या मर्जीशिवाय महापौर बनणार नाही याचे नियोजन करण्यात आले आहे. मागील वेळी बसपाचे दहा जिंकले असून 22 दुसऱ्या स्थानावर अगदी थोड्या मतांनी पराभूत झाले होते, बसपा त्यावर अधिक जोर देणार असल्याचे मत एडवोकेट सुनील डोंगरे यांनी व्यक्त केले.

# जिल्हा व मनपा शालेय शासत्रांग (च्याकांडो) स्पर्धा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर यांच्या वतीने आयोजित नागपूर जिल्हास्तरीय शालेय शासत्रांग मार्शल आर्ट (च्याकांडो) स्पर्धा यशोधरा बुद्ध विहार, कपिल नगर रोड, नागपूर येथे उत्साहात संपन्न झाली.

नागदवने, अपेक्षा नागदवने आणि राहुल बारमाटे यांनी मान्यवरांचे स्वागत करून खेळासंदभार्तील माहिती दिली.स्पर्धेत सेंटर पॉइंट



स्कूलवर्धमान नगर, शाहू गार्डन स्कूल, ईडीफाय स्कूल कामठी, सेंट क्लारेट स्कूल बुटीबोरी, स्वामीनारायण स्कूल, सिंधी हिंदी स्कूल, दयानंद आर्य कन्या स्कूल, बुटी स्कूल, विद्या निकेतन स्कूल येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उत्तम खेळ कौशल्याचे प्रदर्शन केले.

या स्पधेर्तून निवडक खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पधेर्साठी निवड करण्यात आली.आयुष नागदवने, आर्यन धमगाये, शैवल रामटेके, अक्षरा उरकुडे, सुशमिता सोनकुसरे यांनी पंच म्हणून योग्य निर्णय देत स्पर्धा यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली.ही स्पर्धा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी एक सशक्त व्यासपीठ ठरली असून खेळाडूंनी भविष्यातील स्पर्धांसाठी आत्मविश्वासाने पुढे वाटचाल करावी, असे मत आयोजकांनी व्यक्त केले.या स्पर्धेस जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक यांची प्रमुख उपस्थिती होती तर , क्रीडा मार्गदर्शक निशांत पाटील, महाराष्ट्र शासत्रांग मार्शल आर्ट असोसिएशनचे सचिव मिलिंद कातोरे, संघटन सचिव सुमीत नागदवने, बबन पाटील, दीपक बिसेन, विनोद डहारे, रेंशी प्रमोद जांभूळकर, किरण यादव, मंगेश पौनिकर , शेख जावेद व राहुल यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

# किट्सच्या गणपती बाप्पांचे उत्साहात विसर्जन



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ९ :

कविकुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (किट्स), रामटेक येथील त्रिवेणी वसतिगृहात २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत गणेश चतुर्थीचा उत्सव श्रद्धा, उत्साह, भजन व सांस्कृतिक वातावरणात, पारंपरिक वेशभूषेत, विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सहभागाने साजरा करण्यात आला. वसतिगृह परिसर फुलांनी, रोषणाईने व रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता. कर्मचारी व विद्यार्थी नियमितपणे या धार्मिक कार्यक्रमामध्ये सहभागी होत होते. यामुळे संस्थेत परस्पर सन्मान व एकजुटीची भावना प्रकषार्ने जाणवली. अकरा दिवस प्रसादाचे वितरण करण्यात आले. दिनांक ६ सप्टेंबरला गणपती बाप्पांना महाप्रसाद देऊन उत्साहात निरोप देण्यात आला.

संस्थेचे सचिव व्ही. श्रीनिवास राव व प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती समन्वयक बी. वेंकन्ना, समिती अध्यक्ष कुसुमाकर बर्डे, विद्यार्थी डीन, वसतिगृह डीन, प्रकल्प अधिकारी, सर्व वार्डन, कर्मचारी व विद्यार्थी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

# नागपूर विभागात ईएचएस प्रशिक्षण व सुरक्षा सत्रांचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने नागपूर स्थानकाच्या पुनर्विकास प्रकल्पांतर्गत प्लॅटफॉर्म क्र. 5, दिनांक 9 सप्टेंबर 2025 पासून 52 दिवसांसाठी बंद ठेवण्याची घोषणा केली आहे. हा बंदोबस्त नव्या कॉन्कोर्सच्या पायाभरणीच्या कामासाठी करण्यात आला आहे. नागपूर स्थानकाच्या या महत्त्वाकांक्षी पुनर्विकास प्रकल्पाचा उद्देश प्रवासी सुविधा वाढविणे, गर्दी व्यवस्थापन अधिक सुलभ करणे व वाढत्या रेल्वे प्रवाशांना जागतिक दर्जाची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. याचाच एक भाग म्हणून ईपीसी कंत्राटदार मेसर्स गिरधारीलाल कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांनी प्लॅटफॉर्म क्र. 5 वर ट्रॅफिक ब्लॉक व बांधकाम कामास सुरुवात केली आहे.

सुरक्षा आणि कामकाजाची सुयोग्य अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी कार्यस्थळी टूल बॉक्स टॉक आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये सर्व कामगारांना सुरक्षेच्या आवश्यक सूचना, संरक्षणात्मक साधनांचा वापर व मानक कार्यपद्धतींचे पालन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. याशिवाय, प्लॅटफॉर्म क्र. 5 वर पीएमएस प्रतिनिधी, सेफ्टी कन्सल्टंट आणि जीएलसीपीएल ईएचएस टीम यांच्यावतीने कॉन्कोर्स पायाभरणीसाठी 52 दिवसांच्या ब्लॉक कामकाजादरम्यान सुरक्षित कार्यपद्धती या विषयावर पर्यावरण, आरोग्य आणि सुरक्षा प्रशिक्षण सत्र घेण्यात आले. या सत्रात अपघात प्रतिबंध, शिस्तबद्ध समन्वय आणि सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन यावर विशेष भर देण्यात आला.

# आंबेडकरवादी राजकारणाला नवी दिशा रिपब्लिकन फेडरेशनची स्थापना

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लोकशाहीचे तत्त्व सामाजिक सहजीवनाशी जोडून समतेवर आधारित राजकारणाची वाट मोकळी केली होती. त्यांच्या या विचारधारेचा वारसा पुढे नेत आंबेडकरवादी राजकारणाच्या पुनरुज्जीवनासाठी रिपब्लिकन फेडरेशन या नव्या संघटनेची औपचारिक स्थापना करण्यात आली आहे.

मागील एका वर्षात नागपूर शहरातील प्रतिष्ठित व्यक्तींसोबत झालेल्या चर्चेनंतर तसेच सहा सार्वजनिक कार्यक्रमांतून झालेल्या चर्चाविनिमयानंतर रिपब्लिकन फेडरेशन हे नाव सवार्नुमते निश्चित करण्यात आले. सध्या घर-घर रिपब्लिकन अभियानांतर्गत नागपूर महानगरपालिका निवडणुका लक्षात घेऊन आंबेडकरवादी जनतेशी संवाद साधला जात आहे. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून फेडरेशन जनतेमध्ये सक्षम पर्याय म्हणून उभे राहत आहे.

फेडरेशनने शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस भूमिका मांडली आहे. सामान्य जनतेसाठी शाळा, दवाखाने, रस्ते, वाहतूक व्यवस्था, स्वयंरोजगार या सोयींना प्राधान्य देण्यासोबतच नाग नदीचे सौंदर्यीकरण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तीनही स्मारके उभी करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.मुख्य संयोजक म्हणून मिलिंद पखाले यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली असून छाया खोब्रागडे, नरेश वाहणे, विशाल वानखेडे, किशोर चौधरी, ज्योती आवळे, सुधीर मेश्राम, कल्पना मेश्राम, भारती सहारे, सुगंधा खांडेकर, ममता बोदिले, मृणालिनी दहीवडे, वंदना मोटघरे, वर्षा सहारे आदींचा सहसंयोजक म्हणून सहभाग आहे. मार्गदर्शक म्हणून डॉ. एस. के. गजभिये, माया कांबळे, अशोक बोंदाळे, नानाजी गायकवाड, राहुल सोमकुंवर, पुष्पा बौद्ध, शादुर्ला महाजन, भीमराव गोटे, रंजना वासे, अनिल मेश्राम, डॉ सुरेंद्र बोरकर, रजनीश मेश्राम, सुनील सारीपुत्त, प्रकाश दार्शनिक, जयंत इंगळे, शंकर ढेंगरे, कृष्णा दुबे, रमा वासनिक, माया पाटील, आशा रंगारी, अस्मिता लोखंडे, ॲड. संघमित्रा बाभरे, रेशमा कांबळे, हिरालाल बोरकर, सुबोध जंगम, रुपेश कांबळे, राज रक्षित, अनिल गारडकर, प्रमोद कांबळे, बबन बाभरे यांच्यासह अनेक वरिष्ठ नेत्यांचा सहभाग असून, विविध समित्यांतून समाजातील कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात जोडले गेले आहेत.

# ३.४० लाखांच्या मालावर हातसाफ

**नागपूर** : चावीने घरामागील दाराचे कुलूप उघडून आत शिरलेल्या चोराने रोकड आणि दागिन्यांसह एकूण ३ लाख ४० हजार रुपये किंमतीच्या मालावर हातसाफ केला. ही घटना सदर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी खुशी मनोज पिल्लई (५२) रा. आझाद चौक, सदरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. शुक्रवारी रात्री खुशी जेवण केल्यानंतर आपल्या खोलीत झोपायला गेल्या होत्या. घरकाम करणारी मोलकरीणही शेजारच्या खोलीत झोपलेली होती. मध्यरात्रीनंतर अज्ञात आरोपीने घरात प्रवेश करून ड्रावरमध्ये ठेवलेली २.४० लाखांची रोकड, हिरेजडित अंगठी, सोन्याची चेन आणि घड्याळ चोरून नेली. शनिवारी सकाळी मोलकरीणची झोप उघडली असता चोरी झाल्याचे समजले. तिने याबाबत खुशी यांना माहिती दिली. घरच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची फुटेज तपासली असता रात्री २.४५ वाजताच्या सुमारास एका आरोपी घरामागच्या दाराचे कुलूप आत घुसताना दिसला. विशेष म्हणजे मागच्या दारावरच कुलूपाची चावी अडकलेली असते. याच चावीने त्याने कुलूप उघडले आणि आरामात घरात शिरला.

# भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ९ :

मॅग्नस इन्स्टिट्यूट बानाडोंगरी येथे युवा उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते आशिष सिंह जनकवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराचे आयोजन लाइफ लाईन ब्लड बँक, श्री गुरूनानक नगर आणि वैशाली नगर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या प्रसंगी माजी पंचायत समिती उपसभापती उमेशसिंह राजपूत, माजी उपसरपंच बाबुलाल गुप्ता, माजी ग्रामपंचायत सदस्य विनोद ठाकरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गुलाबसिंह, बी. एन. सिंह, एन. आर. सिंह, राजाराम पांडे, रंजीव सिंह, के. के. तिवारी, अनिल नागोसे, गजानन भोयर, विनोद सिंह, अक्षय काळे, मनोज तिवारी यांच्यासह परिसरातील असंख्य नागरिक उत्स्फूर्तपणे उपस्थित होते. समाजकारण आणि सामाजिक उत्तरदायित्व यांची जाण ठेवून रक्तदानासारखा उपक्रम राबवून वाढदिवस साजरा करणे ही एक प्रेरणादायी संकल्पना असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले.

# प्राध्यापक देविदास कठाणे यांची विदर्भ शाहीर कलाकार परिषदेच्या विदर्भ अध्यक्षपदी निवड

■ महासागर प्रतिनिधी, काटोल, दि. ९ :

विदर्भ शाहीर कलाकार परिषदचे केंद्रीय अध्यक्ष मनीष भिवगडे व केंद्रीय कार्याध्यक्ष अलंकारजी टेंभुर्ने यांनी माजी जिल्हा परिषद सदस्य व वृद्ध कलावंत मानधन समितीचे सदस्य प्राध्यापक देविदासजी कठाणे सर यांची नियुक्ती विदर्भ प्रदेश अध्यक्षपदी करण्यात आली. त्यांना पुष्पगुच्छ व नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषदचे माजी सदस्य शंकररावजी चहांदे, विदर्भ प्रचार प्रमुख युवराजजी मेश्राम, जिल्हा अध्यक्ष दयालजी कांबळे, सरचिटणीस अरुणभाऊ वाहने यांच्या प्रमुख उपस्थितीत व आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या शुभेच्छांनी कठाणे सरांना विदर्भ अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात



आली. या अगोदर प्राध्यापक देविदासजी कठाने हे अनेक सामाजिक व धार्मिक संघटनेमध्ये, संस्थेमध्ये कार्यरत होते. नगरपरिषद काटोलचे शिक्षण सभापती होते. या अगोदर ते शिक्षण संस्थेत प्राध्यापक पण होते.

# चैतन्येश्वर विद्यालय, तारणा येथे शिक्षकदिन

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. ९ :

चैतन्येश्वर विद्यालय तारणा येथे शिक्षक दिन कार्यक्रम हर्षोल्लासात पार पडला. प्रसंगी विद्यार्थी अनुशासनाचा कार्यक्रम घेण्यात आला. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती आदर, कृतज्ञता आणि प्रेम व्यक्त करणे, तसेच शिक्षणासोबत जीवनमूल्यांचा स्वीकार करणे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व, आत्मशिस्त, जबाबदारी आणि समाजभावना निर्माण करणे हा एक महत्त्वाचा उद्देश होता.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक पंकज तळेकर, प्रमुख पाहुणे के. व्ही. दहीकर, शिक्षक टिकले, टेंभरे तसेच इतर शिक्षक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना, दीपप्रज्वलन व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापकांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची घडण आणि विद्यार्थ्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास यावर प्रकाश टाकला. शिक्षक हे ज्ञानाचे दीपस्तंभ असून त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य दिशा दिल्यास समाज उज्वल बनतो, असे त्यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे के. व्ही. दहीकर यांनी शिक्षण हे केवळ परीक्षा पास करण्यापुरते नसून, जीवनातील अडचणींना सामोरे जाण्यास सक्षम बनवणारे साधन आहे, असे स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मेहनत, अनुशासन आणि नैतिक मूल्यांवर भर देण्याचा सल्ला दिला. शिक्षक दिनानिमित्त विशेष स्वरूपात स्वयंशासन कार्यक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना शालेय कामकाजाची प्रत्यक्ष जबाबदारी दिली गेली. समित्यांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेत पुढील कामे पार पाडली. कार्यक्रमाची वेळेवर सुरुवात व आयोजन, उपस्थिती नोंदविणे, स्वच्छतेची काळजी घेणे, शिस्त राखणे, पाहुण्यांचे स्वागत, सांस्कृतिक कार्यक्रमांचे समन्वयन या माध्यमातून विद्यार्थ्यांनी नेतृत्वगुण, आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि जबाबदारी स्वीकारण्याची तयारी दर्शविली. शिक्षक दिनाच्या निमित्ताने शालेय परिसरात विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. प्रसंगी शिक्षक सत्कार, भाषण स्पर्धा, शिक्षणाचे महत्त्व, शिक्षकांचे योगदान आणि नैतिक मूल्यांवर विद्यार्थ्यांनी मनमोकळे विचार व्यक्त केले. शालेय परिसर स्वच्छ ठेवण्याचा उपक्रम राबवून स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावले.

प्रसंगी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक वृंद शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी यांनी सहकार्य केले यशस्वी संचालन कु. दुर्गेश्वरी लुचे, आभार कु. आयुष गुबरे यांनी मानले.

# युवकांनी श्रमदानातून राबवले शहर व वेणा नदी स्वच्छता अभियान

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ९ :

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर युवा प्रतिष्ठान व नगरपंचायत हिंगणा यांच्या संयुक्त सहभागाने हिंगणा शहर व वेणा नदी स्वच्छता मोहीम युवकांनी राबवली. यांमध्ये हिंगणा शहर व गडमंदिर देवस्थान परिसरातील वेणा नदी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत हिंगणा शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता, वेणा नदीची स्वच्छता आणि नदीत विसर्जित करण्यात आलेल्या गणेश मुर्त्यांचे संकलन करण्यात आले \. स्वच्छता मोहिमेदरम्यान नगरपंचायतचे मुख्याधिकारी धनंजय सरनाईक, नगरपंचायतच्या उपाध्यक्ष प्राजक्ता गजबे, सभापती छाया भोस्कर, सुचिता चामाटे, जया खाडे, नगरसेवीका बेबी गजबे, पंकज गजबे तसेच नगरपंचायतचे नरवाडे, मेटांगळे, गोतमारे, वाहने, जागृती



लोहारे, प्रीती चकोले, परेश बुधे, हर्षल काळे, चेतन तुराळे, कृणाल थोटे, विक्की मंदे, आकाश उरकुडे, निखील थोटे, शुभम मंदे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# आता होणार महा रुद्र पूजन मानकापूर इनडोअर स्टेडियममध्ये

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर , दि. ९ :

शहरातील भक्तांसाठी आनंदाची बातमी! श्री श्री रविशंकर जी यांच्या पावन सान्निध्यात होणारे महा रुद्र पूजन आता अधिक सुव्यवस्थित पद्धतीने मानकापूर इनडोअर स्टेडियम (विज्ञान भैरव स्थळ) येथे आयोजित करण्यात येणार आहे. हवामानाच्या परिस्थितीचा विचार करून हे स्थळ बदलण्यात आले असून, यामुळे भाविकांना कोणतीही गैरसोय न होता या भव्य सोहळ्याचा लाभ घेता येईल. १० सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता महा रुद्र पूजन पार पडणार असून, त्यानंतर सर्व भाविकांना सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या थेट दर्शनाचा दिव्य अनुभव घेता येईल. दर्शनाची व्यवस्था ११ व १२ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी १२ या वेळेत ठेवण्यात आली आहे.

# गुरु-शिष्य नाते झाले अधिक दृढ विद्यार्थ्यांनी घडविली शिक्षकांची सहल

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

दवलामेटी येथील द्रुगधामना हायस्कूलमधील सन १९९४-९५ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांसाठी एक आगळीवेगळी सहल आयोजित करून शिक्षक दिन साजरा केला. नागपूर तालुक्यातील शिवा अडेगाव जवळील ठाकूरवाडी येथे रविवारी (ता. ७ सप्टेंबर) पार पडलेली ही निसर्गरम्य सहल गुरु-शिष्य नात्याचा एक अविस्मरणीय ठेवा ठरली.



३० वर्षांपूर्वी शाळेत एकत्र आलेले विद्यार्थी आणि त्यांचे गुरुजन पुन्हा एकत्र आल्याने वातावरण भारावून गेले होते. नोकरी निमित्ताने पुणे, मुंबई, गोवा अशा विविध शहरांत स्थायिक झालेले अनेक विद्यार्थी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सहकुटुंब मोठ्या संख्येने उपस्थित राहिले.

जवळपास ९० टक्के शिक्षक सेवानिवृत्त असूनही माजी विद्यार्थ्यांच्या आग्रहाखातर त्यांनी सहलीत हजेरी लावली. शिक्षकांचा सन्मान करताना अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रू दाटून आले. यावेळी सचिन नारनवरे या माजी विद्यार्थ्यांनी सर्वांची शिक्षकांसारखी हजेरी घेतली. लिंबु चमच, डोळ्यावर पट्टी बांधुन मडके फोडणे, संगीत खुर्ची धावणे आदी खेळ घेण्यात आले.

यावेळी शिक्षक म्हणून अशोक पुंड, सुखदेव भिवगडे, अरुण कराळे, विजय कळसाईत, प्रेमदास सोमकुवर, कमल पुंड, चंदा ढगे, पुष्पमाला सोमकुवर, मीरा सातोकर, मंदा फाळके, ज्योती अढाऊ, रत्ना देवासे, ज्योती सव्वाशेरे, आरती भोरे, वैशाली लोही, मालती बेले, दीपा शांडील्य यांची उपस्थिती लाभली.या अविस्मरणीय सहलीचे नियोजन व आयोजन माजी विद्यार्थी सचिन नारनवरे, रिना पाटील, सारिका किटके, वनिता कऱ्हाडे, बुद्धघोष पाटील, संदीप सुरकर, निरंजना ढोबळे, शालीनी रामटेके, सुधाकर निनावे, अभिजीत मेंढे, जगदीश धावडे, अंजू कुकडे, प्रणिता रिनके, प्रमिला मुसळे, सुरेश राऊत, शिशुपाल गेडाम, मोरेश्वर खैरकर, धीरज घोडेस्वार, अमर लांमसोंगे, भिमराव सिंगारे, गोपाल वाकोडीकर, वैशाली मेंढे, ममता सूरकर, नसीमा घोडेस्वार, दक्ष पाटील, अथर्व कऱ्हाडे, अक्षा मेंढे, अनय मेंढे, अमायरा घोडेस्वार, दिक्षा गेडाम, सुनील महाडुळे, निधी बेलेकर, आरोही बेलेकर, मनीष बेलेकर, शलाका वाकोडीकर अवधी भिवगडे आदींनी केले.

या सहलीत शिक्षक-विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. शाळेतले किस्से, शिक्षणातील मार्गदर्शन आणि त्या काळातील शिस्तीच्या आठवणींनी वातावरण भारावून गेले. गुरुजनांनीही विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाबद्दल अभिमान व्यक्त केला. ३० वर्षांनंतर झालेली ही सहल केवळ एकत्र येण्याचा आनंद नव्हता, तर गुरु-शिष्य नात्याला नव्या बंधनांनी जोडणारा एक ऐतिहासिक क्षण ठरला.

# अमूलच्या वसुंधरा प्लान्टमध्ये माहेश्वरी पंचायत सीताबर्डीचा शैक्षणिक दौरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

माहेश्वरी पंचायत सीताबर्डीने शैक्षणिक दौऱ्यांचा भाग म्हणून ३१ ऑगस्ट रोजी हिंगणा एमआयडीसी येथील अमूलच्या वसुंधरा (वलसाड जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ) कारखाना येथे दौरा आयोजित केला होता. या दौऱ्याचा लाभ समाजातील १५० हून अधिक मुले, तरुण आणि ज्येष्ठ पुरुष आणि महिलांनी घेतला.




कार्यक्रमाची सुरुवात सर्व पाहुण्यांच्या स्वागताने झाली. याप्रसंगी,अमूल नागपूर युनिट्सचे सीईओ श्यामसुंदर लड्डा यांनी आपल्या भाषणात सांगितले की, १९४६ मध्ये कैरा जिल्हा दूध संघापासून सुरू झाली आणि अमूलने केवळ देशातच नव्हे तर जागतिक स्तरावर एक आघाडीची कंपनी म्हणून स्वतःची ओळख निर्माण केली आहे.

व्यासपीठावरील पाहुण्यांचे पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. अशोकजी गांधी यांनी लड्डा यांचे अभिनंदन केले, तर राधेश्याम चांडक यांनी त्यांना स्मृतिचिन्ह भेट दिले.लता लड्डा यांचे स्वागत पूनम झंवर आणि मोमेंटो सुनीता कलंत्री यांनी केले. वसुधरा प्लांटचे एजीएम रवींद्र बालपांडे यांचे स्वागत वरुण गांधी आणि मोमेंटो सीए अखिल राठी यांनी केले. त्याचप्रमाणे, १९८८ पासून अमूलच्या सिव्हिल वर्क्सची जबाबदारी सांभाळणारे बालमुकुंद अग्रवाल यांचा सन्मान आयुष चांडक आणि मोमेंटो डॉ. हरीश राठी यांनी केला.

कार्यक्रमाचे समन्वयक अशोक गांधी होते, ज्यांना सह-संयोजक वरुण गांधी आणि पूनम झंवर यांचे पूर्ण सहकार्य लाभले. विनोद चांडक यांनी कार्यक्रमाचे संचालन केले आणि वरुण गांधी यांनी आभार मानले.

दौऱ्यानंतर, सर्व पाहुण्यांसाठी अमूलने अमर्यादित आइस्क्रीम आणि कुल्फीची विशेष व्यवस्था केली होती. यावेळी, यूको बँकेचे झोनल मॅनेजर आनंद माहेश्वरी होते. पंचायत अध्यक्ष वीरेंद्र चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आणि कार्यकारिणीच्या पाठिंब्याने आयोजित केलेला हा उपक्रम अत्यंत यशस्वी झाला.या कार्यक्रमाच्या यशात अधिवक्ता योगेश सावळ, पुरुषोत्तम तावरी, देवकिशन राठी आणि प्रा. सुरेश गांधी, शैलेश मोकाटी आणि स्वाती चांडक यांचे विशेष योगदान लाभले.

# शिक्षकदिनी रात्रशाळा व जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षकांचे "भीक मागो आंदोलन"

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ९ :

महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेत्तर सेनेच्या वतीने रात्रकालीन शाळा शिक्षक व जिल्हा परिषद सेवानिवृत्त शिक्षकांनी काळ्या फिती लावून संविधान चौकात "भीक मागो आंदोलन" केले. राज्य शासनाच्या शिक्षक व शिक्षणविरोधी धोरणांचा निषेध करण्यासाठी घेतलेल्या या आंदोलनात शेकडो शिक्षक-शिक्षिका सहभागी झाले होते.



कार्यक्रमाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी आंदोलनकर्त्यांनी देवा भाऊ पैसे द्या, अजित दादा पैसे द्या, दादा भुसे पैसे द्या, महाराष्ट्र शासन होश में आओ अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला. पदवीधर मतदारसंघाचे आमदार डॉ. अभिजित वंजारी यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन निवेदन स्वीकारले. त्यांनी शिक्षकांच्या मागण्यांचा शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन देत आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

सेवानिवृत्त शिक्षकांच्या निवेदनात थकीत रु.१५० कोटी उपदान व अंशराशीकरण अनुदान तात्काळ देणे, दरमहा १० ते १२ कोटी रुपये आगाऊ वितरित करणे, पदवीधर शिक्षकांच्या वेतनपत्रकातील तफावती दूर करून गटविमा परतावा व्याजासह देणे, दहा वर्षे वंचित शिक्षकांना एक वेतनवाढ मंजूर करणे, तसेच जीपीएफ व पेंशन आदेश सेवानिवृत्तीच्या दिवशीच देणे यांचा समावेश आहे.

रात्रशाळा शिक्षकांनी शासन निर्णय १७ मे २०१७ नुसार कार्यभार निश्चिती व त्यानुसार वेतन आणि पूर्णवेळ मान्यता लाभ लागू करणे, तसेच न्यायालयात प्रलंबित याचिकेत शासनाने यथोचित उत्तर दाखल करणे या मागण्या मांडल्या.

आंदोलनादरम्यान भिक्षापात्रात जमा झालेली रु. १,७२२ ची रक्कम शनिवार, ६ सप्टेंबर रोजी निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना डिमांड ड्राफ्टने पाठविण्यात येणार आहे.

रात्रशाळा शिक्षकांच्या निवेदनावर चर्चा करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई येथे येत्या १२ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता शासनाच्या अवर सचिव शरद माकणे यांनी प्रतिनिधींना पाचारण केले आहे.

शिक्षण संचालक (प्राथमिक) पुणे यांनी जिल्हा परिषदेला अहवाल मागवून ४६७ सेवानिवृत्त शिक्षकांची यादी सादर करण्यास सांगितले असून, त्यापैकी ५९ शिक्षकांना सप्टेंबरमध्ये उपदान व अंशराशीकरण अनुदान देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या आंदोलनाचे नेतृत्व महेश जोशी, शरद भांडारकर आदींनी केले. आंदोलनात १५० हून अधिक शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते.

# शिक्षकदिनी विद्यार्थ्यांनी सांभाळला महाविद्यालयाचा कारभार

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ९ :



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षीप्रमाणे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात येतो. यानिमित्त नबीरा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागात एक आगळा-वेगळा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत संपूर्ण विभागाचा कार्यभार विद्यार्थ्यांच्या हाती सोपविण्यात आला होता. या विशेष दिवशी विभागाचे संपूर्ण वेळापत्रक तयार करणे, वर्ग घेतले जाणे, तास संपल्याची घंटा वाजवणे, वर्गशिस्त राखणे इत्यादी सर्व जबाबदाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःहून पार पाडल्या. यामधून नेतृत्वगुण, आत्मविश्वास व नियोजन कौशल्य वाढीस लागावे, तसेच विद्यार्थीदशेतच शिक्षकांच्या भूमिकेची जाणीव व्हावी या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. वैशाली रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. विद्यार्थ्यांनी घेतलेल्या तासिकांचे मूल्यांकनही प्राध्यापकांनी केले, उत्कृष्ट शिक्षक म्हणून काही विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. बी.कॉम. तृतीय वर्ष (इंग्रजी माध्यम), हर्ष यादव, प्रनाली गेडाम, बी.कॉम. तृतीय वर्ष (मराठी माध्यम), पूजा कचेर, निशा मुंडाफळे, एम.कॉम, तन्वी कंदळकर, राणी डोहलिया तर तनीषा सत्तेकर - विभागप्रमुख शैलेशकुमार टेम्भरे -समन्वयक, प्राची शेंडे - ग्रंथपाल, तेजस निमबुळकर यांना प्रोत्साहित करण्यात आले.

# ऑपरेशन सिंदुर चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांचा रोख पारितोषिकांसह सन्मान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :




7 सप्टेंबर रोजी भव्य सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते गणेश गाडेकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. या सोहळ्यात प्रथम पारितोषिक कु.निकीता नक्षुलवार हिला रु. ७,०००/- रोख, द्वितीय पारितोषिक कु. यशिका लांजेवार हिला रु. ५,०००/- रोख, तर तृतीय पारितोषिक कु. रुचिका किशोर मोटघरे हिला रु. ३,०००/- रोख तसेच सन्मानपत्र व बक्षीस देऊन गौरविण्यात आले. याशिवाय उत्कृष्ट चित्र या श्रेणीत निवड झालेल्या ३० कलाकारांना विशेष बक्षिसे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून परमेश्वरराव राऊत, शरद वानखेडे, कुणाल पडोळे व प्रदीप सोमनकर उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह पालक व प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंशुल कामडी, यश डाफ, जॉर्ज धावडे, तन्मय बावनकर, शुभम भगत, महेश दडमल व भारत पिसे यांनी अथक प्रयत्न घेतले.

### नागपूर विभागाकडुन ४.२६ कोटींच्या भंगार विक्रीची नोंद

**नागपूर :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने जकात विल्हेवाटीत आपले मजबूत कार्यप्रदर्शन कायम ठेवत महसूल वाढ व शाश्वत विकास यामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. ऑगस्ट 2025 मध्ये विभागाने एकूण ?4.26 कोटींची भंगार विक्री नोंदवली असून, संसाधनांच्या प्रभावी व्यवस्थापनातील ही आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी ठरली आहे. यासह, ऑगस्ट 2025 अखेर नागपूर विभागाची एकूण भंगार विक्री 18.410 कोटींवर पोहोचली असून, संसाधनांचा अधिकतम वापर आणि स्वच्छ रेल्वे परिसर राखण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे ते द्योतक आहे. जकात विल्हेवाट ही भारतीय रेल्वेच्या त्या ध्येयाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे

# चंद्रशेखर अरगुलेवार मोहब्बते पुरस्काराने सन्मानित

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. ९ :



दरवर्षीप्रमाणे, या वर्षीही फैजान-ए-ताजुल औलिया वृद्धा आश्रमाचे संस्थापक/संचालक इरशाद मौलाना यांनी ईद मिलादुन्नबीनिमित्त नागपूरमधील ताज बाग पीली शाळेजवळ पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित केला होता. इरशाद मौलाना शहरातील अशा प्रतिष्ठित व्यक्तींची निवड करतात ज्यांच्या कामांची तुलना कोणाशीही होऊ शकत नाही. एक नाव समोर येते ते म्हणजे चंद्रशेखर अरगुलेवार यांचे, ज्यांनी २५ वर्षे केंद्रीय पोलिस दलात सेवा केली आणि सामाजिक कार्यासाठी हवालदार पदाचा राजीनामा देऊन स्वतःला सामाजिक कार्यात समर्पित केले. तेजस बहुउद्देशीय संघटनेचे संस्थापक चंद्रशेखर अरगुलेवार यांना संस्थेचे मार्गदर्शक पत्रकार एम.ए. जब्बार यांच्या उपस्थितीत इरशाद मौलाना, सक्करदरा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक मुकुल ठाकरे, भंते नागदीपंकर, भंते संघरत्न मानके, गुरुदेव सेवा मंडळाचे ज्ञानेश्वर रक्षक टीचर मुश्ताक अहमद ,आणि इतर मान्यवरांच्या हाथाना साल, मोहब्बते पुरस्कार शिल्ड देऊन सम्मानित केले.

अरगुलेवार यांना यापूर्वी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. अरगुलेवार यांच्याशी बोलताना त्यांनी या पुरस्काराचे श्रेय संस्थेचे दानशूर, नागपूर, कामठी येथील पत्रकार, मित्र, आणि पत्नी आणि आपल्या परिवाराला दिले.

# दुर्गा पूजा, दिवाळी आणि छठ पूजेसाठी विशेष ट्रेनचे संचालन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

दुर्गा पूजा, दिवाळी आणि छठ पूजा सणांमध्ये गाड्यांमधील अतिरिक्त गर्दी नियंत्रित करण्यासाठी आणि प्रवाशांच्या सोयी लक्षात घेऊन, त्यांना कन्फर्म बर्थसह प्रवास सुविधा प्रदान करण्यासाठी, बिलासपूर- येलहंका (बेंगळुरू) - बिलासपूर दरम्यान २२ फेऱ्यांसाठी साप्ताहिक महोत्सव विशेष ट्रेन चालवली जात आहे. ट्रेन क्रमांक ०८२६१ बिलासपूर-येल्हांका (बेंगळुरू) महोत्सव विशेष ट्रेन बिलासपूरहून ९ सप्टेंबर रोजी २०२५ ते १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दर मंगळवारी आणि ट्रेन क्रमांक ०८२६२ येलहंका (बेंगळुरू)-बिलासपूर फेस्टिव्हल स्पेशल ट्रेन १० सप्टेंबर २०२५ ते १९ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दर बुधवारी येलहंका येथून धावेल. वरील विशेष गाड्यांचे व्यावसायिक थांबे आग्नेय मध्य रेल्वेच्या बिलासपूर, भाटापारा, रायपूर, दुर्ग येथे असतील. आणि नागपूर विभागांतर्गत, ते राजनांदगाव, डोंगरगड, गोंदिया, वडसा आणि चांदाफोर्ट स्थानकांवर दिले जाते. हा महोत्सव या विशेष ट्रेनमध्ये ०१ एसएलआरडी, ०३ जनरल, जनरेटर कारसह एकूण २० कोच उपलब्ध असतील. आग्नेय मध्य रेल्वे अंतर्गत येणारी प्रत्येकी गाडी क्रमांक ०८२६१ बिलासपूर-येल्हांका महोत्सव विशेष गाडी मंगळवारी, ती बिलासपूरहून सकाळी ११.०० वाजता निघेल आणि भाटापारा येथे ११.३८/११.४० वाजता, रायपूर येथे दुपारी १२.४५/१२.५० वाजता पोहोचेल. दुर्ग 14.20/14.25 तास, राजनांदगाव 14.48/14.50 तास, डोंगरगड 15.13/15.15 तास, गोंदिया 16.25/16.35 तास, वडसा येथून १७.५७/१७.५९ वाजता आगमन/प्रस्थान, चांदाफोर्ट येथून १९.४३/१९.४५ वाजता आणि येलहंका येथे १९.०० वाजता पोहोचेल.

# मजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या दुसऱ्या माळ्यावरून खाली पडल्याने एका मजुराचा मृत्यू झाला. ही घटना बेलतरोडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. राहुल बिहारीलाल शरणागत (२०) असे मृताचे नाव आहे. राहुल हा मुळचा बालाघाटच्या कटंगी येथील रहिवासी होता. प्लम्बिंगचे काम करण्यासाठी तो नागपुरात आला होता आणि जरीपटका परिसरात भाड्याने खोली करून रहात होता. शुक्रवारी दुपारी १.३० वाजताच्या सुमारास राहुल आणि त्याचा चुलत भाऊ रवी शरणागत मनीषनगरच्या महालक्ष्मी सोसायटीतील एका बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत प्लम्बिंगचे काम करीत होते. दुसऱ्या माळ्यावर काम करीत असताना राहुलचा तोल गेला आणि तो थेट खाली पडला. गंभीर जखमी अवस्थेत त्याला उपचारार्थ खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले.

# वायसीसीईमध्ये सस्टेनेबल एनर्जी वरील कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय (वायसीसीई) च्या सिव्हिल इंजिनीयरींग विभागाने सस्टेनेबल एनर्जी अँड क्लायमेट सोल्यूशन्स विषयावर एक आठवड्याचा एटीएल ऑनलाईन फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम (एफडीपी) यशस्वीपणे आयोजित केला. एआयसीटीई ट्रेनिंग अँड लर्निंग (एटीएएस) अकॅडमी अंतर्गत झालेल्या या प्रोग्रॅमचा उद्देश प्राध्यापक, संशोधक व तज्ज्ञांना शाश्वत ऊर्जा तंत्रज्ञान, हवामान बदलाचे परिणाम व त्यांचे नागरी अभियांत्रिकी क्षेत्रातील सखोल ज्ञान देणे हा होता. उद्घाटन सत्राला दुबई येथील नक्हील पीजेएससीचे मॅनेजर (कॉन्ट्रॅक्ट्स अँड प्रोक्योरमेंट) अभिषेक टक्कामोरे यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.यू.पी.वाघे, संयोजक डॉ. हर्षल आर. निखाडे व डॉ. स्नेहा जी. हिरेखन (वानखेडे) यांची उपस्थिती होती. सुरुवात वायसीसीईचे प्राचार्य डॉ. यू. पी. वाघे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. प्रमुख पाहुण्यांनी आधुनिक पायाभूत प्रकल्पांमध्ये शाश्वत उपायांची गरज दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगितले. हा कार्यक्रम सिव्हिल इंजिनीयरींगचे विभागप्रमुख डॉ. धीरज जी. अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात पडला. या कार्यक्रमाला भारतभरातून १६८ हून अधिक प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला.

# दारूबंदी केस निवारणकरिता पालकमंत्री बावनकुळे यांची भेट



■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. ९ :

सावरगाव जिल्हा परिषद सर्कल मधील विविध कार्यकर्त्यांच्या कामानिमित्त तसेच जिल्हा परिषद सदस्य पार्वती गुणवंत काळबांडे व सखुबाई शेंडे यांचे विरुद्ध दारू बंदी केस निवारण करिता महसूल मंत्री तथा पालकमंत्री बावनकुळे यांची भेट घेऊन सार्वजनिक केस रद्द करण्याचे आश्वासन दिले व परिणय दादा फुके आमदार विधानसभा यांची घरी सदिच्छा भेट घेतली. यावेळी सर्वेश्री गुणवंतराव काळबांडे, रामराव कुडे सदस्य भ्रष्टाचार निर्मूलन समिती नरखेड, प्रभाकर निखारे साहेब, सिद्धार्थ ढोके महामंत्री नागपूर ग्रामीण, सुरेश गुडधे अध्यक्ष ओबीसी आघाडी नरखेड, लोकेश बारमासे महामंत्री नरखेड तालुका, मंगेश गान युवा मोर्चा अध्यक्ष सावरगाव लखन कडवे उपसरपंच मालापूर प्रतीक कांबळे सरपंच मसोरा सुशील राऊत सरपंच उंमरी चंद्रशेखर काळबांडे सावरगाव सर्कल प्रमुख गौरव रेवतकर उपाध्यक्ष नरखेड तालुका परमानंद ढोणे मा. युवा मोर्चा अध्यक्ष नरखेड तालुका तसेच गंगाधर बंजारी, सुनील ठोंबरे, शेषराव खोडे विलास बागडे आदी उपस्थित होते.

# उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचा वित्त वर्ष २०३० पर्यंतचा १ लाख कोटी रुपयांच्या कर्जपुस्तकाचा आराखडा सादर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेने २०२३ या आर्थिक वर्षापर्यंत १ लाख कोटींच्या एकूण कर्जपुस्तकाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी आपला धोरणात्मक आराखडा जाहीर केला आहे. २०१७ मध्ये स्मॉल फायनान्स बँक म्हणून कामकाज सुरू झाल्यापासून झालेल्या प्रगतीच्या पायावर हा आराखडा उभा आहे. ठेवींचा भक्कम पाया वाढवणे, कर्जउत्पादनांच्या श्रेणीचा विस्तार करणे आणि खर्च-केंद्रित कार्यपद्धतीद्वारे अधिक शाश्वत नफ्याचा पाया निर्माण करणे यावर या बँकेची वाढ आधारित आहे.

विविधतापूर्ण कर्जपुस्तक : उज्जीवनने आपल्या कर्जांच्या पोर्टफोलिओमध्ये सातत्याने विविधता आणली आहे. सुरक्षित तारणाधारित कर्जांचे प्रमाण वित्त वर्ष २०१९ मध्ये १६ टक्के इतके होते. वित्त वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीअखेर ते ४६ टक्क्यांवर पोहोचले. पुढील टप्प्यात हे प्रमाण ६५ ते ७० टक्क्यांपर्यंत नेण्याचा बँकेचा मानस आहे. यामध्ये परवडणारी गृहनिर्माण कर्जे, सूक्ष्म गहाणकर्जे, सूक्ष्म-लघु-मध्यम उद्योगांसाठीची कर्जे, वाहनकर्जे, सोनेतरण कर्जे आणि कृषिकर्जे यांचा प्रमुख वाटा असेल. त्याचबरोबर मिड कॉर्पोरेट क्षेत्रासाठी कर्जउत्पादने आणून उत्पादनश्रेणी वाढवण्याचीही योजना आहे. गटकर्जांवर आधारित मायक्रो बँकिंग हा बँकेच्या विस्ताराचा पाया आहे; मात्र ग्राहक वैयक्तिक कर्जांकडे वळत असल्याने बँक आपला वैयक्तिक कर्जपोर्टफोलिओही मोठ्या प्रमाणावर वाढवणार आहे. ठेवींचा पाया : उज्जीवनने ठेवीदारांचा स्थिर पाया उभारला आहे. वित्त वर्ष २०२६च्या पहिल्या तिमाहीअखेर एकूण ३८,६१९ कोटी रुपयांच्या ठेवींपैकी ७२ टक्के ठेवी या किरकोळ (कासा व मुदतीच्या) ठेवींमधून आहेत. कासा शिल्लक ९,३८१ कोटी रुपये इतकी असून, ती एकूण ठेवींच्या २४.३ टक्के आहे. वित्त वर्ष २०३० पर्यंत कासा ठेवींचा हिस्सा ३५ टक्के करण्याचे उद्दिष्ट आहे. या वाढीसाठी शाखांचे जाळे ७५२वरून सुमारे १,१५०पर्यंत वाढवणे, विस्तारित ग्राहकवर्गाला अधिक सेवा पुरवणे आणि आयपीओ-एएसबीए, म्युच्युअल फंड वितरण, पैसे पाठवण्याची सेवा आणि सह-ब्रँडेड क्रेडिट कार्डे यांसारखी नवी उत्पादने उपलब्ध करून देणे यांचा समावेश आहे. नफा क्षमता व जोखीम स्थिती : बँकेचा विस्तार होत असताना तिचे लक्ष तांत्रिक व डिजिटल पायाभूत संरचना अधिक सक्षम करणे, योग्य आकारमानाचा कर्मचारीवर्ग ठेवणे, कार्यकारी खर्चांचे नियोजनबद्ध नियंत्रण, उत्पादकतेत वाढ तसेच शाखा व इतर भौतिक सुविधा विवेकीपणे उभारणे यावर असेल. या उपायांमुळे खर्च-उत्पन्न गुणोत्तर सुमारे ५५ टक्क्यांपर्यंत आणता येईल. कर्जमंजुरी प्रक्रिया व वसुली यंत्रणा यांच्या सहाय्याने वित्त वर्ष २०३० पर्यंत मालमत्तेवरील परतावा (आरओए) १.८ ते २.० टक्के आणि भागभांडवलावरील परतावा (आरओई) १६ ते १८ टक्के येथपर्यंत नेण्याचे बँकेचे उद्दिष्ट आहे.

भांडवली स्थिती : वित्त वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीअखेर २२.८ टक्के इतक्या भांडवली पर्याप्तता गुणोत्तराने आणि २१.२ टक्क्यांच्या प्रथम स्तर भांडवलाने उज्जीवन बँकेची भांडवली स्थिती सक्षम आहे. मालमत्तेच्या पोर्टफोलिओमध्ये सुरक्षित तारणाधारित कर्जांचा वाढता वाटा जोखमींचा भार कमी करतो. त्यामुळे भांडवलाचा कार्यक्षम वापर होतो आणि तातडीने भांडवल उभारणीची आवश्यकता न राहता दीर्घकालीन वाढीसाठी भक्कम आधार मिळतो.

बँकेच्या या प्रवासाविषयी बोलताना उज्जीवन स्मॉल फायनान्स बँकेचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव नौटियाल म्हणाले, आर्थिक वर्ष २०३०पर्यंत १ लाख कोटी रुपयांच्या कर्जपुस्तकाचे उद्दिष्ट आमच्या समोर आहे. स्मॉल फायनान्स बँक म्हणून प्रवास सुरू केल्यापासून उभारलेल्या पायावर हे उद्दिष्ट आधारित आहे. या काळात आमचे एकूण कर्जपुस्तक आर्थिक वर्ष २०१७ मधील ७,५६० कोटींवरून आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीअखेर ३३,२८७ कोटींवर पोहोचले आहे. आमची वार्षिक कर्जवाढ २० ते २५ टक्क्यांदरम्यान राहील, अशी अपेक्षा आहे.

### समाधाननगरात दिवसाढवळ्या घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

पोलिस लाईन टाकळीच्या समाधाननगरात दिवसाढवळ्या चोरांनी एका घरातून रोकड आणि दागिन्यांसह एकूण ६.१८ लाख रुपयांच्या मालावर डल्ला मारला आणि फरार झाले. ही घटना गिट्टीखदान पोलिस ठाण्यांतर्गत घडली. या प्रकरणी पोलिसांनी संध्या जितेंद्र ठाकूर (४०) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. समाधाननगरात ठाकूर कुटुंबाची तीनमजली इमारत आहे. संध्या व त्यांचे कुटुंब पहिल्या माळ्यावर राहतात, तर त्यांचे सासू-सासरे तळमजल्यावर राहतात. शुक्रवारी सायंकाळी ४.३० वाजताच्या सुमारास संध्या दाराचा कडीकोंडा लावून सासू-सासऱ्याशी बोलण्यासाठी तळमजल्यावर गेल्या होत्या. या दरम्यान चोरांनी दाराचा कडीकोंडा उघडून त्यांच्या घरात प्रवेश केला. बेडरूमच्या कपाटाचे लॉकर उघडून त्यातील ५० हजारांची रोकड आणि १४२ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरी केले आणि फरार झाले. काही तासानंतर संध्या घरी परतल्या असता चोरी झाल्याचे समजले. त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. प्राथमिक तपासानंतर अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदविला. घराची संपूर्ण माहिती असणाऱ्या व्यक्तीनेच ही चोरी केल्याचा संशय पोलिसांना आहे.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ७० प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :



नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. मंगळवार (ता.9) रोजी शोध पथकाने 70 प्रकरणांची नोंद करून 36,600/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 27 प्रकरणांची नोंद करून 10,800/- रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. 400/- दंड) या अंतर्गत 6 प्रकरणांची नोंद करून रू. 2,400/- चे दंड वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 4 प्रकरणांची नोंद करून 8,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशॉप, गॅरेजेस व इतर दुरूस्तीचे व्यावसायिकाने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत 3 प्रकरणांची नोंद करून 3,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत 1 प्रकरणांची नोंद करून 1,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 22 प्रकरणांची नोंद करून 4,400/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 7 प्रकरणांची नोंद करून रु. 7,000/- चे दंड वसूल करण्यात आलेला आहे.ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे.स्मार्ट सुपर स्टोअर्स यांनी दुकानाचा कचरा फुटपाथवर टाकल्याने रू.5,000/-चे दंड वसुल करण्यात आले.धरमपेठ झोन अंतर्गत मे. ड्रीम लोटस यांनी बांधकामामुळे चेंबर क्षतीग्रस्त करून ब्लॉक केल्यामुळे रू.10,000/- दंड वसुल करण्यात आले.धंतोली झोन अंतर्गत मे.देवेन्या-9 यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले.नेहरूनगर झोन अंतर्गत मे. हॉस्पीटल रेसीडेंसी यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले. गांधीबाग झोन अंतर्गत मे. कॅलीबर्स नोवा यांनी विनापरवानगी विद्युत खांबावर जाहिरातीचे फलक लावल्याने रू. 5,000/-दंड वसुल करण्यात आले.

# लोकसहभागाने पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा

## मनपाच्या विविध सामाजिक उपक्रमांना नागरिकांचा उदंड प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :



पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या माझा बाप्पा, इको फ्रेंडली या आवाहनाला नागपुरातील गणेशभक्तांनी चांगला प्रतिसाद दिल्याने यावर्षीचा गणेशोत्सव अत्यंत शांततेत व शिस्तबद्धरितीने सुनियोजित पद्धतीने पार पडला. गणेशोत्सवाच्या काळात मनपाने विविध उपक्रम राबविले. या सामाजिक उपक्रमांना सुद्धा चांगला प्रतिसाद मिळाला. आतापर्यंत १ लाख ६२ हजार ०८५ गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. तर २०१.४१ टन निर्माल्य गोळा करण्यात आले.

नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी यावर्षी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यावर भर दिला होता. अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत व अतिरिक्त वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनात ही संकल्पना यशस्वीपणे राबविण्यात आली. यासाठी गणेशोत्सव मंडळाच्या सदस्यांना, मूतीकारांना, रोषणाई करणाऱ्या व साऊंड सिस्टीम लावणाऱ्या सर्वांना विश्वासात घेण्याचे काम मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी प्रारंभीच केले होती. यासंदर्भात गणेशोत्सवापूर्वीच कविवर्य सुरेश भट सभागृहात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी या सर्वांच्या सहकार्याचे आवाहन करण्यात आले. यासोबतच हा गणेशोत्सव साजरा करताना शहरातील कायदा व सुव्यवस्था चांगली राहिली पाहिजे, यासंदर्भात पोलीस आयुक्त रविंद्रकुमार सिंगल यांनी सुद्धा पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले होते.

यावेळी मुख्य अभियंता मनोज तालेवार, अधीक्षक अभियंता डॉ. श्वेता बॅनर्जी, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, दहाही झोनचे सहायक आयुक्त, कार्यकारी अभियंता, विभागीय स्वच्छता अधिकारी यांनी संपूर्ण गणेशोत्सवादरम्यान चोख व्यवस्था राखण्यास सहकार्य केले.

गणेशोत्सव मंडळांना नोंदणीमध्ये कोणत्याही अडचणी येऊ नये, याकरिता संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली. मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशांनुसार, एक खिडकी योजना सुरू करण्यात आली. दहाही झोन मध्ये गणेशोत्सव मंडळाच्या नोंदणीची सुविधा पुरविण्यात आली. यामुळे गणेशोत्सव मंडळाच्या सदस्यांना घरी बसून नोंदणी करणे शक्य झाले. झोनमध्ये अग्निशमन दल, वाहतूक विभागाची ना हरकत प्रमाणपत्र देण्याची सोय करण्यात आली होती.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात गणेश मूतीर्चे स्थान महत्त्वाचे असते. शाडूच्या मातीच्या गणेशमूर्तीच्या तयार करण्याला प्रोत्साहन देण्यासाठी महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी पुढाकार घेतला. शाडूच्या मातीच्या गणेशमूतीर्ची प्रतिष्ठापना व्हावी, या उद्देशाने मनपाने शाडूच्या मातीच्या गणेश मूर्ती निर्मिती कार्यशाळा आयोजित केली होती. ही अभिनव स्पर्धेत ६०० वर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. तसेच मनपाच्या विविध शाळांमध्येही अशीच अभिनव कार्यशाळा घेण्यात आली.

पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी मनपाने सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांची स्पर्धा आयोजित केली. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करणाऱ्या मंडळाने रोख बक्षिसे देण्याची घोषणा करण्यात आली. या स्पर्धेत स्वयंस्फूतीर्ने ९२ हून अधिक गणेशोत्सव मंडळांनी सहभाग नोंदविला. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याकडे नागपुरातील नागरिकांचा कल असल्याचे यातून स्पष्ट झाले. एवढेच नव्हे तर सामाजिक बांधिलकी म्हणून मनपाने मुख्यालयासह शहरतील दहाही झोन मध्ये विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. याद्वारे ६०० हून अधिक युनिट रक्त संकलित करण्यात आले.

श्री. गणेशमूर्तींचे विसर्जनासाठी मनापने यावर्षी व्यापक व्यवस्था केली होती. शहरातील विविध २१६ ठिकाणी ४१९ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती केली होती. यामुळे नागरिकांना अधिक एका ठिकाणी थांबावे लागले नाही व कोणत्याही विसर्जन केंद्रांवर गर्दीचे चित्र दिसले नाही. मोठ्या मूर्तींच्या विसर्जनासाठी सुद्धा महापालिकेने गोरेवाडा, पोलीस लाईन टाकळी व कच्चीविसा भागात मोठे विसर्जन तलाव निर्माण केले. यात ५ फुटापेक्षा मोठ्या मूर्तींचे विसर्जनासाठी क्रेनची व्यवस्था करण्यात आली होती. त्याचप्रमाणे ज्येष्ठ नागरिकांना विसर्जन स्थळी जाऊन श्री गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात अडचण येत असल्याच्या जाणिवेतून फिरते विसर्जन कुंडांची व्यवस्था करण्यात आली होती. दारासमोर विसर्जन कुंड या संकल्पनेनुसार प्रत्येक झोनमध्ये हे कुंड उपलब्ध करून दिले होते. केवळ फोन करून अनेकांनी घरासमोर लाडक्या बाप्पांना निरोप दिला. गणेशोत्सवांच्या काळात निर्माण होणारे निर्माल्याचे संकलन करण्यासाठी २१ निर्माल्य रथ मनपाने तयार केले होते. या निर्माल्य रथाच्या सहाय्याने शहरातील विविध विसर्जन स्थळांवर जमा होणारे निर्माल्य या रथांमध्ये एकत्रित करण्यात आले. संकलित करण्यात आलेल्या निर्माल्याद्वारे सेंद्रिय खत निर्मिती केली जाणार आहे.

## प्रलंबित देयके निरंतर योजनेसाठी राज्य सरकारविरोधात

# शिवभोजन संघटनेचे धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :



महाराष्ट्र राज्यातील महाविकास आघाडी सरकारकडून २०२१ पासून शिवभोजन थाळी योजना अविरतपणे राबविली जात आहे. या योजनेचे वार्षिक बजेट २६० कोटी आहे. दररोज दोन लाख गरीब, मजूर या योजनेचा लाभ घेतात. आणि फक्त १० रुपयांमध्ये आपले रोजचे पोट भरतात. राज्यात सुमारे १८०० शिवभोजन केंद्रे आहेत. या केंद्रात सुमारे पाच महिला कामगार काम करतात.परंतु राज्य सरकार असताना केंद्र चालकांचे ६ महिन्यांचे बिल भरले नसून सरकार ही योजना बंद करण्याच्या मार्गावर आहे.

या योजनेच्या बळावर ९००० लाडक्या बहिणींचे कुटुंबे चालत आहेत. या केंद्राच्या संचालकांमध्ये बहुतेक महिला बचत गट आहेत. या योजनेतुन हजारो महिलांना रोजगार मिळत आहे. परंतु सरकारने अद्याप या केंद्र संचालकांचे सहा महिन्यांचे बिल भरलेले नाही. तसेच, काही दिवसांपूर्वी अजित पवार यांनी केंद्र संचालकांशी बोलताना सांगितले होते की, आमचे सरकार ही योजना बंद करण्याचा विचार करत आहे.

अर्थमंत्र्यांच्या अशा विधानावर, काही दिवसांपूर्वी अजित पवार नागपूर दौऱ्यावर असताना, नागपूर राष्ट्रवादी कॉंग्रेसअजित पवार गटाचे नेते आणि नागपूर शहर शिवभोजन संघटनेचे अध्यक्ष यांनी थेट अजित पवार यांची भेट घेतली आणि त्यांना विनंती केली की आमचे बिल दरमहा भरा आणि ही योजना अखंडपणे सुरू ठेवा कारण या योजनेद्वारे गरीब, गरजू, कामगार दुपारी एक वेळचे जेवण घेऊन आपले पोट भरतात. यासोबतच तुमच्या ९००० लाडक्या बहिणींची कुटुंबे चालू आहेत. जर ही योजना विस्कळीत झाली तर सर्वजण बेरोजगार होतील आणि २ लाख लाभार्थी एक वेळ उपाशी राहावे लागतील. यावर पुन्हा अजित पवार म्हणाले की, सरकार ही योजना बंद करणार आहे.

त्यामुळे आज मुख्यमंत्र्यांच्या शहरातच नागपूर शिवभोजन संघटनेने प्रलंबित बिल मिळावे आणि योजना अखंड सुरू राहावी यासाठी संविधान चौकात मुख्यमंत्री, अर्थमंत्री अजित पवार आणि राज्य सरकारच्या विरोधात धरणे आंदोलन करण्यात आले आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन या आंदोलनात सरकारचे लक्ष वेधण्यात आले. अध्यक्ष तानाजी वानवे, सचिव जानबा मस्के, किशोर ठाकरे, भास्कर पराते आणि शहर आणि चंद्रपूरमधील इतर सर्व केंद्र चालक उपस्थित होते.

## शेतातील झोपड्यातुन ४० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास



■ महासागर प्रतिनिधी
कन्हान, दि. ९ :

कन्हान पोलीस स्टेशन अंतर्गत सालवा येसंबा शेत शिवारातील झोपड्यातुन अज्ञात चोरट्यांनी ४० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याने पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उमेश रामभाऊ चकोले (३५ वर्ष) रा.निलज यांची सालवा येसंबा शिवारात साडे पाच एकर शेती आहे. शनिवार (दि.६) सप्टेंबर रोजी उमेश चकोले सकाळी ६ वाजता नेहमी प्रमाणे शेतात गेले. दिवसभर आपले काम करुन शेतातील झोपड्यात ३५ नग कोंबड्या बेंडुन आणि २ बकऱ्या आणि १ बकरी असे बांधुन घरी आले. काही वेळाने उमेश आपल्या शेतात परत गेले, तेव्हा झोपड्यात जाऊन पाहणी केली असता ९ कोंबड्या, २ बकऱ्या, १ बकरी आणि टेकसमो कंपनीची जुनी वापरती मशीन दिसुन आली नाही. शेतात शोध घेतला असता परंतु मिळुन आले नाही.

कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी शेतात कोणी नसल्याचा फायदा घेऊन ४० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याने कन्हान पोलीसांनी उमेश चकोले यांच्या तक्रारी वरुन अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरीक्षक वैजयंती मंडवधरे यांचा मार्गदर्शनात कन्हान पोलीस करीत आहे.

## गणेश विसर्जनादरम्यान २ गटात राडा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीदरम्यान गुंडांच्या टोळीने एका गटावर हल्ला केला. यात एकजण जखमी झाला. ही घटना खामला परिसरात घडली. घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला. पोलिसांनी दोन्ही गटाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. मनीष उर्फ गोलू तोतवानी रा. खामला असे जखमीचे नाव आहे. आरोपींमध्ये पप्पू समुद्रे, गेंदलाल, भरत व त्यांच्या साथीदारांचा समावेश आहे. पोलिसांनी मनीष आणि त्याच्या साथीदारांविरुद्धही गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गोलू आणि पप्पू समुद्रेच्या टोळीमध्ये आधीपासूनच वैमनस्य आहे. रविवारी रात्री गोलूच्या गणेश मंडळाकडून विसर्जनाची मिरवणूक काढण्यात आली. गेंदलाल आणि त्याच्या साथीदारांनी मिरवणुकीत घुसून हरीश उर्फ कालू आसुदानी याच्याशी विनाकारण वाद घातला. कालूला जबर मारहाण करण्यात आली. लोकांनी विरोध केला असता आरोपींनी पळ काढला. विसर्जनानंतर गोलू परिसरात परतला. तो समुद्रे टोळीला जाब विचारण्यासाठी त्यांच्या मंडपाजवळ गेला.

## महर्षी अगस्ती आश्रम मंदिराचा कार्यभार वैष्णव पंथीय संताकडे सोपविण्याची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. ९ :

शतकानुशतके अध्यात्मिक व धार्मिक परंपरांचा वारसा जपणाऱ्या महर्षी अगस्ती आश्रम गडमंदिराचा कार्यभार वैष्णव पंथीय संता कडे सोपविण्याची मागणी भारतीय जनसेवा मंडळाने ८ स्पटेम्बर २०२५ ला प्रशासनाकडे केली आहे.

संत गोपालदास बाबा व त्यांचे शिष्य तुकाराम बाबा यांच्या निधनानंतर आश्रमात धार्मिक कार्यात खंड पडला होता. अलीकडेच प्रशासनाच्या कारवाईनंतर अवैधरित्या राहणाऱ्या महिलेला बाहेर काढण्यात आले. आश्रमात राधाकृष्ण मंदिर, हनुमान मंदिर तसेच संतांच्या समाध्या असून तेथे दररोज पूजाअर्चा, आरती, नैवेद्य, शयनआरती तसेच अखंड ज्योत व धुनी परंपरेनुसार प्रज्वलित ठेवणे आवश्यक आहे. याशिवाय एकादशीचे भजनकिर्तन, गुरु पौर्णिमा, संत पुण्यतिथी, गंगा दशहरा, त्रिपुरी पौर्णिमा, जन्माष्टमी आदी उत्सव मोठ्या श्रद्धेने साजरे करण्याची परंपरा आहे.

भारतीय जनसेवा मंडळाने मागनी केली की, या सर्व धार्मिक विधी नियमित पार पाडण्यासाठी आश्रमात वैष्णव पंथीय ब्रहाचयार्चे पालन करणारा संत स्थायी स्वरूपात राहणे गरजेचे आहे. त्यामुळे या परंपरेचे रक्षण व्हावे आणि आश्रमाचे धार्मिक वातावरण अबाधित राहावे, याकरिता योग्य संता कडे कार्यभार सोपविण्याची विनंती मंडळाने उपविभागिय अधिकारी प्रियेश महाजन यांचे कडे केली आहे. यावेळी भारतीय जनसेवा मंडळचे सचिव व माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी, पदाधिकारी धनराज काठोके, दत्तू बघेले, चंद्रकांत ठक्कर, विनायक डांगरे, नत्थु घरजाळे शहित दमाहे, बालचंद खोड़े सह आदी उपस्थित होते.

## रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :




अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नागपूर शाखेतर्फे स्थानिक स्वराज्य संस्था दिवसाचे औचित्य साधून रक्तदान शिबिर घेण्यात आले. यात एकुण 52 विद्यार्थ्यांनी रक्तदान करीत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शताब्दी वर्षाला प्रारंभ झाला असून त्यानिमित्ताने इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सभागृहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातील संस्थेचे पहिले महासंचालक स्वर्गीय सीडी बर्फीवाला यांच्या जन्मदिवसानिमित्त अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी यावेळी पथनाट्य, नृत्य, गायन असे विविध सांस्कृतिक कार्यक्रम देखील सादर केले.

या कार्यक्रमाला वरिष्ठ पत्रकार सुनील कुहिकर यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यात अमर नारनवरे, श्रमिता खोब्रागडे, गायत्री चौधरी,अभिषेक देशपांडे, वैभव गावली, पराग टिकरे, लोकेश भलमे, शुभम राऊत, विक्रम मानकर, विशाल सोनी व कल्याण खोब्रागडे यांचा समावेश होता.

शताब्दी वर्षानिमित्त वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असल्याची माहिती संस्थेचे विभागीय संचालक जयंत पाठक यांनी प्रास्ताविक करताना दिली. सूत्रसंचालन गुरु सिमरन कौर व वृषाली रामटेके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वरिष्ठ अध्यापक सुधाकर काळे, राही बापट, निशा व्यवहारे, मंजिरी जावडेकर, यशश्री परचुरे, जयंत राजुरकर, सुशील यादव, करण खंडाळे, कृष्ण पोटपोसे, दीपक वनारे व लक्ष्मी सोनवणे यांनी प्रयत्न केले.

## अल्पवयीन मुलाला वाहन देणे पडले महागात

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

अल्पवयीन मुलाला दुचाकी वाहन देणे इतके महागात पडेल याचा विचारही पालकांनी केला नव्हता. पोलिसांनी त्याला पकडले आणि आई-वडिलांविरुद्ध गुन्हा नोंदविला. हे प्रकरण न्यायालयात पोहोचले आणि प्रकरणाची गंभीरता पाहता न्यायालयाने पालकांना ३२,५०० रुपयांचा दंड ठोठावला. या प्रकरणावरून इतर सर्व पालकांनी धडा घेण्याची गरज आहे. अल्पवयीनच्या हातात वाहन दिल्यास केवळ दंडच नाहीतर कायदेशीर प्रक्रियेचाही सामना करावा लागेल.

काही दिवसांपूर्वी एक १६ वर्षीय मुलगा आपल्या मित्रासोबत आईची दुचाकी घेऊन फिरायला निघाला. पकडल्या जाऊ नये म्हणून त्याने नंबर प्लेटवर काळीपट्टीही चिपकवली. त्याचा व्हीडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला.

सोनेगाव वाहतूक झोनचे पोलिस निरीक्षक प्रवीण पांडे आणि त्यांच्या पथकाने दुचाकी वाहन आणि मुलाला शोधून काढले. नंतर समजले की, वाहन अल्पवयीन मित्र चालवत होता, वाहन मालकाचा मुलगा मागे बसलेला होता.

## गणेशोत्सवात २००२ युनिट रक्त संकलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ९ :

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या औचित्याने सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याबाबत मनपा आरोग्य विभागाने केलेल्या आवाहनाला शहरातील गणेशोत्सव मंडळांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मनपाच्या आवाहनाला प्रतिसाद देत शहरातील ७० गणेशोत्सव मंडळांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यासाठी पुढाकार घेतला. याशिवाय मंगळवारी झोनअंतर्गत ईद निमित्त देखील रक्तदान करण्यात आले. मनपा मुख्यालयासह सर्व सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमधील रक्तदान शिबिरांमधून एकूण २००२ युनिट रक्त संकलन करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या औचित्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी व अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत यांनी मंडळांचे अभिनंदन करित मनपातर्फे आभार देखील मानले आहे. मनपाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार यांच्या नेतृत्वात झोन स्तरावर नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या माध्यमातून मनपा पॅनल मधील रक्तपेढी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, डागा येथील रक्तपेढी आणि शहरातील इतर खासगी रक्तपेढीच्या सहकार्याने सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये रक्तदान शिबिर राबविण्यात आले.

मनपाद्वारे राबविण्यात आलेल्या या विविध गणेशोत्सव मंडळांमधील रक्तदान शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंगळवारी झोनमधील गणेशोत्सव मंडळांमध्ये तसेच ईद निमित्त देखील आयोजित ८ रक्तदान शिबिरांमधून सर्वाधिक १००८ युनिट रक्त संकलित करण्यात आले.

# देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी काही भागात आज वीज बंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ९ :

महावितरणकडून नियमित देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांसाठी उद्या, 10 सप्टेंबर 2025 रोजी नागपूर शहरातील काही भागांमध्ये वीजपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. यामुळे नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगीर व्यक्त केली आहे.

या कामांमुळे कॉंग्रेसनगर विभागात सकाळी 8 ते 11 या वेळेत छत्रपती नगर परिसर, हनुमान मंदिर वर्धा रोड, प्रगती कॉलनी, साहस क्रिकेट क्लब, अनुसया कॉम्प्लेक्स या भागात, सकाळी 7 ते 11 या वेळेत रामदासपेठचा काही भाग, दगडी पार्क गार्डन परिसर, विको प्रयोगशाळा या भागात, सकाळी 9 ते 11 या वेळेत आरपीटीएस रोड, वसंत नगर, शततारका अपार्टमेंट, आंबेडकर भवन, माता कचेरी या भागात, सकाळि 8 ते 12 या वेळेतदिनदयाल नगर, लोकसेवा नगर, सुजाता लेआउट, धरमपेठ लेआउट या भागात, सकाळि 8:30 ते 12 या वेळेत सोमलवाडा शाळा, जगदेव नगर या भागात, सकाळी 8 ते 11 या वेळेत यशोदा नगर, गाडगे नगर, विनायक नगर, राजेंद्र नगर, वासुदेव नगर, एसबीआय कॉलनी, म्हाडा कॉलनी, माधव नेत्रालय, सॅनसन लेआउट, हिंगणा रोडचा भाग या भागात, सकाळि 9 ते 12 या वेळेत चिंचभवन भागातील सेक्टर 35, 36 व 37 या भागातील, सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत तपोवन, राहुल नगर, राजीव नगर या भागात, सकाळि 8 ते 11 या वेळेत नवनिर्माण, पडोळे चौक, दीनदयाल नगर, मॉडर्न सोसायटी विद्या विहार, पन्नासे लेआउट, विद्या विहार मैदान, प्रताप नगर चौक या भागात, सकाळी 8 ते 11:30 या वेळेत ताजेश्वर नगर, चाणक्यपुरम, मानव मंदिर, गुरुकृपा नगर, धांडे लेआउट, श्याम नगर, आम्रपाली नगर, सौभाग्य नगर, साई नगर-अ आणि 2 या भागात तर सकाळि 8 ते 11 या वेळेत अभ्यंकर नगर परिसरातील वीजपुरवठा बंद राहील.

गांधीबाग विभागात सकाळी 8:30 ते 10:30 या वेळेत पुर्व वर्धमान नगर या भागातील, सकाळी 9 ते 11:30 या वेळेत सूर्या नगर, नेताजी नगर, भारत नगर, गुजराती कॉलनी, भरतवाडा रोड या भागातील, सकाळी 8 ते दुपारी 2 या वेळेत राम मंदिर, घटाटे नगर, पुनापूर, विश्वास नगर या भागातील, सकाळी 8:30 ते 11 या वेळेत अण्णाभाऊ साठे, चौक, नारायणदास मठ, गोंड पुरा, मटन मार्केट, एचबी टाऊन, चंद्रा नगर, प्रजापती नगर या भागातील तर सकाळी 8 ते 11 या वेळेत लालईमली चौक, गोळीबार चौक, गांजखेत, खदान, छोटी खदान, नांदबाजी डोब आणि देवघर मोहल्ला या भागातील वीज पुरवठा बंद राहील.

सिव्हील लाईन्स विभागात सकाळी 9:30 ते 12 या वेळेत कमाल चौक, वैशाली नाग्र, पॉवर ग्रिड चौक, रिंग रोड, बँक कॉलनी, कपिल नगर, सकाळि 10 ते दुपारी 1 या वेळेत राणी दुर्गावती चौक, ताज नगर, घोसावी मोहल्ला, सुजाता नगर, 10 नंबर पूल, लष्करी बाग या भागात, सकाळी 8:30 ते 11:30 या वेळेत बाबा फरीद नगर, गायत्री नगर, एमबी टाऊन, फरस, राठी लेआउट, आशीर्वाद नगर, रतन नगर, आदर्श नगर या भागात, सकाळी 11 ते दुपारी 3 या वेळेत सेनगुप्ता, रवि नगर वसाहत, अंबाझरी पोलीस स्टेशन या भागात, सकाळी 10 ते दुपारी 2 या वेळेत पंचशील नगर, आझाद नगर, भीमतेवडी या भागात, सकाळी 11 ते 12 या वेळेत सीएल बंगला क्रमांक 17, 18, सीपीडब्ल्यूडी कॉलनी परिसर, सकाळी 10 ते दुपारी 1 या वेळेत चौधरी लेआउट, राठोड लेआउट, बसेरा अपार्टमेंट, अनंत नगर, आरएमएस कॉलनी या भागात वीज पुरवठा बंद राहील.

महाल विभागात सकाळी 9 ते दुपारी 2 या वेळेत नरेंद्र नगर, विजयानंद सोसायटी, उमंग सोसायटी, डोबी नगर, मिलिंद सोसायटी, पीएमजी सोसायटी, फ्रेंड्स सोसायटी, साईकृपा सोसायटी, रामकृष्ण सोसायटी, बोरकुटे लेआउट, दिन प्रजाहित सोसायटी, गुरुदत्त सोसायटी, सर्वत्र नगर, म्हाडा कॉलनी या भागात, सकाळी 8 ते 12 या वेळेत आशीर्वाद नगर, गणपती मंदिर, बँक ऑफ महाराष्ट्र या भागात तर सकाळी 9 ते दुपारी 1 या वेळेत सर्वश्री नगर, नवनाथ आयटीआय, प्रगती कॉलनी, गौसिया, हटवार कंट्रोल या भागातील वीज पुरवठा बंद राहील. बुटीबोरी विभागातील औद्योगिक परिसरात सकाळी 9 ते दुपारी 3 या वेळेत कांचनजंगा, महाजनवाडी परिसर, रायपूर, सूतगिरणी, ग्रीनफिल्ड, जैस्वाल लेआउट, हिंगणा परिसर या भागात, सकाळी 8 ते दुपारी 2 या वेळेत मिहान रोड, मोंढा रोड-7 उच्चदाब ग्राहक, सकाळि 10 ते दुपारी 4 या वेळेत सावंगी खदान परिसर, समृद्धी महामार्ग व सावंगी वीज वाहिनीवरील उच्चदाब ग्राहकांचा वीजपुरवठा बंद राहील.

**महासागर प्रभाग वार्ता**

## इंदोरा मॉडेल टॉऊनमध्ये बेवारस कचरा गाडयांची दुरवस्था




प्रमोद जांभूळकर, नागपूर दि. ९

इंदोरा मॉडेल टॉऊन, प्रभाग क्रमांक ७ येथे महापालिकेच्या कचरा संकलन गाड्या गेल्या अनेक दिवसांपासून जंगलेल्या, तुटलेल्या अवस्थेत बेवारस पडून आहेत. या गाड्यांची कोणतीही देखभाल अथवा उपयोग न झाल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रशांत साखरे यांनी सांगितले की, जनता नियमितपणे कर भरते, त्यातूनच हे साहित्य खरेदी केले जाते. मात्र या गाड्यांची अशी दुरवस्था म्हणजे सरळ सरळ जनतेच्या पैशांचा अपव्यय आहे.

या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी अजय सहारे, नवीन शहारे, राजेश वासनिक, विलास नितनवरे, राजेश जांभुळकर, राजरत्न टेंभुर्णे, राजेश राऊत, पद्माकर पाटील, युवराज सोनारे, प्रसन्ना सहारे आणि शैलेंद्र बेहेरे यांनी संयुक्तपणे महापालिकेकडे त्वरित कारवाई करण्याची मागणी केली आहे.स्थानिक नागरिकांनीही प्रशासनाकडून या गाड्यांचे पुनर्वापरासाठी सुस्थितीत पुनर्बांधणी करावी अथवा योग्य त्या पद्धतीने विल्हेवाट लावावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.